
# माणूस



मे १९६३ : एक रुपया

वर्ष दुसरें
अंक बारावा
*
मे
१९६३
*
: संपादक :
श्री. ग. माजगांवकर




## स्वरूपदर्शन


**राजकीय–सामाजिक**

माझा मल्लीनाथ मीच : वि. दा. सावरकर
पाल मालेटर : मारिया मालेटर

**साहित्यविभाग**

कथा : सौ. स्नेहलता दसनूरकर, अवनींद्रनाथ, वि. ग. कानिटकर, भीमराव कुलकर्णी, आनंद फुले
कविता : रमेश धोंगडे, प्रताप, विनायक कुलकर्णी, रामचंद्र हिंगणे, स. ज. कापसे
समीक्षा : रसिला, गुंजारव–श्रीकृष्ण पोंक्षे, इयोनेस्को–विकर्ण

**चित्रपटपरीक्षण**

सेहरा : श्रीकांत रानडे, रंगा मराठे

**मुखपृष्ठ**

: सुभाष संचेती

**सजावट**

: दत्ता महाबळेश्वरकर–वसंत सहस्रबुद्धे


### सूचना

१. कथासाहित्य किंवा लेख पाठवितांना सोबत टपालखात्याच्या नवीन नियमानुसार पुरेसें टपाल हंशील पाठवावें.
२. कविता पाठवितांना, कविता नापसंत ठरून ती परत हवी असल्यास पुरेसें टपाल हंशील पाठवावें.
३. नापसंत साहित्य जर परत नको असेल तर केवळ निर्णय कळविण्यास पुरेसें टपाल हंशील पाठविल्यास निर्णय कळविण्यांत येईल व असें साहित्य निकालांत काढलें जाईल.
४. प्रकाशित लेख, चित्रें इत्यादींबाबतचे सर्व हक्क स्वाधीन.
५. या मासिकांत व्यक्त झालेलीं मतें 'माणूस' मासिकाच्या चालकांचीं अधिकृत मतें असतातच असें नाहीं.

*


पत्रव्यवहाराचा पत्ता
**'माणूस'**
४१९ नारायण पेठ, पुणें २.
वार्षिक वर्गणी : आठ रुपये
किरकोळ अंक : एक रुपया



“ पूर्वी, – विशी, तिशी, चाळीशीमध्यें वारंवार मृत्यूची गांठ पडली होती. ‘ येतोस तर ये; कोण भितो तुला ? ’ असा ध्वनि त्या वेळच्या सिद्धतेचा होता. आतां मृत्यु आला नाहीं तर आपण होऊन महाप्रस्थानाला निघायची घडी भरली. यास्तव समाधानानें, मित्राचा जसा हात धरायचा तसाच मृत्यूचा ! आव्हानानें नव्हे, तर आनंदानें ! ज्यांत मागें किंवा पुढें उरलें नाहीं, तृषा तृप्त झाल्या, एका झटक्यासरशीं जगाची वार्ता, लोभ, क्षोभ, संबंध नाहींसे होऊन केवळ शांतता उरली, ‘ मीं ’ देखील नाहींसा झालों, त्या आनंदांत, हे कर्मवीरा, आतां पूर्ण समाधानानें विलीन व्हावें. ”

# माझा

या शब्दांत आपल्या थोरल्या बंधूंना—बाबारावांना–मृत्यूचा सत्कार करण्यास सांगणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांची ही आत्मकथा, त्यांच्याच शब्दांत, त्यांच्याच भाषेंत येथें सादर केली आहे.

‘ रानफुलें ’ त्यांचींच. आम्ही फक्त तीं वेंचलीं. एका माळेंत गुंफलीं. मध्येंच एखाद-दुसरी कलाकुसर, कलाबूत चढवली एवढेंच.

८१ च्या वर्षांत ते पदार्पण करीत आहेत. ही ‘ रानफुलांची माला ’ त्यांना समर्पित असो.

— संपादक

# मल्लीनाथ मीच



दिगंतीं पसरे सुगंधता
लोकहित परिमलाची

## १८८३.

सन १८८३ त एडनमध्यें पेटलेल्या चितेवर वीर वासुदेव बळवंतांचें कलेवर जळून राख झालें. ती चिता विझली. परंतु इकडे त्यांच्यामागें उरलेल्या महाराष्ट्रीय क्रांतिकारकांचीं देशस्वातंत्र्याच्या महत्त्वाकांक्षेनें आणि तत्प्रीत्यर्थ अपरिहार्यपणें कराव्या लागणाऱ्या सशस्त्र वीरश्रीनें पेटलेलीं हृदयें कांहीं विझलीं नाहींत. तीं तशींच धगधगत राहिलीं. त्यांचा संघटित पक्ष असा कांहीं काळ राहिला नव्हता. परंतु व्यक्तिशः आणि गटागटानें ते भारतीय स्वातंत्र्याच्या ध्येयाचा आणि सशस्त्र क्रांतिवादाचा प्रचार गुप्तपणें निरंतर करीतच राहिले होते. तेहि नाना वेशांनीं नि नाना मिषांनीं अप्रकटपणें नि प्रकटपणें.

असें होतां होतां सन १८९५ च्या आगेमागें महाराष्ट्रांत गुप्तपणें गटागटानें विखुरलेल्या या सशस्त्र क्रांतिकारकांची एक नवी आघाडी पुन्हां कार्यक्षेत्रांत उतरली. तीच पुढें साऱ्या हिंदुस्थानांत क्षणभर विजेसारखी चमकून गेलेली चाफेकर बंधूंची गुप्त संस्था होय.

उपलब्ध इतिहासावरून असें दिसतें की, ह्या सन १८९५ च्या कालखंडापर्यंतहि हिंदुस्थानच्या सार्वभौम स्वातंत्र्यासाठीं ब्रिटिशांचा सशस्त्र प्रतिकार करण्यास उद्युक्त झालेली अशी एखादी क्रियात्मक क्रांतिकारक संस्था वा सक्रिय गट महाराष्ट्रावांचून इतर कोणत्याहि प्रांतांत अस्तित्वांत आलेला नव्हता.



अनेक फुलें फुलती ! फुलोनिया सुकोन जाती । कोणी त्यांची महती गणती । ठेवली असे ?
परी जें गजेंद्रशुंडेनें उपटिलें । श्रीहरीसाठीं नेलें । कमलफूल तें अमर ठेलें । मोक्षदा तें पावन ।।

बसलेले, डावीकडून दुसरे



झाली कशी प्रियकरा अपुली अनाथा
दुर्दास्यखिन्न शरभिन्न विपन्न माता
शोकें विवंचुनि तिच्या जइं मोचनाचे
केले अनंत तरुणां उपदेश साचे

झाल्या प्रियकरासह आणभाका
त्या सर्व देवि वहिनी स्मरती तुम्हा का ?
' बाजी प्रभू ठरूं ' वदे युवसंघ सर्व
' आम्ही चितोरयुवती ' युवती सगर्व

केवळ महाराष्ट्रांत मात्र ती क्रांतिकारक परंपरा अखंडपणें चालू राहिली. सन सत्तावनच्या स्वातंत्र्ययुद्धापासून स्फूर्ति घेऊन वासुदेव बळवंताची सशस्त्र उठावणी झाली. वासुदेव बळवंताच्या परंपरेनें चाफेकर बंधूंची क्रांतिसंस्था चेतवली. चाफेकर-रानडे फांशीं गेल्याची स्फोटक वार्ता येतांच माझें बाल-हृदय पेटलें. आणि मीं माझ्या कुलदेवतेसमक्ष त्यांचें क्रांतिकार्य पुढें चालू ठेवण्याची शपथ घेतली. त्या वर्षाच्या आंतबाहेरच मीं रचलेल्या चाफेकरांवरील फटक्यांत या हुतात्म्यांना संबोधून मीं जें आश्वासन दिलें होतें की—

कार्य सोडुनी अपुरें पडतां झुजत ! खंति नको पुढें ।
कार्य चाल्वूं गिरवित तुमच्या पराक्रमाचे अम्ही धडे ॥

——त्या आश्वासनांतूनच किंचित पुढें ,अभिनव भारताचा ' प्रादुर्भाव झाला.

## महत्कार्याचें कंकण

या सशस्त्र प्रतिकाराच्या मार्गाकडे आम्ही कां वळलों ? ' अभिनव भारत ' ही क्रांतिकारकांची संस्था हा केवळ एक मारो-काटो पंथ होता काय ? नाहीं. त्यामागें त्या वेळच्या राजकीय परिस्थितीचें एक निदान होतें. इसिहासाच्या व मनुष्यस्वभावाच्या अपरिहार्य गतीचें एक निदान होतें. तामसी अंधळेपणानें किंवा एककल्ली उतावळेपणानें केलेलें हें कांहीं एक केवळ वेडें साहस नव्हतें. आत्मचरित्रांत मीं सांगितलेंच आहे.

" जगांतील ज्ञात इतिहास चाळून चाळून आम्ही थकलों, देवासुरांच्या, रावणाच्या, इंद्रवृत्रासुरांच्या वैदिकादि कथानकांपासून तों प्राचीन इराण, ग्रीस, रोम, अरब, अमेरिका, इंग्लंड, चीन, जपान, स्पेनमूर, तुर्क, फ्रान्स, जर्मनी, ऑस्ट्रिया, इटली अशा अगदीं ताज्यांतील ताज्या अर्वाचीन इतिहासापर्यंत सर्व राज्यक्रांतींच्या व राष्ट्रस्वातंत्र्याच्या इतिहासांपर्यंत मानवी राजकारणाच्या बहुतेक सर्व इतिहासग्रंथांचीं मीं पारायणें केलीं. हिंदुस्थानच्या कांहीं प्राचीन आणि रजपूत, बुंदेले, शीख, महाराष्ट्रप्रभृति अर्वाचीन इतिहासाचें पान नि पान चाळून पाहिलें. पण हाच एक निष्कर्ष निघे की ' धर्मासाटीं मरावें ' एवढेंच म्हणून भागत नाहीं. मरोनी आततायी मरावें । मारितां मारितां घ्यावें । राज्य आपुलें ॥ यास्तव स्वातंत्र्यप्राप्तीचें भयंकर पण अपरिहार्य साधन यशस्वी राजकारणापर्यंतचें अनन्यसाधन म्हणजे गोविंदकवि म्हणाले तसें सशस्त्र " रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळेना " हा आमचा ठाम सिद्धांत झाला. किंचित पुढेंच रचलेल्या माझ्या या तत्कालीन श्लोकांतच स्पष्ट होत आहे कीं,

" की घेतलें व्रत न हें अम्ही अंधतेनें ।
लब्धप्रकाश इतिहास निसर्गमानें । "

इतिहास व निसर्ग म्हणजे मनुष्यस्वभाव आणि सृष्टिक्रमानें म्हणजे तर्कशास्त्रानें, अर्थातच ऐतिहासिक, स्वाभाविक आणि युक्तायुक्त दर्शनें विचार करून पूर्ण निश्चित पटल्यामुळेंच या दाहक पण अपरिहार्य दिव्यांत आम्ही आपले प्राण अर्पिण्यास सिद्ध झालों.

**मॅझिनो :**

हें कठोर व्रत आचारीत असतां मृत्यु पतकरावा लागला. पराजय स्वीकारावा लागला तर ! तर ती एक अंतिम यशाची पायरीच ठरते, अशी आम्हां क्रांतिकारकांची श्रद्धा होती. मॅझिनीच्या शब्दांतच सांगावयाचें झालें तर,

" तुम्ही कधींहि असें स्वप्नांतसुद्धा आणूं नका कीं, तुम्हांस लढाई टाळतां येईल. नाहीं, नाहीं. लढाईशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाहीं. लढाई टाळतां येणें शक्य नाहीं. इतकेंच नव्हे तर तुम्हांस तितकें सबलत्व येतांच शक्य तितक्या लवकर त्या लढाईला तुम्हींच आरंभ केला पाहिजे. कारण क्रांतियुद्धांत सदोदित पहिला आघात क्रांतिपक्षानेंच केला पाहिजे. एकदम तुटून पडल्यानें तुमचे असावध शत्रु भयभीत होतात व तुमचे स्नेही आशायुक्त व धैर्ययुक्त होतात.

" परक्या सत्तेपासून कांहींहि मिळ-

विण्याची आशा धरूं नका. परके लोक तुम्हांस कधींहि मदत करणार नाहींत. तुम्ही असेंच सिद्ध केलें पाहिजे कीं, त्यांच्याशिवाय तुम्हांमध्यें स्वतंत्रता मिळविण्याची धमक आहे.

"व जेव्हां उठावणी कराल तेव्हां ती उठावणी एखाद्या प्रांतातर्फे किंवा जातीतर्फे न करतां सर्व देशाच्या नांवानें करा. जर स्वातंत्र्य तत्त्वासाठीं राष्ट्रैकतेच्या नांवानें उठाल व पहिल्या धडक्यासरशी स्वतःच्या सामर्थ्याचा प्रभाव दाखवाल तर सर्व लोक दुसऱ्याच हल्ल्याला तुम्हांस येऊन मिळतील व अशा रीतीनें तुम्हांस विजय मिळेल. परंतु राष्ट्राच्या नांवानें व स्वतःच्या हिंमतीवर उठलें असतां जरी तुम्हांस अपयश आलें तरी काय ? त्या देशवीरत्वानें तुम्ही राष्ट्रास इतकें उदात्त शिक्षण द्याल कीं, तुमचे पुत्र तुमच्या अपजयाचा फायदा घेऊन व तुमच्या रक्ताची शपथ घेऊन तुम्हीं आरंभलेला पवित्र कार्यक्रम शेवटास नेतील.

✤ ✤ ✤

## १८८३ ते १९२०

असें सांगितलें जातें कीं, भारतांत तरी क्रांतीच्या या रूढ मार्गानें स्वातंत्र्याची प्राप्ति झालेली नाहीं. येथें एक अहिंसक युद्धाचा अभिनव पर्याय सांपडला व त्यामुळें रणाविना स्वातंत्र्याचा एक अद्‌भुत चमत्कार भारतांत घडून आला.

हें खरें आहे काय ? अहिंसक युद्धाचा हा पर्याय १९२० पूर्वी तर अस्तित्वांतच नव्हता. तेव्हां वासुदेव बळवंतापासून तों पहिल्या महायुद्धाच्या अखेरपर्यंत क्रांतिकारकांनीं केलेल्या आंदोलनांचें व उठावण्यांचें समग्र वर्णन मी येथें देत नाहीं. ज्या कोणाला हा समग्र इतिहास पाहावयाचा असेल त्यानें क्रांतिकारकांच्या शत्रुस्थानीं असणाऱ्या ब्रिटिशांनींच प्रसिद्ध केलेला "रौलेट रिपोर्ट" अवश्य पाहावा. सूत्ररूपानें येथें केवळ त्या वेळची कार्याची दिशा व भूमिकाच काय ती तेवढी सांगतों.

वर्षाकांठीं पांच-पन्नास इंग्रज अधिकाऱ्यांना मारून किंवा यत्रतत्र लहानसहान सशस्त्र छापे शत्रूच्या राज्यकेन्द्रावर घालून ब्रिटिशांसारखे बलाढ्य नि झुंजार राष्ट्र, तसल्या सशस्त्र प्रतिकारामुळें जरी अंशतः संत्रस्त झालें, तरी हिंदुस्थानांतील आपलें

✤ ✤ ✤ ✤ ✤




✤ ✤ ✤ ✤ ✤

ज्या होति तैं प्रियजनांसह आणभाका
केल्याचि सत्य कृतिनें अजि ह्या विलोका
दीप्तानलांत निजमातृ–विमोचनार्थ
हा स्वार्थ जाळुनि अम्ही ठरलों कृतार्थ

कीं घेतलें व्रत न हें अम्हि अंधतेनें
लब्ध–प्रकाश इतिहास–निसर्ग–मानें
जें दिव्य, दाहक म्हणूनि असावयाचें
बुद्ध्याचि वाण धरिलें करिं हें सतीचें

✤ ✤ ✤ ✤ ✤

**तीन बंधू**



त्वत्स्थंडिलीं ढकलिलीं गृहवित्तमत्ता
दावानलांत वहिनी-नवपुत्रकांता
त्वत्स्थंडिलीं अतुल-धैर्य वरिष्ठ बंधू
केला हवी परमकारुण पुण्यसिंधु

त्वत्स्थंडिलावरि बळी प्रिय बाल झाला
त्वत्स्थंढिलीं बघ अतां मम देह ठेला
हे काय, बंधु असतों जरि सात आम्ही
त्वत्स्थंडिलींच असते दिधले बळी मीं


साम्राज्य ते सोडून देण्यास सिद्ध होतील हें त्रिकालहि शक्य नाहीं, हें इतर कोणत्याहि पक्षांपेक्षां क्रांतिकारक पक्षच पक्कें जाणून होता. निदान अभिनव भारताच्या क्रांति-कार्यांत तरी केवळ साहसवादाला स्थान कमी होतें. आमचा मुख्य भर होता सैनिकीकरण आणि परराष्ट्रीय राजकारण.

सैनिकीकरण म्हणजे इंग्रजांच्या हाता-खालील हिंदुस्थानांत असलेल्या हिंदी सैन्यांत क्रांतीचा प्रचार करणें आणि शक्य तितक्या क्रांतिकारकांनीं त्या सैन्यांत भरती होणें होय. आमचें परराष्ट्रीय राजकारण म्हणजे, इकडे ब्रिटिशांच्या हातीं असलेलें हिंदी सैन्य पोखरून ठेवण्याचें कार्य करीत असतांच तिकडे विशेषतः युरोप नि जपानमध्यें इंग्रजांच्या शत्रुस्थानीं असलेल्या किंवा निदान इंग्रजांचें मित्र नसलेल्या राष्ट्रांतून, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यार्थ सशस्त्र क्रांति करणारा एक पक्ष प्रबळ होत आहे, या नव्या वस्तुस्थितीचा प्रचार करून त्या कार्यीं तेथील जनतेची नि राज्याधिकारी वर्गाची सहानुभूति संपाद-ण्याचा आटोकाट प्रयत्न करणें होय. केव्हां तरी इंग्रजांना पाण्यांत पाहणाऱ्या ह्या परराष्ट्रां-पैकीं कोणाचें तरी युद्ध इंग्रजांशीं छेडलें जाण्याचें संकट इंग्रजांवर गुदरेलच. अर्थात् इंग्लंड-वरचें सामरिक संकट म्हणजे हिंदुस्थानची स्वातंत्र्यसंधि होय. हें आमचें युद्धनीतीचें सूत्र असल्यानें अशा एखाद्या युद्धांत ब्रिटनला गांठून, त्याच्या त्या परराष्ट्रीय शत्रूकडून मिळेल तें रणसहाय्य घेऊन, हिंदी सैन्यांत आणि शक्यतों हिंदी जनतेंत क्रांतीची उठा-वणी करावी आणि हिंदुस्थानाबाहेरूनहि त्या परराष्ट्रीय सहाय्याच्या बळावर हिंदुस्थानां-तील ब्रिटिश सत्तेवर बाहेरून चाल करून यावें, ही आम्हां क्रांतिकारकांच्या सामरिक कार्यक्रमाची रूपरेषा होती. अशा प्रकारची पहिली उठावणी फसली तर संधि येतांच दुसरी उठावणी करावी, यश येईतों असेंच, वेळीं, पिढ्यानपिढ्या झुंजत राहावें. ह्या सैनिकी धोरणाचें सर्व सार त्या वेळच्या ज्या एका सूत्रांत गोवलेलें होतें तें सूत्र आतां बहुमुखी झालेलें आहे कीं– Revolutionary war knows no truce save victory or death.

## मधला काळ

पहिलें महायुद्ध सन १९१८ मध्यें संपल्या-नंतर दुसऱ्या महायुद्धाची संधि येईतों सशस्त्र क्रांतिकारकांचा पक्ष स्वस्थ बसलेला नव्हता. पहिल्या महायुद्धांत त्यांनीं केलेल्या महत्त्वाच्या प्रगतीनें उत्साहित होऊन त्याच दिशेनें त्यांनीं अधिक व्यापक प्रमाणावर सैनिकीकरणाच्या नि परराष्ट्रीय उलाढालीच्या चळवळी सतत चालविल्या. तिकडे जपान, चीन, अमेरिका, मेक्सिकोपासून तों युरोपांतील स्वित्झर्लंड, जर्मनी, स्वीडन ते इराण, अफगाणिस्तान-पर्यंतच्या सर्व परराष्ट्रीय राजधान्यांतून ते विखुरलेले क्रांतिकारकांचे गट ब्रिटिश-विद्रोह फैलावत राहिले. त्यांचा तो जागतिक उपद्रव हाणून पाडण्यासाठीं ब्रिटिशांनाहि सारखा संत्रास सोसावा लागला. इकडे प्रत्यक्ष हिंदुस्थानांत तर त्या क्रांतिकारकांच्या गुप्त संस्थांनीं ब्रिटिश सत्तेचा सशस्त्र प्रतिकार करण्यासाठीं नि सैन्यांत ब्रिटिशविद्रोह फैलावण्यासाठीं ब्रिटिश अधिकाऱ्यांना वेंचून ठार मारण्याचा, त्यांचीं कोषागारें लुटण्याचा आणि कांहीं प्रसंगीं तर ब्रिटिशांच्या शस्त्रा-गारावरच धाड घालून शस्त्रास्त्रेंहि लुटून नेण्याचा नुसता धुमाकूळ उडवून दिला. याची रूपरेषा ध्यानांत येण्यासाठीं भगतसिंग-राजगुरूंचीं प्रकरणें, काकोरीच्या संन्याल बिस्मिल प्रभृति हुतात्म्यांचे पराक्रम, आनंदसिंग-सूर्यसेन प्रभृतींनीं लुटलेलें चितागांगचें ब्रिटिश शस्त्रागार, ठिकठिकाणच्या ब्रिटिश गव्हर्नरां-वर क्रांतिकारक वीरांनीं केलेले गोळीबार

+ + + + +



महासागर पेटले आहेत. आणि अहोरात्र नभांगणांत चमचमाट होत आहेत. या युद्धांतून कोणतेंहि राष्ट्र् पूर्ववत् होणार नाहीं अथवा राहणार नाहीं. वैभवाच्या शिखरावर असणारीं अनेक राष्ट्रं धुळीला मिळतील तर मातींत मिसळलेल्या अनेकांना क्षणांत आपलें पूर्व वैभव पाहण्याची संधि येईल...

+ + + + +

इत्यादि व्यक्तींचा नि कटांचा नुस्ता नामोल्लेखहि त्या पहिल्या महायुद्धानंतरच्या काळांत क्रांतिकारकांनीं हिंदुस्थानांत जो सशस्त्र रक्तपाती धुमाकूळ घातला त्याची कल्पना डोळ्यांसमोर उभी करण्यास पुरेसा आहे.

## दुसरी संधि

शेवटीं ज्या कोणच्या तरी, ब्रिटिश सत्तेच्या जिवावरच उठणाऱ्या दुसऱ्या एखाद्या महायुद्धाच्या सुवर्णसंधीकडे हिंदी क्रांतिकारक टक लावून बसले होते, ती संधि एकदांची आली !


सन १९३९ मध्यें ब्रिटनांविरुद्ध जर्मनीचें दुसरें जागतिक महायुद्ध भडकलें. हिंदुस्थानांतील नि हिंदुस्थानाबाहेरील साऱ्या हिंदी सशस्त्र क्रांतिकारक पक्षांनीं ही पुन्हां आलेली संधि साधण्यासाठीं लगोलग कंबर कसली. पहिल्या महायुद्धांतील जी रणयोजना आंखलेली होती आणि जे सामरिक अनुभव आलेले होते त्यांपासून स्फूर्ति घेऊन नि नवीन परिस्थितीस जुळणारा अवश्य तो तो पालट करून तोच डाव क्रांतिकारकांनीं ब्रिटिशांविरुद्ध पुन्हां टाकला. हिंदुस्थानाबाहेर असलेले नि आतां अनुभवानें नि वयानेंहि वृद्ध झालेले परराष्ट्रांतील हिंदी क्रांतिकारक, जर्मनीची रणदेवताच बनलेल्या हिटलरच्या पक्षास उघडपणें जाऊन मिळाले नि आपापल्या ठिकाणीं ब्रिटिशविद्रोही उठावण्या करूं लागले. क्रांतिकार्यांत मुरलेल्या सरदार अजितसिंगासारख्या पुढाऱ्यांनीं ब्रिटनशीं युद्ध पुकारलेल्या इटलींत उतरून इटलीचा प्रख्यात सर्वेसर्वा जो मुसोलिनी त्याच्याशीं त्यांनीं हिंदी स्वातंत्र्यासाठीं सर्व प्रकारचें नि शक्य तें तें रणसहाय्य द्यावें अशीं बोलणीं चालविलीं आणि मुसोलिनीनेंहि तीं मान्य करून इटलीच्या हातीं पडलेल्या, ब्रिटिशांच्या हिंदी सैन्यांतील सहस्रावधि हिंदी सैनिकांना शस्त्रास्त्रें पुरवून, दिलें. जर्मनींत हिटलरनेंहि तीच व्यवस्था केली. ह्या क्रांतिकारक पुढाऱ्यांच्या हातीं सोंपवून दिलेल्या जर्मनी-इटली-प्रभृति ठिकाणच्या सहस्रावधि हिंदी सैनिकांच्या मनांत ब्रिटिशविद्रोह नि स्वदेश-स्वातंत्र्यप्रेम चेतवून त्यांचें एक कसलेलें भारतीय मुक्तिसैन्य उभारण्याचें आणि हिंदुस्थानवर चढून येण्याचें क्रांतिकारक युद्धकारण परराष्ट्रांत पुन्हां नेटानें चालू झालें.

तथापि ही भारतीय क्रांतिसैन्याची चढाई, जर्मनी-इटलींसारख्या त्या दुसऱ्या महायुद्धांत विजयामागून विजय मिळवीत आलेल्या नि ब्रिटिशांना सळो कीं पळो करून सोडणाऱ्या प्रबळ राष्ट्रांचें सशस्त्र सहाय्य मिळत असताहि, भूमिमार्गानें हिंदुस्थानवर होणें हें पहिल्या महायुद्धांत जसें दुर्घट होतें तसेंच या दुसऱ्या महायुद्धांतहि दुर्घटच होतें.

## रासबिहारी बोस

परंतु ह्या दुसऱ्या महायुद्धांत भारताच्या सुदैवानें पहिल्या महायुद्धांत न घडलेली अशी एक अत्यंत अनुकूल युद्धघटना घडून आलेली होती. ती ही कीं, ज्या प्रबळ राष्ट्राचा हात हिंदुस्थानच्या सीमेला सहज पोचत होता तो आशियांतील जपानहि जर्मनी आणि इटली-प्रमाणेंच ब्रिटिश-अमेरिकेशीं युद्ध छेडील असा उत्कट संभव दिसूं लागला. त्यांतहि ह्या संभवनीय संधीचा पुरेपूर लाभ घेऊं शकणारा त्या दिशेनें ज्यानें जपानांत अनेक वर्षें निर्वासितांचें जीवन कंठीत असतां क्रांतिप्रयत्न अखंडपणें चालविले होते आणि ज्यानें जपानमध्यें राजकारणांत नि सैन्याधिकाऱ्यांतहि संधान जुळवून ठेवलें होतें, असा एक हिंदू क्रांतिवीर जपानांतच विद्यमान होता. त्याचें नांव होतें रासबिहारी बोस !

जपानमधून अधूनमधून ते मला जीं पत्रें पाठवीत त्यांत सांकेतिकपणें क्रांतिकारक चळवळीचें वृत्तहि कळवीत असत. युरोपांत जेव्हां हें दुसरें ब्रिटिश-जर्मन महायुद्ध चालू झालें तेव्हांपासून माझ्यावर नि त्यांच्यावरहि ब्रिटिश हेरांची वक्रदृष्टि अधिकच कडकपणें वळल्यामुळें त्यांचीं कधींमधीं येणारीं पत्रेंहि टपालानें येणें बंद झालें. परंतु एकदां दोनदां रासबिहारी बाबूंनीं कोणच्या मार्गानें काय कीं, पण दोघा बौद्ध भिक्षूंच्या हातीं मला



***He was going to outbid Gandhiji But . . . .***

दोन पत्रें धाडलीं. त्यांपैकीं पहिल्या पत्रांत ' ह्या दुसऱ्या महायुद्धांत जर्मनी, इटली नि जपानशीं संधि करून मागील महायुद्धा-प्रमाणेंच त्यांच्या द्रव्याच्या, शस्त्रास्त्रांच्या नि सेनानींच्या सहाय्यानें भारतीय क्रांतिसैन्य उभारलें जात आहे. तिकडेहि सिद्धता असावी असें सुचवलें होतें. मीं लेखी कांहींच उत्तर न देतां तोंडीं विचारलें होतें. कीं ' ब्रिटिशांच्या विरुद्ध स्वतः जपान युद्ध पुकारणार आहे हें नक्की आहे का ? जर्मनविजयाची लाट प्रबळ-पणें चढती आहे तोंवरच जपान उठेल तर लाभ. ' रासबिहारींच्या दुसऱ्या पत्रांत स्पष्ट-पणें उत्तर आलें कीं " चालू वर्षाच्या (१९४० च्या) आंतबाहेर जपान ब्रिटिशां-विरुद्ध युद्धघोषणा करणार आहे हें निश्चित दिसतें. "

### दोघेहि साम्राज्यवादीच

ही दुसऱ्या महायुद्धाची संधि साधून ब्रिटिशांविरुद्ध क्रांतियुद्ध पेटविण्यासाठींच मीं प्रकटपणें सैनिकीकरणाची चळवळ देशव्यापी प्रमाणावर तात्कालिक हातीं घेतली. प्रारंभीं-प्रारंभीं कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनीं ब्रिटन, फ्रान्स प्रभृतींचा पक्ष हा लोकसत्ताक असल्यानें आणि त्यांची घोषणा to save democracy in the world ही असल्यानें ब्रिटिशांच्या पक्षास उचलून धरण्याचें ठरविलें. आमचें मात्र स्पष्ट धोरण असें होतें कीं, " ब्रिटनप्रभृति राष्ट्रांची जूट जें म्हणत आहे, कीं, जगांतील लोक-सत्तेच्या नि स्वातंत्र्याच्या संरक्षणार्थंच काय ते आम्ही महायुद्धांत उतरलों आहोंत आणि हिटलर-मुसोलिनीप्रभृति ब्रिटनच्या शत्रूंची महायुद्धांतील फळी ही मात्र स्वतःचें साम्राज्य जगावर लादणाऱ्या आक्रमकांची नि आत-तायींची आहे, त्या ब्रिटनच्या घोषणेवर आमचा लवलेश विश्वास नाहीं. या महायुद्धांत पडलेलीं ब्रिटनपक्षीय आणि जर्मनपक्षीय सर्वच राष्ट्रें आपआपल्या स्वार्थासाठीं लढत असून दोघेहि सारखेच साम्राज्यवादी आहेत. ब्रिटन-फ्रान्सप्रभृति ज्या राष्ट्रांचीं साम्राज्यें आज विस्तारलेलीं आहेत तीं त्यांचीं साम्राज्यें नष्ट होऊं नयेत म्हणून लढत आहेत. आणि जर्मन-इटलीप्रभृति ज्या राष्ट्रांचीं तशीं साम्राज्यें आज नाहींत ते तशीं साम्राज्यें संपादण्यासाठीं लढत आहेत. अशा वेळीं कोणाचा पक्ष घ्यावा हा तत्त्वाचा प्रश्न नाहीं. हिंदुस्थानच्या अंतर्गत परिस्थितींत हिंदुस्थानच्या रक्षणासाठीं आणि भविष्य कालींहि हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठीं जें अत्यंत उपयुक्त नि व्यवहार्य साधन ठरणारें आहे तें सैनिकीकर-णाची चळवळ हेंच होय. यास्तव ब्रिटिशांच्या हिंदी सैन्यांत शक्य तितक्या हिंदूंनीं भरती व्हावें. प्रत्यक्ष युरोपीय युद्धक्षेत्रांत लढण्याचें शिक्षण घ्यावें आणि हिंदुस्थानच्या रक्षणा-साठीं शस्त्रसज्ज व्हावें. "

### सुभाषचंद्रांची भेट

योगायोगानें या संधीस दि. २२ जून सन १९४० या दिवशीं त्या वेळचे देशगौरव आणि आतांचे नेताजी सुभाषचंद्र बोस हे अकस्मात् सावरकर-सदनांत येऊन मला भेटले. सुभाषबाबू मुंबईला मुख्यतः हिंदु-मुसलमानांच्या एकीचा प्रश्न नित्याचा मिट-वून टाकण्यासाठीं आलेले होते. वृत्तपत्रांत जी भाषा त्या वेळेस वापरलेली मीं वाचली तींतच बोलावयाचें म्हणजे ' बॅरिस्टर जिनांची समजूत घालण्यासाठीं ते गांधीजींच्याहि पुढें चार पावलें जाणार होते. " [He was going to outbid Gandhiji. ]


ही वृत्तपत्रीय भाषा सोडली तर ते स्वतःच मला मनमोकळे हंसतहंसत म्हणाले, "अहो, मी जिनांना आतांच भेटून आलों. पण काय गंमत सांगावी ! त्यांनीं मला विचा-

रलें "मिस्टर सुभाषबाबू, पण तुम्ही कोणाच्या वतीनें हीं तडजोडीचीं बोलणीं करावयास येतां आहांत? मी (सुभाष) म्हणालों, 'कॉंग्रेसच्या वतीनें'. त्यावर जिना म्हणाले, "पण तुम्हांला तर कॉंग्रेसनें बहिष्कारलेलें आहे." 'मी (सुभाष) म्हणालों, 'पण forward Block चा तरी मी अधिकृत पुढारी आहें कीं नाहीं? त्याच्या वतीनें मी बोलूं शकतों.' त्यावर जिना म्हणाले, 'परंतु जर तुम्ही मला मुसलमानांचा पुढारी म्हणून हिंदु-मुसलमानांच्या तडजोडीकरितां भेटत असाल वर हिंदूंच्या प्रतिनिधित्वाचा अधिकार असलेल्या कोणाशीं तरी बोलण्यांत अर्थ आहे. तुमचा forward Block स्वतःला हिंदू संस्था म्हणवून घेतो आहे का? नाहीं.' मी (सुभाष) म्हणालों. 'तर मग मी एक हिंदू म्हणून तरी, हिंदु-मुसलमान तडजोडीविषयीं बोलूं इच्छितों.' त्यावर जिना म्हणाले, 'तर मग तुम्ही प्रथम सावरकरांना जाऊन भेटा, हिंदूंचें प्रतिनिधित्व ते करूं शकतात. व्यक्तिव्यक्तीशीं चर्चा करून काय उपयोग; सावरकर आले तर आपण कांही चर्चा करूं.' तेव्हां मी (सुभाष) जिनांच्या घरून निघालों नि आपल्याकडे तडक आलों. असें म्हणून सुभाषबाबू एकदां स्वतःच पोटभर हंसले. नंतर पुन्हां म्हणाले, "नाहींतरी मला आपल्याकडे एकदां यावयाचें होतें या पाळीला."

सुभाषबाबूंनीं काढलेल्या या हिंदुमुसलमान एकीच्या प्रयत्नाविषयीं मीं काय चर्चा केली हें तूर्त सोडून देऊं. परंतु मीं त्यांना मुख्य प्रश्न विचारला, 'हें सगळें आतां बाजूस ठेवा. मला इतकें सांगा कीं, चालू महायुद्धाच्या संकटांत ब्रिटन सांपडलें असतां आपणांसारख्या पुढाऱ्यांनीं हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत राहून हालवेलचा पुतळा कलकत्त्याच्या मार्गातून उखडून टाकणाऱ्या चळवळीसारख्या सापेक्षतः अगदीं क्षुल्लक चळवळीपायीं ब्रिटिशांच्या बंदिगृहांत जाऊन सडत पडण्यांत कांहींतरी अर्थ आहे का?"

## सूतोवाच

तेव्हां किंचित् निराशेच्या स्वरांत सुभाषबाबू उत्तरले, "जनतेंत कांहींतरी करून ब्रिटिशांविरुद्ध क्षोभ चेतवीत राहिलें पाहिजे. नाहींतर करावें तरी काय?" मीं म्हटलें, "आपली तळमळ मी जाणतों. पण पुन्हां



या क्रिप्स-सावरकर भेटीची हकीकत डॉ. मुंजे अशी सांगतात–'क्रिप्स व त्यांचे सहकारी एका बाजूस बसले नि समोर मी, सावरकर, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी व इंद्रप्रकाश बसलों. क्रिप्सनें आमच्या हातांत त्यांची जी योजना होती तिच्या टाईप केलेल्या प्रति दिल्या. एक प्रत क्रिप्सनें आपल्या हातांत ठेवली. आम्ही पहिल्यापासून सर्व योजना वाचूं लागलों. पांचसात मिनिटें होतात न होतात तोंच सावरकरांनीं एका प्याऱ्यावर बोट ठेवलें व क्रिप्सला विचारलें कीं, "यांत कांहीं बदल होणार कां?" क्रिप्स म्हणाले, "मुळींच नाहीं." सावरकरांनीं तो कागद लगेच क्रिप्सकडे टाकला व उठून चालूं लागले. तात्याराव निघाले तसे आम्हीहि सर्व उठून चालूं लागलों. क्रिप्सनें आपल्या सेक्रेटरीस बोलावणें पाठवून तात्यारावांना परत बोलावून विनंती केली की, "आपण या प्याऱ्याशिवाय इतर विषय जे आहेत त्यांसंबंधीं बोलूं व वाटाघाटी करूं." सावरकर म्हणाले, "इतर विषयांच्या वाटाघाटी करण्यांत काय अर्थ आहे? या तुमच्या योजनेंत आणि मीं दाखविलेल्या प्याऱ्यांत स्वयंनिर्णय–प्रांतांना फुटून निघण्याचा अधिकार – असून त्यांतच पाकिस्ताननिर्मिति आहे." बाहेर आल्यावर लगेच सावरकरांनीं पत्रक काढून योजना फेटाळल्याचें प्रगट केलें.



खड्गा !
तुझा विजय असो !

आपल्यास विचारतों कीं, गव्हर्नर जनरलसुद्धां हे सहस्रावधि सत्ताधारी ब्रिटिश पीडक (Tyrents) हिंदुस्थानांत राज्य करीत असतां हालवेलमारख्या मेलेल्या ब्रिटिश प्रपीडकांचे दगडी पुतळे हालविण्यांतच ज्याचा व्यय होतो तो जनक्षोभहि निरर्थकच नाहीं का? आणि त्यापायीं तुमच्यासारख्या पुढाऱ्यानें बंदिवासांत पडणें म्हणजे शत्रूला जें हवें तेंच नेमकें आपण होऊन करणें नव्हे काय? खरें राजकारण म्हणजे शक्यतर शत्रूला बंदिगृहांत डांबावें, स्वत:ला नव्हे: हें पाहा, सुभाषबाबू मी आपल्याला स्पष्टच विचारतों, आपण सशस्त्र क्रांतिकारांशीं सक्रिय नसलांत तरी संबंध राखीत आला आहांत. आपण गुप्तता राखूं शकतां. मागेंही तुम्ही कॉंग्रेसअध्यक्ष असतां आपली माझी एकदां अंतस्थ भेट झाली होती तितक्याच विश्वासानें नि त्याच सूत्रांस धरून मी आपणांस असा आग्रह करूं इच्छितों कीं, सध्यां ब्रिटिश हिंदी सैन्यामध्यें शक्य तितक्या हिंदूंची भरती करण्यासाठीं हिंदुमहासभेच्या ढालीखालीं मीं जें चालविलें आहे तें मूलत:



माणूस

क्रांतिकारक आंदोलन आहे. आपण त्याच्या विरुद्ध प्रचार करता तो मी जाणून आहें. आपल्याला वाटले की त्यायोगें कांग्रेसमधल्या तुम्हालाहि मवाळ वाटणाऱ्या इतर पुढाऱ्यांप्रमाणे मी ब्रिटिशाना मनुष्यबळाचे सहाय्य देत आहे. पण वस्तुस्थिति सागतों ती ऐका. येथें मी त्यांना पहिल्या महायुद्धातील सशस्त्र क्रातिकारकानी जर्मनीशी केलेल्या तुल्यारिमित्र संधीची आणि ब्रिटिश हिंदी सैन्यातील हाती पडलेल्या हिंदी सैनिकांतून क्रांतिसैन्य कसें उभारले गेले इत्यादि प्रकरणाची माहिती सागितली. मी पुढें म्हणालो की, "रासबिहारी बोसाचे हें ताजें पत्र पाहा. ह्यावरून असे दिसतें की जपान ह्या वर्षाच्या आत युद्ध पुकारील असा उत्कट संभव दिसत आहे. जर असें झाले तर आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं जर्मनी-जपानच्या अद्ययावत् शस्त्रास्त्रानिशी नि लढाईंत मुरलेल्या सहस्रावधि हिंदी सैनिकांनिशी ही हिंदुस्थानवर बाहेरून स्वारी करण्याची कधीहि न आलेली सुवर्णसंधि आपणास साधणारी आहे. अशा वेळी स्वदेशांत अत्यंत क्षुल्लक नि बोलमांड चळवळीपायीं आपल्यासारख्या पुढाऱ्याने स्वत:स बळेंच इंग्लिशांकडून पकडून घेऊन, बंदिवासात बळेंच शिरून कुजत पडणे सर्वस्वीं हानिकारक आहे. कांग्रेस किंवा तत्सम नि:शस्त्र प्रतिकारवादी संस्थेच्या कोणत्याहि पुढाऱ्यापेक्षा ब्रिटिश सत्ता आपणासच प्रथमत. पकडण्यास टपलेली आहे. अशा वेळी रासबिहारीसारखे अनेक सशस्त्र क्रातिकारक पुढारी जसे हिंदुस्थानातून ब्रिटिशांच्या हातावर तुरी देऊन जपान, जर्मनी येथें निसटून गेले तसे आपणहि तत्काल हुलकांडी देऊन निसटून जावे. तिकडे इटली-जर्मनीच्या हाती पडलेल्या सहस्रावधि हिंदी सैनिकांचें पुढारीपण उघडपणे स्वीकारावें. हिंदुस्थानच्या संपूर्ण स्वातंत्र्याची प्रकट घोषणा करावी आणि जपान युद्धात पडताच साधेल त्या मार्गानें बंगालच्या उपसागरांतून म्हणा किंवा ब्रह्मदेशातून म्हणा हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्तेवर बाहेरून स्वारी करावी. असा काही तरी सशस्त्र नि साहसी पराक्रम केल्यावांचून आपण हिंदुस्थान स्वतंत्र करूं शकणार नाही. असा पराक्रम नि साहस करण्यासाठी जी दोन तीन माणसें आज मला दिसतात त्यांत आपण एक आहांत. त्यातहि माझा आपणांवरच डोळा आहे."

इतकें बोलून मी थांबलों. सुभाषबाबू कोणत्या तरी विचाराच्या तंद्रीत मनुष्य खाली पाहात असतो तसें काही वेळ स्तब्धपणें खाली पाहत बसले. मी केलेल्या सूचनेवर त्यांनी झटपट काहीतरी हो किंवा ना म्हणावे असा माझा कोणताहि आग्रह नाही हें दाखविण्याकरिता मी बळेंच तो विषय अगदीं सोडून देऊन त्यांच्या My strange illness ह्या लेखाचा विषय काढला. पण तेच होऊन मला म्हणाले, 'मी आतां प्रथम कलकत्त्याला जाऊन तेथें काय घडते ते पाहतों आणि मग माझा पुढचा कार्यक्रम कोणता तो ठरवीन. इकडे आल्यास आपल्याला पुन्हा भेटेन.' यापेक्षा ह्याविषयीं अधिक उलगडा मी विचारला नाही व त्यानीहि केला नाही.

थोड्याच दिवसांत सुभाषबाबू कलकत्याला गेले आणि जाताच पुतळाप्रकरणी पकडले जाऊन बंदिगृहात टाकले गेले म्हणून अपेक्षित बातमी आली.

बंदिगृहात पडल्यानंतर मात्र त्यांच्या मनातील हिंदू-मुस्लीम ऐक्य, हालवेलचा पुतळा प्रभृति पूर्वीचे जे काय असतील नसतील ते सारें सापेक्षत: क्षुल्लक नि वायफळ कार्यक्रम झिडकारले जाऊन त्याचे सारे प्रयत्न बंदिवासांतून कशी तरी सुटका करून घेऊन जर्मनी-जपानकडे निसटून जाण्याचें साहस करण्यावरच केंद्रित झाले हें आता प्रसिद्ध नि सुप्रसिद्ध झालेल्या सर्व वृत्तावरून उघडच आहे. त्यानी बंदिवासात अन्नत्याग केला. ब्रिटिश शासनाच्या मानहानि करणाऱ्या अटी मानूनहि पण सुटका करून घेतली आणि नंतर पुन्हा बंदिगृहाकडे परतण्याआधीच अत्यंत धाडसानें नि कौशल्याने ते ब्रिटिश सत्तेच्या हातावर तुरी देऊन हिंदुस्थानातून निसटले.

## दोन पुरावे

यापुढचें सुभाषचंद्रांचें कार्य, त्याचा जर्मनी-इटलीशी झालेला तुल्यारिमित्रसंधि, जपानमध्यें पाणबुडीतून आगमन, रासबिहारीच्या क्रांतिसैन्याचे नेतृत्व, आझाद हिंद सेनेची स्थापना, "चलो दिल्ली" ची रणगर्जना इत्यादि सर्व इतिहास ताजाच असल्याने त्याची पुनरुक्ति न करता येथें या संबंधीचे दोन पुरावेच तेवढे सादर केले तरी पुरेसें आहे.

[ १ ] सिंगापूर येथील 'आझाद हिंद' नभोवाणीवरून सन १९४४ च्या जूनच्या २५ व्या दिनाकास प्रक्षेपित झालेल्या सरसेनापति सुभाषबाबूंच्या भाषणांत ते म्हणाले— "When due to misguided political whims and lack of vision almost all the leaders of Congress party have been decrying all the soldiers in Indian Army as mercenaries, it is heartening to know that Veer Savarkar is fearlessly exhorting the youths of India to enlist in the Armed Forces. These enlisted youths themselves provide us with trained men and soldiers for our Indian National Army." [ कांग्रेसमधील बहुतेक अदूरदर्शी पुढारी ब्रिटिश हिंदी सैन्यास केवळ भाडोत्री नि पोटभरू म्हणून सारखे निंदीत असता ही उत्साहदायी गोष्ट आहे की वीर सावरकर निर्भयपणे हिंदी तरुणाना सैन्यात शिरा म्हणूनच सारखे उत्तेजीत आहेत. ब्रिटिश हिंदी सैन्यात शिरलेल्या ह्याच हिंदी तरुणांतून आज आमच्या हिंदी राष्ट्रीय सैन्याला, I. N. A. ला, समरकलेत प्रवीण नि मुरलेल्या प्रशिक्षितांचा (Trained men) नि सैनिकाचा पुरवठा होत आहे.

[ २ ] सन १९५४ ऑगस्टमध्यें एक प्रसिद्ध जपानी ग्रंथकार श्री. जे. जी. ओहसावा ह्यांनीं 'The two great Indians in Japan' ह्या नावाचें पुस्तक प्रसिद्धिले आहे. दुसऱ्या महायुद्धात जपानी सैन्य सिंगापूरवर चालून गेले तेव्हा तेथील ब्रिटिश हिंदी सैन्याशी जपानी सैन्याची लढाई चालली असता सेनापति रासबिहारी बोसाच्या क्रातिकारक सैन्याची I. N. A. ची तुकडीहि ब्रिटिशाशी लढत होती. ह्या ग्रथांतील त्या प्रसगासबधीचा एक तुटक उतारा पाहा.

February Japanese attacks on Singapore began. The resistance of British Indian force was strong. The Imperial Guards (The Japanese) H. Q. had to encounter many difficulties.

The chief of the I. N. A. proceeded alone to the front line and talked to Indian Officers and Soldiers in the British Army not to be false

to their love of India and the independance of India in strong heart-stirring words. Miracle accomplished! The shooting was stopped. **Savarkar's militarization policy in World War II began to shape.**

(After the fall of Singapore) surrendered British soldiers numbered some 45,000 and Indians too. I. N. A. absorbed these Indians & developed into a formidable force of 50,000.

### सामायिक श्रेय

वाहेरून ह्या क्रांतिकारक I. N. A. चे *सैनिक ब्रिटिशांवर चाल करून येत असताच* हिंदुस्थानच्या आतहि नि.शस्त्रवादी म्हणविणाऱ्या कॉंग्रेसनें प्रतिकाराचा उठाव केला. Quit India च्या कॉंग्रेसी आंदोलनानें देशात मोठीच खळबळ उडवून दिली. यांत घ्यानांत घेण्यासारखी गोष्ट मात्र ही की, कॉंग्रेसचे मान्यवर पुढारी बंदिवासात पडल्यावरोवर कॉंग्रेसच्या शेकडों नेत्यानी आणि अनुयायानी प्रतिकाराचा मार्ग जो पत्करला तो सशस्त्र क्रातिकारकाचाच. ते पटापट भूमिगत झाले आणि ब्रिटिश सत्तेविरुद्ध त्यानी सशस्त्र प्रतिकाराचा एकच रक्तपाती धुमाकूळ देशात उडवून दिला. शेवटी नि:शस्त्रवादी आणि अहिंसक कॉंग्रेसच काही काळ सशस्त्र क्रातिकारकाची मठी बनली.

अखेरीस महायुद्ध सपले. जपान शरण गेला. हिटलर–मुसोलिनीचा सपशेल पराजय झाला. अमेरिका–ब्रिटन–फ्रान्स ही त्रयी पुन्हा विजयी ठरली.

पण ब्रिटनपुरता तरी त्याचा विजय हा, जिवावरच बेतले होते ते शेपटावर गेले, इतक्याच पुरता होता. ब्रिटन देश जरी वाचला तरी त्या दोन महायुद्धाच्या माऱ्याखालीं ब्रिटनच्या साम्राज्यशक्तीचा आणि उन्मत्तपणाचा चक्काचूर झाला. हिंदुस्थानपुरते बोलायचें तर ब्रिटनची त्या महायुद्धाच्या शेवटी अशी स्थिति झाली होती की (१) हिंदुस्थानातील भूदल, नौदल नि आकाशदल ह्या तीनहि विभागातील झाडून साऱ्या हिंदी सैन्यानें ब्रिटिशविद्रोहाचा उठाव केलेला *होता किंवा तें सैन्य तसा उठाव करण्याच्या* मन:स्थितीत होतें. (२) १८५७ मध्यें हिंदी सैन्य ब्रिटिश सत्तेवर जेव्हा उलटलें तेव्हा सहस्रावधि जातिवत ब्रिटशाचे नवें सैन्य ब्रिटन हिंदुस्थानात धाडूं शकले आणि त्या विद्रोहाचा नायनाट केला गेला. तशी परिस्थिति आता राहिली नव्हती. (३) ह्या पेचात सापडल्यामुळेंच हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्यावाचून ब्रिटनला गत्यतरच उरले नव्हते.

Independance of India Act च्या वेळी ब्रिटिश पार्लमेंटमध्यें साम्राज्यसत्ता सोडण्याचा प्रसग आल्यामुळें दु खी कष्टी झालेल्या चर्चिलच्या एका प्रश्नास ॲटलीनी जें उत्तर दिले त्यात स्वातत्र्यप्राप्तीची हीच मीमांसा त्यानी जवळजवळ मान्य केलेली आहे. ॲटली म्हणाले–

"Britain is transferring power due to the fact that (1) The Indian mercenary army is no longer loyal to Britain and (2) Britain cannot afford to have a large British Army to hold down India."

ही सारी वस्तुस्थिति स्पष्ट असतांनाहि कोणी भारताला अहिंसेने स्वातत्र्य मिळाले, ब्रिटनचे हृदयपरिवर्तन झालें असे आग्रहानें प्रतिपादू लागला तर तो पक्षपातच नव्हे काय? निदान इतिहासाची तरी साक्ष तशी नाही हें दाखविण्यासाठीच १९२० च्या नंतरचा क्रातिकारकाच्या चळवळीचा उल्लेख येथें एवढ्या विस्ताराने केला. पण पक्षपात माझ्याकडूनहि होऊ नये म्हणून मी तरी असेच मानतों की, स्वातंत्र्यसपादनाचें श्रेय हें सामुदायिक श्रेय आहे. परदास्यातून भारताची मुक्तता करण्याचे श्रेय हे सशस्त्र किंवा नि:शस्त्र अशा कोणत्याहि एका पक्षाचे नसून ते गेल्या दोन तीन पिढ्यातील सर्व पक्षाच्या सर्व स्वदेश-निष्ठ कार्यकर्त्यांचे समाईक श्रेय आहे. अशा नि:पक्षपात भूमिकेवरून जें जसें घडले ते तसेच सागणारा जो इतिहास लिहिला *जाईल तोच खरा भारतीय स्वातत्र्याचा* इतिहास! बाकी सारा प्रचार आणि पक्षपात.

### तीन आक्षेप

जसा सशस्त्र क्रातिवाद तसाच हिंदुत्ववाद हाहि भारतीय इतिहासाच्या मीमासेवरच आधारित होता. हिंदुस्थानांत हिंदू ही जात *कशी ठरते? अमेरिकेत अमेरिकन्स हें राष्ट्र,* नीग्रो ही जात; जर्मनीमध्यें जर्मन्स हें राष्ट्र, ज्यू ही जात, हें जितकें सरळ आहे तितक्याच सरळपणे हिंदुस्थानात हिंदू हे राष्ट्र आणि मुसलमान-ख्रिश्चन प्रभृति समाज या जाति हे मान्य व्हायला पाहिजे होते. पण हे सरळ गणित मान्य होत नव्हते म्हणूनच मला सैनिकीकरणाच्या चळवळीवरोबरच हिंदुत्वाच्या उत्थानाचे कार्यहि हातीं घेणें भाग पडले. माझ्या एका चरित्रकाराने या बाबतीत माझी भूमिका विशद करताना म्हटले आहे ते वस्तुस्थितीला धरून आहे. तो लिहितो–

"सावरकरानी खऱ्या निधर्मी, समान तत्त्वावर आधारलेल्या सयुक्त हिंदी राष्ट्राच्या कल्पनेचा ध्येय म्हणून कधीच धिक्कार *केलेला नाही. त्याचा विरोध* होता तो आज ते हिंदी राष्ट्र अस्तित्वात आहे असे मानून, तसे भोळसट राजकारण करणाऱ्याना हिंदी राष्ट्रवादाचे खरे शत्रु कोण आहेत हे सावरकरानी स्पष्ट केलें. सावरकराचे हिंदी राष्ट्रवादावरील तात्त्विक आक्षेप प्रामुख्यानें तीन होते. पहिला म्हणजे,–धार्मिक, वाशिक सास्कृतिक नि असेच इतर बध असणाऱ्या लोकाना, केवळ प्रादेशिक एकत्व, किंवा वसतिस्थानाचें एकत्व एवढी एकच गोष्ट बहुधा कोठेंच एक राष्ट्र निर्माण करू शकत नाही. कारण, मनुष्यसमाज हा केवळ एका ठिकाणी राहतो म्हणून एकात्म होत नाही. त्याला इतरहि धर्म, सस्कृति, भाषा यासारखी कारणें असतात. भारतात हिंदू, मुसलमान आदि लोक एकत्र राहणारे असले तरी सास्कृतिक वा सामाजिक दृष्ट्या सर्व भारतीय समाज एकजीव झालेला नाही. त्यामुळें भारतीय राष्ट्रवाद हें ध्येय म्हणून ठीक असले तरी ती वस्तुस्थिति नाहीं. दुसरा आक्षेप असा की, लोकाना स्वभावसिद्ध राष्ट्र बनवयास लावणारा सर्वांत महत्त्वाचा घटक जो एकात्म एक राष्ट्र बनण्याची इच्छा तो घटकच येथें नाही. मुसलमानाना ब्रिटिशानीं या बाबतीत चिथवले हें खरे असले, तरी मुसलमानाना हिंदूबद्दल कधीहि विश्वास वाटला नाहीं आणि त्यामुळें ते सर्वस्वी राष्ट्रीय चळवळीपासून दूर राहिले. कारण त्याच्या दृष्टीने स्वराज्य हें हिंदू राज्यच होणार होते. त्यामुळें हिंदी राष्ट्रवाद हा त्याना कधीच मान्य झाला नाही. ब्रिटिशानीहि त्याची अलगपणाची भावना चिथवली. सावरकरांचा तिसरा आक्षेप म्हणजे, मुसलमान हे धर्मदृष्ट्या

वेगळे असतात, याचा अर्थ ते राष्ट्रदृष्टयाहि वेगळे असतात. म्हणून हिंदी राष्ट्रवाद ही वस्तुस्थिति नसून तें ध्येय आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं, भारतांत रायकीय आकांक्षा जिवंत असलेला, संस्कृतीनें समरस न झालेला स्वतःचा अलगपणा टाकून न देतां स्वतंत्र राष्ट्रीयत्वाची घोषणा करणारा मुसलमान समाज नि हिंदू राष्ट्र यांचा संघर्ष या देशांत चालू आहे." [भा. कृ. केळकर—सावरकर दर्शन—पृ. १६८-१६९]

ही वस्तुस्थिति ओळखूनच संयुक्त हिंदी राज्याच्या ध्येयाकडे आपल्याला वाटचाल केली पाहिजे, हा माझ्या हिंदुत्व-आंदोलनाचा मुख्य गाभा होता. कर्णावती-नागपूर येथील अगदीं पहिल्यादुसऱ्या अध्यक्षीय भाषणांतहि मीं हीच भूमिका स्पष्टपणें मांडलेली आहे. 'हिंदी राज्याचे नागरिक सर्वाआधीं आम्ही होऊं' हें प्रकट करतांना मीं म्हटलें होतें—

## सर्वाआधीं आम्ही


संयुक्त हिंदी राज्याचें स्वप्न जर पहिल्यानें कोणाला पडलें असेल तर तें हिंदूंनाच होय. आपल्या त्यागांनीं आणि झगडयांनीं तें राज्य कोणीं आजच्या व्यवहार्य राजकारणाच्या कक्षेंत आणलें असेल तर तेंहि पुन्हां हिंदूंनींच होय. आपल्या बलाबलाचा योग्य विचार करून हिंदू हे एक समान नि संयुक्त हिंदी राज्य स्थापण्याच्या हेतूनें चाललेल्या ह्या सार्वलौकिक झगडयांत आपल्या अहिंदू वर्गातील देशबांधवांची सहकारिता मिळविण्याला केव्हांहि अनुकूलच होते व आहेत. हिंदुस्थानांत आपली प्रचंड बहुसंख्या आहे, अहिंदु धर्म नि विशेषतः मुसलमान हे राष्ट्रीय झगडा चालू असतांना कोठेंच आढळत नाहींत, नि झगडयांचीं फळें तोडण्याच्या वेळीं मात्र नेमके आघाडीस असलेले आढळतात, आणि आपण एकटेच आजवर सर्व लढा लढत नि त्यांतले आघात सोशीत आलों आहोंत — या सर्व गोष्टींची जाणीव असूनसुद्धां तें एकीकडे ठेवून, हिंदु हे सर्वांचें संयुक्त हिंदी राष्ट्र धनविण्यास समुत्सुक आहेत, आणि आपले कोणतेहि राखून ठेवलेले असे स्वतंत्र हक्क, वा सत्ता, वा अधिकार हिंदुस्थानांतील अहिंदुवर्गावर मुळींच लादूं इच्छित नाहींत.


पण तें हिंदी राज्य मात्र निर्भेळ हिंदीच असूं द्या. त्या राज्यानें मताधिकार, नोकऱ्या, अधिकाराचीं स्थानें, कर यांच्या संबंधांत धर्माच्या व जातीच्या तत्त्वावर कसल्याहि मत्सरोत्तेजक भेदाभेदांना मुळीच थारा देऊं नये. कोणताहि मनुष्य हिंदू आहे कीं मुसलमान आहे, कीं ख्रिस्ती आहे, कीं ज्यू आहे इकडे लक्ष दिलें जाऊं नये. त्या हिंदी राज्यांतील सर्व नागरिक सर्वसामान्य लोकसंख्येंतील त्यांची धार्मिक किंवा जातीय शेंकडेवारी विचारांत घेतली न जातां त्यांच्या त्यांच्या वैयक्तिक गुणागुणांनुसार वागविलें जाऊं द्या. इंग्लंड किंवा अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें यांसारख्या जगांतील इतर प्रत्येक राष्ट्रांत असल्याप्रमाणें देशांतील प्रचंड बहुसंख्य लोकांना समजत असेल तीच भाषा नि तीच लिपि त्या हिंदी राज्याची राष्ट्रीय भाषा नि राष्ट्रीय लिपि होऊं द्या...... कोणतीहि जाति किंवा पंथ, वंश किंवा धर्म विचारांत न घेतां 'एक मनुष्य एक मत' असा सर्वसामान्य नियम होऊं द्या. अशा स्वरूपाचें हिंदी राज्य जर दृष्टीपुढें धरावयाचें असेल तर हिंदुसंघटनावादी, स्वतः हिंदुसंघटनांच्याच हितार्थ त्या राज्याला अंतःकरणपूर्वक पहिल्यानें आपली निष्ठा अर्पितील.

## शृंखलांवर प्रहार

पण ना असें निर्भेळ हिंदी राज्य अस्तित्वांत आणण्यांत हिंदी राष्ट्रवाद्यांना यश लाभलें, ना हिंदुत्वनिष्ठ देशाच्या फाळणीला यशस्वी प्रतिकार करूं शकले. याला आमच्या नेत्यांची राजकीय अदूरदृष्टि व भ्रांत राष्ट्रकल्पना ह्या कारणीभूत असल्या तरी दोषाचा बराच वांटा हिंदुसमाजाच्या असंघटित व जातिनिष्ठ व्यवस्थेकडेहि जातो. संयुक्त व समान हिंदी राज्याचा ध्येयवाद पेलूं शकेल, त्याला मारक ठरणाऱ्या जातीयवादी धर्मांध शक्तीशीं यशस्वी झुंज देऊं शकेल अशा अद्ययावत् ज्ञान-विज्ञानांचें ग्रहण केलेला, बुद्धिवादाची व विज्ञानाची कास धरून जाचक रूढीच्या बंधनांतून मुक्त झालेला, संघटित व जागरूक हिंदु समाज अस्तित्वांत असता तर इतिहासाला कांहीं वेगळीच कलाटणी मिळाली असती. माझ्या रत्नागिरींतील सामाजिक क्रांतिकार्याची उठावणी तरी असा हिंदु समाज अस्तित्वांत यावा याच प्रेरणेंतून उगम पावलेली होती. व्यापक अशा हिंदुत्वविकासाचेंच तें एक उपांग होतें. गांधीजींच्या अस्पृश्योद्धारांत भूतदयेची दृष्टि होती, डॉ. आंबेडकरांच्या आंदोलनामागें दलितोद्धाराची प्रेरणा होती; पण माझी भूमिका मात्र मुख्यतः हिंदुसंघटनवाद्याची होती. हिंदु समाज प्रबळ आणि विजिगीषु होण्यासाठीं ज्या रूढींच्या बेडया, विचारांचीं जळमटें त्यानें तोडून फेकून देणें अवश्य आहे. तेवढयावरच मीं लिखाणांतून लक्ष केंद्रित केलें, तेवढें यश पदरांत पाडून








रोटीबंदी तोडण्यासाठीं रत्नागिरींत उपाहारगृह.
स्पृश्यास्पृश्यांचा सरमिसळ चहापाणी
काळ– सुमारें **तीस वर्षांपूर्वी**

ते शेंकडों महार जेन्हां स्वातंत्र्यवीर सावरकरांभोंवतीं दाटी करून आपलीं अडाणी सुखदु:खें सांगत बसत तेन्हां किती कौतुक वाटे ! हा सावरकर-ब्राह्मणांतील ब्राह्मण, विद्वानांतील विद्वान्— ज्याची राष्ट्रीय सेवा, त्याग नि तपस्या या पिढींत अतुलनीय— तो आपला वर्णाहंकार व ज्ञानाहंकार विसरून समाज आज ज्यांची सावली अमंगल मानतो त्यांच्या दाटींत त्या महारांतील जे घामट त्यांना स्वत: स्नान घालीत त्यांच्या पाठीवरून हात फिरवीत उभा !

—सत्यशोधक

[ ३ मे १९३१ च्या अंकांतील अग्रलेखावरून ]



तुम्ही आम्ही सकल हिंदू।
बंधुबंधू
तो महादेवजी पिता आपुला
चला तया वंदूं॥

घेण्यासाठींच प्रत्यक्ष चळवळीची योजना आंखली. त्या माझ्या बऱ्याच गाजावाजा झालेल्या 'दोन शब्दांत दोन संस्कृति' या लेखाचा शेवटच पाहा.

यास्तव हिंदुराष्ट्रास ह्या काळाच्या तडाख्यांतून वांचायचें असेल तर ज्या ह्या श्रुतिस्मृतिपुराणोक्ताच्या बेडीनें कर्तृत्वाचे हातपाय जखडून टाकले आहेत, ती तोडली पाहिजे. आणि ती सुदैवानें अगदीं आणि सर्वस्वीं आपल्या इच्छेवर अवलंबून आहे. कारण ती बेडी मानसिक आहे. युरोप चार शतकांपूर्वीपर्यंत धर्माच्या अपरिवर्तनीय सत्तेचा असाच दास झालेला होता. आणि त्यापायीं आपल्यासारख्याच दुर्गतीस पोंचला होता. पण त्यानें बायबलास दूर सारून विज्ञानाची कांस धरतांच श्रुतिस्मृतिपुराणोक्ताची बेडी तोडून अद्यावत बनतांच, अप-टु-डेट बनतांच, युरोप गेल्या चारशें वर्षांत आमच्यापुढें चार हजार वर्षें निघून गेला, त्रिखंडविजयी झाला. तसें आमच्या भारतीय राष्ट्रासहि होणें असेल, तर पुरातनी युगाचा ग्रंथ मिटून, हीं प्राचीन श्रुतिस्मृतिपुराणादि शासनें गुंडाळून आणि केवळ ऐतिहासिक ग्रंथ म्हणून संग्रहालयांत सन्मानपूर्वक ठेवून, विज्ञानयुगाचें पान उलटलें पाहिजे. त्या ग्रंथांचा काल काय झालें, इतकेंच सांगण्यापुरता अधिकार. आज काय योग्य तें सांगण्याचा अधिकार प्रत्यक्षनिष्ठ प्रयोगक्षम विज्ञानाचा. अद्यावत्पणांत मागच्या सर्व अनुभवांचें उपयुक्त तें सारसर्वस्व सामावलेलें असतेंच; पण श्रुतिस्मृतिपुराणोक्तांत अद्यावत् ज्ञानाचा लेशहि नसतो. यास्तव अद्यावत्, अप-टु-डेट बनणेंच इष्ट. यापुढें कोणचीहि गोष्ट चांगली कीं वाईट; सुधारणा इष्ट कीं अनिष्ट या प्रश्नाचें उत्तर ती आज उपयुक्त कीं अनुपयुक्त आहे या एकाच प्रत्यक्ष कसोटीवर पारखून दिलें पाहिज; तिला शास्त्राधार आहे का? हा प्रश्न आतां केव्हांहि विचारला जाऊं नये. या विद्वत्परिषदांत, त्या शास्त्रार्थांच्या एरंडाच्या गुऱ्हाळांत, एकहि क्षण यापुढें व्यतीत होऊं नये. एकंदरींत आज उपयोगी आहे ना? मग तें केलेंच पाहिजे! या एका वाक्याच्या एका घावासरशीं जे प्रश्न आम्ही चार हजार वर्षें सोडवूं शकत नाहीं तें चार दिवसांत सुटतील, चार दिवसांत त्या बेडयाच तुटतील.

कोणती गोष्ट राष्ट्राच्या उद्धरणार्थ आज अवश्य आहे – तें बहुधा चटकन सांगतां येतें. प्रयोगानें प्रत्यक्षपणें सिद्ध करून देतां येतें. पण कोणती गोष्ट शास्त्रसंमत आहे तें ब्रह्मदेवालादेखील निर्विवादपणें सांगतां येत नाहीं. आम्ही कोणचाहि ग्रंथ अपरिवर्तनीय आणि त्रिकालाबाधित मानीत नाहीं. श्रुतिस्मृतिप्रभृति सारे पुरातन ग्रंथ आम्ही अत्यंत कृतज्ञ आदरानें आणि ममत्वानें सन्मानतों, पण ऐतिहासिक ग्रंथ म्हणून. अनुल्लंघ्य धर्मग्रंथ म्हणून नव्हे. त्यांतील सारें ज्ञान, अज्ञान आजच्या विज्ञानाच्या कसोटीस आम्ही लावणार आणि त्यानंतर आज राष्ट्रधारणास, उद्धरणास जें अवश्य वाटेल तें बेधडक आचरणार. आम्ही अद्यावत् बनणार, अप-टु-डेट बनणार.

इतका निश्चय होतांच आपल्या प्रगतीला पांच हजार वर्षापूर्वींच्या मागासलेल्या संस्कृतीस जखडून टाकणारी या श्रुतिस्मृतिपुराणोक्ताची मानसिक बेडी तुटून आमच्या कर्तृत्वाचे हात मोकळे झालेच समजा. मग त्या मुक्त हस्तांनीं ज्या बाह्योपाधि आमच्या उन्नतीच्या मार्गांत आडव्या येत आहेत वा येतील त्यांचेंहि डोकें ठेंचून वाट मोकळी करणें आम्हांस आजच्याहून शतपटीनें सुलभ झाल्यातांचून कदापि राहणार नाहीं.


### सारेच दोषाचे वांटेकरी

ह्याच मूलभूत हिंदुत्वविकसनाच्या दृष्टिकोनांतून मीं सामाजिक क्रांतीकडे पाहिल्यामुळें माझ्या भिन्नभिन्न प्रश्नांवरील मीमांसा किंवा उपाययोजना इतरांपेक्षां कांहीं बाबतींत वेगळया ठरल्या. जातिभेदनिर्मूलनाचाच प्रश्न घेऊं. याबावत माझी भूमिका अशी कीं,

[१] आनुवंशिक गुणविकसनाचा (Heridity) हिंदू जातीनें केलेला हा एक महान् प्रयोग अतिरेकानें वा विपर्यासामुळें फसला असला तरी त्यानेंहि मनुष्यजाती या अनुभवांत एक महनीय भर टाकून तिला उपकृत करण्याचें यश संपादन केलें आहे. त्या प्रयोगाच्या मुळाशीं असलेली शास्त्रीय दृष्टि आणि सद्बुद्धि आणि त्याचें प्रवर्तनांत दाखविलेलें धाडस आणि सातत्य आश्चर्यकारक होतें.

[२] या प्रयोगाच्या यशाचे किंवा अपयशाचे आपण सारे हिंदु सारखेच वांटेकरी आहोंत. ब्राह्मणेतरांनीं ब्राह्मणांवर दोषारोप करणें किंवा अस्पृश्यांनीं सर्व स्पृश्यांवर खापर फोडणें हा प्रकार शुद्ध मूर्खपणाचा व इतिहास दृष्ट्या निखालस चूक आहे. जन्मजात जातिभेदाच्या हानीचा दोष हा कोणाहि एका वर्णाच्या वा व्यक्तीच्या माथीं मारण्यापेक्षां

दोन शब्दांत दोन संस्कृति



## स्पृश्योद्धार

१९२५–२६ च्या सुमारास झालेल्या येवले येथील एका भाषणाचा विषय होता 'स्पृश्योद्धार'. लोकानी विचारले, 'अस्पृश्योद्धार या शब्दातील सुरुवातीचा 'अ' कुठं गेला?'

सावरकरांनी भाषणांत याचा खुलासा करताना सांगितलें, "अस्पृश्य मानलेल्या बाधवांच्या बाबतीत शतकानुशतके स्पृश्यानी जो घोर अन्याय केलेला आहे त्या पापाचें प्रायश्चित्त घेऊनच आतां स्पृश्याचा उद्धार होणार आहे. म्हणून हा स्पृश्याच्याच उद्धाराचा कार्यक्रम असल्याने 'स्पृश्योद्धार' हाच शब्द ययायोग्य असून मुद्दामच योजला आहे.

त्या दोषाचे वाटेकरी आपण आब्राह्मणचांडाल सर्व जाति, सर्व वर्ण, सर्व व्यक्ती आहोत. प्रत्यक्ष बुद्ध कालांतहि जातिभेद चुकीचा आहे असे न मानतां जातिश्रेष्ठत्वाचा, अग्रवर्णाचा मान हा ब्राह्मणाचा नसून क्षत्रियाचा आहे एवढाच वाद कित्येक लिखाणात घातलेला आढळतो. जातिभेदाच्या प्रथेनें प्रत्येक जातीस आपल्या खालच्या जातीवर वर्चस्व गाजविण्याची संधि अनायासेच मिळत असल्यानें ती प्रथा सर्वांसच थोड्याबहुत प्रमाणात हवीशी वाटली, आणि म्हणून जातिभेदाचेच निर्मूलन करण्यास कोणीहि धडपडत नव्हतें. चातुर्वर्ण्याच्या किंवा जातिभेदाचाहि प्रादुर्भाव आणि प्राबल्य हे मूलतः समाजधारणेच्या सद्‌बुद्धीनेंच प्रेरित झालेले असून, त्या पूर्वपुण्याईच्या जोरावरच त्या सस्थेंत आजपर्यंत इतका चिवट जिवंतपणा शिल्लक राहिलेला आहे. विकृति म्हटली की तो प्रकृतीचाच अगत. वा पूर्णतः असणारा कु-परिपाक होय आणि म्हणून त्या विकृतीचा नायनाट करण्यासाठी शस्त्रक्रिया करू इच्छिणाऱ्या शस्त्रवैद्यानें त्या विच्छेदनाच्या समयी मूळ प्रकृतीस कमीत कमी धक्का कसा पोहोंचेल याविषयी पराकाष्ठेची चिंता बाळगली पाहिजे. त्या योजनाच्या मुळाशी जी लोकहितकारक मूलतत्त्वे आहेत किंवा होती, त्यापासून होणारे लाभ नव्या याजनेंत राहतील अशी काळजी घतली पाहिजे. नाहीतर तत्त्वाच्या अतिरेकानें, किंवा विपर्यासानें, किंवा घातक तत्त्वाभासानें ते लाभहि आपण नाहीसे करूं.

### संक्रमणकालांतील सूत्र

[३] म्हणून जन्मजात जातिभेदाचा उच्छेद व गुणजात जातिभेदाचा उद्धार हे संक्रमणकाळातील समाजरचनेचे आपले सूत्र असावे. वास्तविक आजचा जातिभेद जन्मजातहि नाही; तो आहे निव्वळ पोथीजात. जन्मतःच प्रकटणाऱ्या कोणत्याहि रूपगुणधर्मांच्या भिन्नतेनें आजच्या जाती निरनिराळ्या ठरू शकत नाहीत. तर अमक्या छापाच्या गटात अमुक जन्मला म्हणून तो श्रेष्ठ किंवा स्पृश्य आणि अमुक कनिष्ठ वा अस्पृश्य 'मानला' जावा असे पोथीत सांगितले आहे. यासाठी तो तसा नुसता मानला जात आहे.

आजच्या जातिभेदाची ही जन्मजात म्हणून नुसती मानल्या गेलेल्या उच्चनीचतेची विषारी नागी मोडून टाकली गेली की, मग त्या त्या जाती किंवा उपजाती नुसत्या नावाने आणखी काही काळ जरी अशाच राहिल्या तरी मोठीशी हानि होणार नाही.

[४] उलट अपरिहार्य म्हणून उरणाऱ्या ह्या अशा नागी तोडलेल्या जातदार गटाचा उपयोगहि राष्ट्रीय सघटनेला तसाच करून घेता येईल की जसा तालुका–जिल्हा–इलाखा–प्रभृति भौमिक गटाचा उपयोग राज्याच्या सघटनेला करून घेतां येतो. ज्ञातिपरिषदाहि राष्ट्रीय दृष्ट्या विघटक न होता सघटक होऊ शकतील, तर त्या त्या परिषदा नि ज्ञातीय सस्था पुढील दोन मुख्य सूत्रें आपल्या मूळ उद्देशपत्रिकेत दोन ध्रुवाप्रमाणे अढळपणें अकितील. प्रत्येक ज्ञातिपरिषदेची पहिली प्रतिज्ञा, पहिलें सूत्र, हें असले पाहिजे की, 'आम्ही कोणत्याहि इतर ज्ञातीस केवळ जन्मामुळेंच, जन्मत.च, हीनतर मानीत नाही वा उच्चतर मानीत नाही,' आणि दुसरी प्रतिज्ञा ही की, 'आमच्या जातीतील व्यक्तीत जे गुण प्रकटपणें नि प्रत्यक्षपणे आढळून येतील त्यावरूनच आमची पात्रापात्रता ठरवली जावी, आम्हास अधिष्ठान मिळावे, इतराप्रमाणेच त्या आमच्या गुणाचे चीज व्हावे, उतराप्रमाणेच त्या गुणाच्या सपादनास नि सवर्धनास आम्हांसहि मोकळीक असावी, पण प्रत्यक्ष गुणाच्या कसोटीहून निराळ्या अशा कोणत्याहि पक्षपाती, पोथीजात ज्ञातिनिष्ठेच्या वशिल्याने इतर कोणाचेहि न्याय्य, अधिकार लुबाडण्याची आमची मनीषा नाही. प्रत्येक जातिसंघाने ह्या दोन स्पष्ट प्रतिज्ञाच्या पायावर आपली ज्ञातिसघटना केली असता ती इतर ज्ञातीच्या हानीस सहसा बाधक होणार नाही. इतकेच नव्हे, तर त्या दोन सूत्राच्या कक्षेंत येणाऱ्या त्या त्या ज्ञातीची शिक्षण–आरोग्य–शक्ति–सपन्नता–सहकार्याची बाढ ही आपल्या अखिल हिंदुराष्ट्राच्या सघटनेस सहाय्यकहि होण्याचा पुष्कळ सभव आहे. जन्मजात कुलाचे गट जसे असतात, तसेच हे जन्मजात जातीचे गटहि आपल्या हिंदुराष्ट्राच्या विघटनेसच आजच्यासारखे कारणीभूत न होता सघटनेसहि सहाय्यक होतील. आमच्या राष्ट्रीय महासेनेच्या त्या निरनिराळ्या उपसेना आपल्या परपराच्या छावण्यातून गटागटानी सघटित नि सज्ज होत राहिल्या तर ते फारसें अनिष्ट नाही. राष्ट्रीय ध्वजाखाली राष्ट्रीय ध्येयासाठी राष्ट्राचे रणशृग फुकले जाताच त्या त्या उपसेना झटकन् एकत्र करून त्यां महासैन्याच्या सुसगत हालचाली करण्यास ही त्याची गटागटानी केलेली पूर्वसज्जता उपयोगी पडल्यावाचून राहणार नाही. जोवर या जाती मोडता येत नाहीत, तोवर त्याच्या विभिन्न परंपरेच्या आवडीनिवडीचा सघर्ष नि विरोध कमीत कमी हानिकारक करवून घेण्याचा आजच्या परिस्थितीत जो एकच मार्ग आहे तो वरील दोन सूत्रें हाच होय.

### मानवताच काय! भूतदया, पण!

पण आज दुसऱ्या महायुद्धानतर राष्ट्रवादाचे महत्त्वच कमी होत असतां मी हें

[पृष्ठ ६२ वर चालू]



# साहित्य विभाग

यद्यपि शिक्षणसुलभता नि शास्त्रशुद्धता ह्या दोन्ही दृष्टींनीं आपल्या आजच्या नागरी लिपीच्या लेखनपद्धतींत कांहीं सुधारणा अवश्य आहेत; तथापि आज जगांतील इतर लिप्यांशीं नि विशेषतः रोमन लिपीशीं तिला भारतीय राष्ट्रलिपीच्या नात्यानें जें तोंड द्यावें लागणार आहे, त्यासाठीं तिला प्रथमतः मुद्रणक्षम होणें अत्यंत निकडीचें काम आहे. आज लिपीपुढें मुख्य प्रश्न लिहिण्याचा नाहीं, तर छपाईचा आहे. रोमन लिपि आज यंत्रारूढ होऊन वाफेच्या नि विजेच्या वेगानें भरधांव दौड करीत चाललेली आहे. त्या दौडींत त्या रोमन लिपीलाहि मागें सारून आपल्या लिपीला जर अग्रेसरत्व पटकावयाचें असेल तर तिलाहि त्या विजेच्या नि वाफेच्या यंत्रावरच स्वारी भरली पाहिजे. तसें मुद्रणक्षम व्हावयाचें तर यांत्रिक जुळणीला अनुकूल अशींच तिच्या अक्षरांचीं रूपें नि लिहिण्याची धाटणी असली पाहिजे. सुदैवानें तिचीं अक्षररूपें आजहि बहुतांशीं यांत्रिक मुद्रणाला अनुकूलच आहेत, तशीच तिची धाटणीहि; परंतु जीं थोडीं अक्षररूपें आणि विशेषतः धाटणींतील कांहीं मोड मुद्रणसुलभतेला आणि यंत्रक्षमतेला प्रतिकूल आहेत., तेवढ्यापुरतीच काय ती तिची सुधारणा करणें अवश्य आहे. त्या सुधारणा आपल्या भारतीय राष्ट्रलिपींत, देवनागरींत झटपट करून नि व्यवहारवून सोडण्यासाठींच हें लिपिशुद्धीचें आंदोलन आम्ही आज हातीं घेत आहोंत.

**—वि. दा. सावरकर.**

# आडमुठा



सौ. स्नेहलता दसनूरकर

" वहिनी, मीं किती पोळी खाल्ली ? "

" अजून एक पोळी खायला हवी सदाभाऊ, म्हणजे पोट भरेल तुमचं. मग थोडासा ताक-भात खायचा अन् उठायचं. "

" वरं. " सदाभाऊ आज्ञाधारकपणें म्हणाला.

काकूबाईनीं तव्यावरच्या पोळीवर तूप सोडून ती उलटीपालटी केली अन् सदा-भाऊच्या ताटांत टाकली. सदाभाऊनें तुकडा मोडायला हात पुढें केला.

" हां हां ! चटका वसेल. थांवा थोडे सदाभाऊ. मग मी सांगतें हं केव्हां खायची तें."

" वरं ! " हात मागें घेऊन सदाभाऊ वाट पाहत थांवला. " आणि काकू, तुम्हांला तरी कितीदां सांगायचं कीं त्यांच्या ताटांत, असं एकदम तव्यावरचं किंवा उकळतं असं कांहीं टाकीत जाऊं नका म्हणून ? एवढया-साठीं त्यांच्या जेवणाच्या वेळीं मी जवळ वसतें नियमानं. "

" विसरलें हो ! " ओशाळवाण्या होऊन काकू म्हणाल्या. त्या अशा वेळीं मनांत म्हणत असतात,

" इश्श ! कांहींतरीच ह्या वहिनी-साहेवांचं. एवढा मोठा चोवीस वर्षांचा माणूस हा सदाभाऊ. लग्न झालं असतं तर एव्हांशीं दोन पोरं झालीं असतीं. भलतंच लाडवून ठेवलंय्. अगदीं गुळाचा गणपति बनवून ठेवलंय्. "

त्यांच्या मुद्रेवरचे हे भाव वहिनींना माहीत झाले आहेत. काकूंना ह्या घरांत स्वयंपाकीण म्हणून येऊन पांच वर्षं झालीं आहेत. सुरुवातीला त्या सदाभाऊंवद्दलचे आपले विचार स्पष्टच बोलून दाखवीत. पण जेव्हां त्यांनीं पाहिलें कीं एरवीं सत्त्वशीलपणानें दुसऱ्याचा वाटेल तो अपराध पोटांत घालून त्याच्याशीं प्रेमानें वागणाऱ्या

सदाला समजूत कमी होती, पण फुलांच्या वासांतला फरक त्याला माहीत होता. बकुळीच्या फुलांसारखा त्याच्यावर प्रेम करणारीं माणसें तो नीट ओळखीत असे. सुगंधाशीं मात्र त्यानें हाडवैर ठेवलें........

वहिनीसाहेब सदाभाऊबद्दल असे कांही बोलले की खवळून जातात. त्यामुळें काकू जिभेवर आलेले शब्द गिळून टाकतात आणि हे माहीत असलेली वहिनीहि तिकडे दुर्लक्ष करते.

"हं, खायची आतां पोळी सदाभाऊ!"

वहिनीनें सांगितले तसा सदाभाऊ पुन्हां जेवूं लागला. वहिनीचे दोघे मुलगे, एक आठ वर्षांचा नि एक सहा वर्षांचा, जवळच जेवत होते. हवे ते मागत होते. पण वहिनीला आपले सारें लक्ष सदाभाऊवर केंद्रित करावें लागत होते.

मुलाची जेवणें झाली. मग दादासाहेब जेवायला आले. तसा सदाभाऊ उठला नि मागच्या अंगणात गेला. केळीच्या खातेऱ्यापाशी सावलीच्या गारव्यात त्याने सकाळी फुले वेचून ठेवली आहेत बकुळीची. पण ती तेथून काढून घ्यायचे त्याला उमजत नाही. तो बकुळीच्या झाडाखाली बुंध्याला टेकून बसतो. डावीकडे अशोकाचे झाड आहे उजवीकडे पारिजातक, मध्यें पायरस्ता, पलीकडे त्या फोफावलेल्या केळी. छान गार वाटते इथें. त्याला बकुळीखाली बसलेले पाहून गडी घरातून सुईदोरा घेऊन येतो. अन् केळीजवळची बकुळीची फुले नि सुईदोरा सदाभाऊपुढें ठेवतो. ही वहिनीनेच गड्याला शिस्त लावून दिली आहे. मग सदाभाऊ बकुळीच्या फुलाचा गजरा बनवील आणि परसातल्या नळावर धुणें धुतां धुता गडी सदाभाऊवर लक्ष ठेवील. सध्याकाळी देवदर्शनाला जातांना वहिनीच्या केसात बकुळीचा गजरा असेल तरच सदाभाऊ तिच्याबरोबर घराबाहेर पडेल. नसेल तर एक शब्दहि तोंडाने बोलणार नाही. मुकाट्याने येऊन ह्या बकुळीच्या झाडाखाली बसेल. थोड्या वेळानें वहिनीच्या लक्षांत येईल देवघरांत ताम्हणांत केळीच्या पानात ठाळलेला बकुळीचा गजरा वहिनी आपल्या वेणीच्या चक्रावर घालील अन् मागीलदारच्या पायरीवर येऊन हंसत उभी राहील. मग चटकन् सदाभाऊ हंसतमुखाने उठेल. अन् दोन पावले वहिनीच्या पुढेंच चालायला लागेल.

रस्त्यानें वहिनीला दहा वेळा सांगावं लागेल; "कडेनं चला सदाभाऊ!"

"समोर पाहा सदाभाऊ. खालीं मान नाही घालूं इतकी!"

आणि देवळांत देवाच्या मूर्तीपुढें गेल्यावर हात जोडून वहिनी सदाभाऊकडे वळून म्हणेल;

"सदाभाऊ, देवाला नमस्कार करा न् म्हणा, 'देवा, चांगली बुद्धि दे!'"

सदाभाऊ वहिनीकडे पाहून हात जोडील मोठ्यानें म्हणेल "देवा, चांगली बुद्धि दे."

मग तो वहिनीच्या मागोमाग देवाला प्रदक्षिणा घालील. वाटेंत वहिनीनी डोळे पुसलेले त्याच्या लक्षात येणार नाही. काही वर्षांपूर्वी सदाभाऊ स्वतःच्या आईबरोबर देवदर्शनाला येत होता. आतां वहिनीबरोबर येतो आहे.

देवळात किंवा रस्त्यावर कोणी भेटलें तर पुढें जाणाऱ्या सदाभाऊला हात धरून वहिनीला थांबवावें लागेल. ती त्याला आपल्याजवळच उभें करील. बहुतेक सारेजण त्याला ओळखतात. कुणाला त्याच्याशी बोलायचीहि इच्छा होते. "काय, बरं आहे सदाभाऊ?" अशा वेळी सदाभाऊ वहिनीकडे पाहतो. ती म्हणते; "ह्या विमलाकाकू आहेत सदाभाऊ!" तसा सदाभाऊ म्हणेल "विमलाकाकू आहेत!" बस्स इतकंच. मग तो पुन्हां पळणाऱ्या मोटरीकडे किंवा दुकानांतून दिसणाऱ्या चकचकीत आकर्षक वस्तूकडे पाहात राहील. वहिनीच म्हणेल; "ठीक चाललय् त्याचं. मजेंत आहेत."

* * *

आज सदाभाऊला मध्येच लहानपणची आठवण झाली. अशी त्याला अधूनमधून येते. मग तो गड्याला किंवा आपल्या पुतण्याना सांगतो; "मी मोहनकडे जातों."

गडी सदाभाऊबरोबर शेजारच्या घरीं गेला. त्याला माहीत आहे सदाभाऊ काही तिथें बसणार नाही. समोर मोहनच्या आई असतील तरच बोलेल. त्याची बायको असेल तर मुळीच न बोलतां परत येईल.

मोहनच्या आई ओसरीवरच होत्या. जवळच खुर्चीवर मोहनची बायको काहीं विणीत बसली होती. सदाभाऊला पाहून त्या जिव्हाळ्यानें म्हणाल्या;

"ये......!"

"मोहनच्या आई, मोहनला बोलावलय्!"

मोहनच्या आई म्हणाल्या;

"पाठवीन हं, मोहन आला म्हणजे."

मोहनच्या तरुण बायकोचा उल्हास उतू जातोय्. ती हंसायला कारण शोधीत असते. माहीत असूनहि तिने विचारले;

"कोणी बोलावलय्!" तिच्याकडे न पहाताच सदाभाऊने उत्तर दिले अन् तो चालायला लागला. मोहनची बायको हसते आहे हें त्याच्या लक्षातहि येणार नाही. पण तो दरवाज्याबाहेर गेलेला पाहताच मोहनच्या आईंनी दटावले;

"अस काय मदा. गरिबाची चेष्टा करू नये. तो जर शहाणा असता तर तुझ्या नवऱ्याच्या दुपटीन कमावता. मग तो घरी आला असता तर त्याच्यासाठी चहाफराळाचं करतांना तुझी धादल उडाली असती. मोहनचा कधी दहाच्या आत नंबर आला नाही न् ह्याचा कधी पहिला नंबर सुटला नव्हता. शिवाय तू त्याची चेष्टा करतेस हें गड्यान उमावहिनीला सांगितलं तर त्या पोरीला भारी यातना होतील बर!"

* * *

खरें सागितले मोहनच्या आईंनी. जेव्हां सदाभाऊ शहाणा होता तेव्हा चार तुकड्यात त्याचा पहिला नवर राहायचा. बाराव्या वर्षी तो बरोबरीच्या इतर मुलाच्या पुढें दोन वर्षे असायचा. एक दिवस त्याला सपाटून ताप आला. महिनाभर तो अंथरुणाला खिळून होता. मग बरा तर झाला; पण त्याला आठवण कशी ती मुळीच राहिनाशी झाली. तो क्वचितच बोलायचा. डोक्यात मुग्या येतातसें वाटतें असे सागायचा. आपले शेंडेफळ जिवावरच्या दुखण्यातून वाचले ह्याच आनंदात प्रथम आईवडील होते. मग जेव्हां सदाशिवाच्या ह्या नव्या दुखण्याचे स्वरूप त्याच्या लक्षात आले तेव्हा त्याच्या तोडचे पाणी पळाले. पुन्हा नवी धावपळ सुरू झाली. घरातला प्रत्येक घटक थकेपर्यंत सदाभाऊच्या दुखण्याशी झटापट घेत राहिला. मोठाले तज्ज्ञ झाले. व्रतवैकल्यें, तीर्थयात्रा, नवससायास सारें झाले. अखेर हताश होऊन हात टेकले.

ठीक आहे. जीव तर सुरक्षित आहे. शरीराची वाढ तर ठीक चालली आहे. कोणाला दगडधोंडे मारीत नाही की कुणाकडे पाहून हसत नाही, बोलत नाही. मुश्किलीने एकएक शब्द उच्चारीत कसेबसे एखादें वाक्य बोलतो. कुठेंतरी एकटा बसून राहतो. क्वचित् पुटपुटल्यासारखा ओठ हलवतो. रडत नाही, ओरडत नाही. आहे असा राहिला तरी फार झाले म्हणायचे. मग वेळच्या वेळी त्याचे सारें खाणेपिणे उरकायचे आणि जागृतीच्या काळात कुठल्या ना कुठल्यातरी उद्योगात गुतवून ठेवायचे. एवढेंच धोरण आईबापानी ठेवले.

संतानाकडून ज्या अपेक्षा असतात त्या बाबतीत सदाभाऊच्या आईवडिलानी आपल्या साऱ्या शक्ति थोरल्या मुलावर, सदाभाऊच्या दादावर केंद्रित केल्या. दादा कायद्याचा पदवीधर झाला. वडिलाची वकिलीच्या धंद्यातली पुण्याई त्याच्या उपयोगी पडली. थोड्याच वर्षांत त्याचा जम बसला. आता दादा शहरातला एक नावाजलेला वकील आहे. लोक म्हणतात, 'खोऱ्यानं पैसा ओढतोय्.'

आईबाप होते तेव्हा, किंवा स्वत.ची वकिली बेताची होती तेव्हां दादा सदाभाऊशी जसा वागत होता तसाच अजूनहि वागतो आहे. सदाभाऊची स्वत:वरची जबाबदारी त्यानें कधीच टाळली नाही. कर्तव्य म्हणून नव्हे. जिव्हाळा म्हणून, त्याला सदाविषयी अतीव सहानुभूति आहे. पण जसजसा काळ जात चालला तसतसे दादाचे लक्ष स्वत.च्या प्रगतीवर, धंद्याच्या व्यापावर केंद्रित झाले. त्यामुळें भावाकडे वैयक्तिक लक्ष देणे त्याला जमत नाही. येतां जाता, "काय सदाभाऊ; जेवण झाल ?", "काय करतो आहेस सदाभाऊ ?" "देवदर्शनाला गेला होतास का ?" एवढीच चौकशी. सदाभाऊकडून उत्तरादाखल फक्त नजरेची देवघेव ह्या पलीकडे काही नाही.

दादाचे लग्न झाले आणि दीड वर्षानेच त्याची आई वारली; आणखी दोन वर्षांनी वडिलहि वारले. आई वारली त्या वेळी कदाचित् त्याला सदाभाऊकडे अधिक लक्ष द्यावे लागले असतें, पण त्याने पाहिले, उमाने – त्याच्या बायकोने तशी आवश्यकता ठेवलेली नाही. उमा त्या वेळी सारी एकवीस बावीस वर्षांची असेल. पण आईचा हरपलेला आधार सदाभाऊच्या मूक मनाला उमांत सापडलेला होता पूर्वीच ! पूर्वी तो जसा आईच्या अवतीभोवती करीत असे तसा आतां उमाच्या भोवतीभोवती करतो आहे. तो सुकलेला नाही. उलट उचापुरा वाढलेला आहे. दादाजवळ उभा राहिला तर दादाच्या दीडपटीनें दिसतो. हे पाहून दादा निर्धास्त झाला पूर्वी आईने गैरसमज करून घेऊं नये म्हणून दादा येताजातां सदाभाऊची चौकशी करी. आता त्याला तेवढीहि गरज वाटत नाही. त्यालाहि तेवढा वेळ नाही अन् सदाभाऊलाहि त्याची खत नाही. दादाचे दुपारचे जेवण होईपर्यंत सदाभाऊ बकुळीच्या झाडाखालीं फुले ओवीत पाय हालवीत बसेल. गजरा झाला कीं मोठी माळ करील. एक झाली की दुसरी. पूर्वी आई असताना तो वहिनीला भोंवतीभोवती करून भावावून टाकीत असे. अजून वहिनीला ह्याची सवय झाली नव्हती. त्या वर्षी बकुळीला नुकतीच फुले यायला लागली होती. त्याच्या नादाला चाळा म्हणून आईने फुलें गोळा करून वहिनीसाठी गजरा करायचा उद्योग त्याला लावून दिला. तो अजून चालूच आहे. आई नि बाबा गेल्यावर वहिनीने त्या दोघाच्या फोटोला माळा घालायची पद्धति चालू ठेवली. आणि सदाभाऊला ह्या उद्योग आता चांगला दोन तास पुरतो.

दादाचें जेवण झालें की वहिनीची हाक येईल. "मी जेवायला बसतेय् सदाभाऊ !''

मग सदाभाऊ आत येईल. वहिनीच्या जवळच एका पाटाबरच बसून राहील. जेवण झाले की वहिनी सदाभाऊला निजायला लावील. झोप येवो अगर न येवो, रात्र की दुपार. वहिनीनें सागितले की सदाभाऊ आडवा होतो. झोप नाही लागली तर आढ्याकडे टकटक पाहात राहातो. पण वहिनीने "उठा आतां !" म्हणेपर्यंत उठत नाही. तशी त्याला झोप येत नाही अशी वेळ येतच नाही. कारण वहिनी त्याला दिवसभर कुठल्या ना कुठल्या तरी पेलेल अशा कामांत गुतवून ठेवतेच. शिवाय सकाळी उन्हे चढेपर्यंत नि सध्याकाळी उन्हे उतरल्यावर अधार पडेपर्यंत बागेंत बारीकसारीक कामें तो करीतच राहातो.

* * *

सदाभाऊ बागेंतल्या वाफ्यातली गळून पडलेली पाने टोपलीत गोळा करीत होता. तेवढ्यात गडी आला. घाईघाईने सोनचाफ्याच्या झाडावर चढला. त्याने पधरात्रीस फुले काढली. सदाभाऊ हातचें काम सोडून त्याच्याकडे पाहात होता. केळीच्या पानावर फुले ठेवून गडी निघाला; तसा सदाभाऊ खराब हाताने तसाच त्याच्या मागें आत शिरला. नि त्याच्या मागोमाग थेट बैठकीच्या दिवाणखान्याच्या दारापर्यंत गेला.

छोट्या झोपाळ्यावर सुगधा बसली आहे. अन् जरा बाजूला प्रशस्त खुर्चीवर दादा बसले आहेत. झोपाळ्याची चकचकीत साखळी तिने एका हाताने धरली आहे. गड्याने तिच्याजवळ फुले दिली. तो परत फिरला. त्यांतले एक फूल घेऊन सुगंध घेत घेत सुगंधा जमिनीला पायाचा रेटा देऊन मंद मद झोका घेत आहे. दादाशी हसत हंसत काही बोलत आहे. अचानक तिचें लक्ष दाराशी उभ्या असलेल्या सदाभाऊकडे जाते. तो तिच्याकडे पाहतो आहे. सुगधाचे पाय खटकन् जमिनीला टेकतात. ती अस्वस्थ होते. तिच्या मुद्रेवरचा बदल पाहून दादा दाराकडे वळून पाहतात. मग म्हणतात,

"सदाभाऊ, तुला वहिनी बोलावते आहे."

सदाभाऊ तत्परतेनें जाईल ही दादाना खात्री असते, तसेंच होते. सदाभाऊ घाई घाईने तेथून निघून तर गेला, पण जरा वेळाने स्वयपाकघरात ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत एखाद्या नव्यानें पिंजऱ्यांत पकड

लेल्या जनावरासारख्या चकरा टाकू लागला. ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत.

अलीकडे हे असे पुष्कळदा होते. तो अशा चकरा मारायला लागला की स्वयपाकघरांत लगबग करणाऱ्या काकूबाईच्या पायात अडमड होते. वहिनी तेथे नसल्या तर काकूबाई खेकसतात,

"एका जागी टिकायला काय होत तुम्हाला? अस काय अगात आल्यासारखं करीत असता हल्लीं अधनमधन? इथून जा पाहू तुम्ही. जा तुमच्या बकुळीच्या झाडाखाली."

रस्ता सापडल्यासारखा सदाभाऊ मान हलवतो. त्याला ते पटते. तो बकुळीच्या झाडाखाली जाऊन वसतो सारखा कांहीतरी पुटपुटत राहतो. आता त्याचा पाय मुळीच हालत नाही. वहिनी त्याला शोधीत तिथें येईल तेव्हाच तो घरात शिरेल.

* * *

ही सुगधा दादाचे अशील आहे. तिचे कोर्टातले काम चालू आहे त्यामुळे तिला नेहमी दादाकडे यावें लागते पूर्वी ती ऑफिसातून परस्परच निघून जाई पण अलीकडे दादा तिला घरात घेऊन येऊं लागले आहेत. आले की दादा बेल दाबतात. गडी पळत येतो. सुगधाला सोनचाफ्याची फुले आवडतात ती गड्याकडून दादा आणवून घेतात. मग गड्याकडून वहिनीकडे निरोप जातो; "बाहेर चहा हवाय् अन् काहीतरी चहाशी खायला!"

आज दादा दुसऱ्या कुणाबरोबर वरती माडीवर कसली चर्चा करीत होते. सदाभाऊ बैठकीच्या दिवाणखान्यात वडिलाच्या नि आईच्या फोटोला बकुळीच्या माळा घालीत होता. सुगधा आली, तिने आपल्या किनऱ्या आवाजात विचारले,

"दादासाहेब घरात आहेत?"

"नाहीत!" सदाभाऊने वळून पाहून उत्तर दिले. ती परत निघाली. बाग ओलाडून कपाऊडच्या बाहेर जाणार एवढ्यात गॅलरीशी आलेल्या दादानी तिला पाहिले. त्यानी चटकन् गड्याला पिटाळून तिला परत बोलावून घेतले.

"तुम्ही घरी होतात नि ह्यांनी कसं सागितल की तुम्ही नाही आहात म्हणून?" तिनें सदाभाऊकडे बोट दाखवीत विचारले.

"ह्ं! त्याच कुठ लक्ष असतं? अन् त्याला आत्तांचं मग आठवत नाही घडपणानं. बोलला असेल सुचलं तें"

* * *

सुगधाला दादांनी आग्रहानें जेवायला ठेवून घेतले. अर्थात् काही वस्तु नव्या बनवाव्या लागल्या मुलाच्या पंक्तीला जेवायला बसण्यासाठी जेव्हा वहिनी सदाभाऊला बोलवायला आली, तेव्हा तो म्हणाला,

"तुझ्याबरोबर जेवणार आहे!"

"बसून घ्या ना. तुमच्या आवडीची भजी केलेली आहेत."

"तुझ्याबरोबर जेवणार आहें!"

वहिनी अस्वस्थ झाली पण सवयीनें तिला कळून चुकले आहे की ह्यांच्या कलानें घेणेच ठीक.

दादा आणि सुगंधा बरोबरच जेवायला बसले होते. त्यांची जेवणे झाल्यावर सदाभाऊ वहिनीबरोबर जेवायला तर बसला. पण पहिल्या भातांतच त्याचें जेवण घोटाळायला लागले. वहिनीने डाव्या हाताने त्याच्या कपाळाला हात लावीत म्हटले;

"डोळे का असे लालसर झालेत? उन्हांत गेले होते काय बागेंत?" शेवटचा प्रश्न तिनें पलीकडे जेवणाऱ्या गड्याला उद्देशून विचारला.

"नाही. बकुळीखालीच तर होते केव्हांचे!" गड्यानें उत्तर दिले.

"वहिनी मी किती पोळी खाल्ली?" पहिल्या दोन चतकोरांतली अर्धीहि अजून सपली नसताना सदाभाऊनें विचारले.

ह्या मुग्ध जिवाला कशाची चाहूल लागली आहे ही? हा असं जीव उडाल्यागत काय करतो आहे? वहिनीचा जीवहि गलबलूं लागला.

* * *

सुगंधा आता घरांतच राहायला आली आहे. वहिनीची माडीवरची पश्चिमेकडच्या वाऱ्याची खोली तिला रिकामी करून दिली गेली आहे. वहिनीचे सामान देवघरापलीकडच्या खोलीत आणून ठेवलें गेलें आहे. पूर्वी ती सदाभाऊच्या आईची खोली होती. सदाभाऊ सारखा वहिनीच्या तोडाकडे पाहतो आहे. मुले अस्वस्थ आहेत, हें पाहून वहिनीने शातपणाचे कवच मुद्रेवर चढवले आहे जणु तिची बहीणच घरी आली आहे राहायला. धाकट्याने विचारले;

"पाहुण्या किती दिवस राहाणार आहेत?"

पाहुण्या नाहीत. आपल्या घरच्याच आहेत. गधामावशी म्हणायचं त्याना." वहिनीच्या आज्ञेवर मग कुणीच चिकित्सा केली नाही. साऱ्यानीच चेहेऱ्यावर कसलाहि गोंधळ न दाखवता घरातलीच एक म्हणून सुगधाच्या अस्तित्वाचा स्वीकार केला. कमालीच्या चिकित्सेखोर नि बोलघेवड्या काकूबाईंनीसुद्धा! आपल्याकडून वहिनीला कसलाच मनस्ताप होऊं नये म्हणून ही नोकर माणसेसुद्धा आजवर काळजी घेत आली आहेत.

पण सदाभाऊ तिला गंधा वहिनी म्हणेना. आधी तो तिचा वारा टाळूनच घरात वावरतो. पण वेळ आलीच तर तिचा उल्लेख 'पाहुणीबाई' म्हणूनच करतो.

* * *

एक दिवस सुगधा तडकलीच;

"हा पाहुणीबाई कां म्हणत असतो मला?"

"त्याच नका मनावर घेऊ. म्हणतील आज नाही उद्या!" वहिनीनें तिला शात करायचा प्रयत्न केला

"नका कड घेऊ, सहा महिने झाले, अजून तो मला मुद्दाम पाहुणीबाई म्हणतो. का म्हणून? तुमचीच फूस असेल त्याला. सागा माझ्या देखत. बघूं कसा नाही म्हणत!"

भाजी निवडीत बसलेला गडी तेथून उठून गेला. वहिनीच्या नाजूक पातळ ओठाचा किंचित थरकाप झाला;

"सदाभाऊ, ह्या आपल्याच आहेत घरच्या. ह्याना गधावहिनी म्हणायचं!" सदाभाऊने वहिनीकडे पाहिले. पुन्हा तो देवाला तुळशी वाहात राहिला. सुगधा सतापून लाल होऊन वहिनीला म्हणाली;

"त्यानं आत्ता म्हटलं पाहिजे!"

पण वहिनीनें काहीं म्हणायच्या आंत सुगधाच्या क्रोधित दृष्टीला सदाभाऊची दृष्टि भिडली. स्थिर, शांत!

सुगधानें ओरडण्यासाठी उघडलेलें तोंड मिटले गेले. ती गडबडली. जाण्यासाठी वळली. तेवढ्यात दादा तेथें आला. उगीच कांहीतरी बोलायचे म्हणून म्हणाला;

"काय चाललय्?"

त्याला पाहतांच सुगधाला अवसान आलें. डोळ्यात पाणी आणून तिनें म्हटले;

"ह्या घरांत कां आणलंत मला? मला काय घर नव्हतं? असा अपमान करण्यापेक्षा

तुमच्या जोड्यानें मला दहा मारा अन् एक मोजा !"

"पण झाल काय ?" दादानें विचारले. वहिनीनें मान खाली घातली. स्वयपाकीणबाई अगणाकडे निघून गेल्या.

"कोणी केला हिचा अपमान ?" वहिनीनें मान वर केली नाही.

"सागितल्याशिवाय कस कळणार मला गंधा ?"

"हृया सदाभाऊनं. तो पाहुणीबाई म्हणतो मला."

"सदाभाऊ कधी बोलतो ? त्याचं कां मनावर घेतेस ?"

"तो मुद्दाम खिजवतो मला. कितीहि सागितलं तरी गधावहिनी म्हणत नाही. अन् बोलत नाही काय म्हणता ? बोलत नाही तुमच्याशी. वहिनीशी गुलगुल गप्पा चालतात त्याच्या."

"काय रे सदा ? का म्हणत नाहीस तिला गधावहिनी ?" सदाभाऊनें तुळशी वाहण्याचे थावून दाराकडे पाहिले. मातृमुखी सदाभाऊ-च्या त्या नजरेला दादाची नजर भिडतांच–मनाने दादाला नकळत पधरा वर्षांमागें नेले.

असाच एकादशीचा दिवस होता. बाबा पूजा करून गडबडीने कुठें निघून गेले होते. दर एकादशीला एक हजार एकशेंआठ तुळशी देवाला वाहण्याचा नियम. म्हणून आईच भक्तिभावाने तुळशीची पाने देवावर वाहात होती. आजच दादाच्या परीक्षेचा निर्णय जाहीर झाला आहे. पेढ्यानी भरलेले चादीचे ताम्हण नैवेद्य दाखवून जवळच ठेवलेले आहे. दादा उभा आहे. तुळशी वाहून झाल्यावर दादाने वाकून देवाला आणि आईला नमस्कार केला. "औक्षवत हो बाळ ! असच यश मिळू दे जन्मभर." आईचा गळा भरून आला होता. दादाच्या हातावर पेढे ठेवीत तिनें म्हटले, "दादा ..!"

"हृ ?"

"सदामध्यें आता कसलीच सुधारणा व्हायची आशा नाही. तुम्हा दोघासाठीं जें यश मागायच, ते आम्ही एकट्या तुझ्या-साठीच मागितलं देवाजवळ. आतां बाबा सदाचा देव तूच... सभाळशील ना त्याला ?"

"तुला असं का वाटतं आई ? मी त्याला अतर देईन अशी शका कशी येते ग तुला ?"

दादाना देवापुढें बसलेला सदाभाऊ अस्पष्ट दिसायला लागला. ते एकदम सुगंधाकडे वळून म्हणाले,

"त्याच्या वागण्या-बोलण्याला तू महत्त्व देत जाऊं नकोस. वर चल. तुला हवा तसा नेकलेस घेऊन सराफ आले आहेत" दादा थेट चालायलाच लागले. वहिनीकडे रागाचा कटाक्ष टाकून सुगधाहि निघून गेली.

* * *

हल्ली नळहि लहरी झाले आहेत. साठव-लेले पाणी किती पुरणार? बंगल्यामागच्या मोठ्या बागेंत मोठी विहीर आहे. गरज पडली नाही म्हणून बदच ठेवली होती. दादानी ती मजूर लावून आतां उघडून घेतली आहे. गडी पाणी उपसतो आणि घरात आणून मोठ्या पिपात भरतो. वहिनी त्याला जमेल तितकी मदत करते. त्याचाहि जीव जाणायला हवा. काकूबाई वयस्कर आहेत. स्वयंपाक-घरातलीं पुष्कळ कामें त्याच तर सभाळतात. त्यामुळें त्यानी पाणी भरावें अशी वहिनीची अपेक्षाच नाही. मुलाना आणि सदाभाऊला विहिरीजवळ जायची बंदी आहे.

आज सकाळीच नळ कोरडे पडले. सतरा कामें बाजूला टाकून पाण्याचे काम करणें आले. गडी अजून झाडलोट, अंथरुणे आवरणें हेच करीत होता. म्हणून वहिनी स्वयंपाका-पुरतें पाणी भरीत होती.

सुगधा स्वयपाकघरात चहा पीत होती. ती काकूबाईजवळ फणफणली,

"त्या टोणग्याला नुसता लाडवून ठेवलाय्. काय हरकत आहे त्याला पाणी भरायला ? खायला कहार नि भुईला भार !"

वहिनीच्या कानांवर पडलेच हें बोलणें. तिच्या नाकपुड्या किंचित थरथरल्या;

"घरांत कुणाला पाणी कमी का पडतय् ? भाऊजी कांही लहान नाहींत. त्यांना अहो जाहो म्हणण, दिराचा मान देणं, राहिलं दूर नि अपशब्द का वापरता ? काळजाला घरं पडतात माझ्या !"

"हृया घरातल्या माणसाचं एकेक नवलच आहे. एकीकडे म्हणायचं; त्याला समजत नाही काही. पोरच तो. त्याचं काय मनावर घेता. अन् दुसरीकडे त्याला अरेतुरे म्हणताहि कामा नये असा हट्ट ! तो तुम्हाला वहिनी म्हणतो, तुम्ही जरूर त्याला भाऊजी म्हणा, वाटलं तर पूजा करा त्याची. तो एक विलक्षण नि त्याच्या बावळटपणाला उत्तेजन देणाऱ्या तुम्ही सात विलक्षण !"

* * *

सुगंधानें दादापुढें एक योजना मांडली, "सदाला घरात ठेवून त्याच काहीच भलं होण्याची शक्यता नाही. मुलापुढ काकाच्या मठ्ठपणाचा आदर्श नको. त्यापेक्षा त्याला एखाद्या मानसोपचाराच्या दवाखान्यात ठेवूं या."

"पण, त्याच्यांत आहे ह्यापेक्षां कसलीहि सुधारणा होणार नाही. असा तज्ज्ञानी निर्वाळा दिला आहे सुगंधा !"

"त्याला झाली पंधरा वर्षं. आल्यादिवशी नवीं औषध निघताहेत. माझं ऐका !"

दादानी वहिनीला हें पटवून देण्याचा प्रयत्न केला. आजवर दादाच्या बोलावर आपला उलटा बोल चुकूनसुद्धा न चढव-णारी वहिनी खणखणीत शब्दात विरुद्ध गेली. "कसला त्रास होतोय त्याचा कुणाला ? तो निरुपद्रवी जीव कुणाच्या अध्यात ना मध्यात. काय म्हणून त्याना घराला पारखं करायचं ? सासुबाईंच्या जात्या जिवाला मी वचन दिलं आहे की सदाभाऊला माझा मोठा मुलगा मानीन. तेव्हा मी जिवत असेपर्यंत हे शक्य नाही. 'मानसो-पचाराचा दवाखाना' ही बोलायची भाषा झाली. वेड्याच्या इस्पितळाचं नव नाव. तिथं पाठवायच आहे आपल्या एकुलत्या एक भावाला ? काय कमी आहे आपल्याला ? पैसा कमी आहे की घरात जागा कमी आहे ? तसच असेल तर आम्हाला दोघानाहि शेतीच्या गावी धाडून द्यावं. माझ्या मुलाची काळजी नाही वाटत मला. त्याचं आईवाचून अडणार नाही. पण सदाभाऊ माझ्याशिवाय..."

वहिनीला हुदका आला. दादा स्तंभित होऊन ऐकत उभे होते ते आपल्या खोलीकडे चालायला लागले.

* * *

सुगधाला दादानी खूप दागिने केले आहेत, तरी मध्येंच लहर येऊन ती वहिनीजवळ तिचा एखादा दागिना मागतेच. वाद टाळा-यचा स्वभाव पडल्यामुळें वहिनी बिनतक्रार दागिना देते. अलीकडे वहिनीला दागिने घालायचाहि कंटाळा येतो.

वटपौर्णिमेच्या दिवशी पोथी ऐकायला निघालेली वहिनी, सदाभाऊ येतोय् म्हणून बागेंत उभी होती. दादा सहज गॅलरीत आले आणि बघतच राहिले. वहिनी पाढरी वस्त्रें नेसली होती. आणि तिनें गळ्यात जडावाचें

मंगळसूत्र घातलें होतें. नाकांत नथ नि कानांत कुडचा. सपले दागिने! केसावर बकुळीचा गजरा. बऱ्याच दिवसानी वहिनीच्या सौंदर्याचा दादाना नव्यानें साक्षात्कार झाला काय? सुगंधा काय म्हणाली त्याना ऐकूच आले नाही. सदाभाऊ आला तेव्हां वहिनी त्याला घेऊन निघून गेली. दादा मागें वळले. सुगधाच्या चर्येकडे लक्ष जाताच त्यानीं विचारले,

"तू काहीं म्हणालीस गधा?"

"छे! कुठ काय?" हातातली मोगरीच्या कळचाची . वेणी आरशापुढे मिरकावून देऊन सुगधा म्हणाली.

* * *

दुसऱ्याच दिवशी सुगंधा वहिनीकडे जाऊन म्हणाली, "तुमचं जडावाचं मगळसूत्र मला द्या. नि हा तन्मणि तुम्हाला ठेवून घ्या!" हें वहिनीला अनपेक्षित होतें.

"जुन्या घडणीचा दागिना तो. तुम्हाला का शोभणार आहे? आणि तुमचा दागिना नको मला. आहेत तेच घालण होत नाही."

"मला ते मगळसूत्र हवंय. तुम्ही वाटल्यास हा तन्मणि नका घेऊं. त्याच्याबद्दल दुसरा आवडेल तो दागिना मागून घ्या. मी सागते तसं दादासाहेबाना."

दादावर आपलाच हक्क अधिक आहे ह्या जाणिवची धार सुगधाच्या आवाजाला होती. तिने वहिनीच्या मनाला जखम झाली. ती काहीच बोलली नाही. तिथून उठली अन् परसदाराच्या पायरीवर बसली. तिथून बकुळीखाली बसलेला सदाभाऊ दिसतोय्. वहिनीच्या आसपास राहता येत नसेल तेव्हां सदाभाऊ बकुळीखाली असतो. त्याच्या आईने ही बकुळ नि तो प्राजक्त लावला. नि सदाभाऊला त्या रोपट्याना पाणी घालायचा नाद लावून दिला. त्याच्या जीवनात वहिनीच्या खालोखाल ह्या बकुळीला स्थान आहे. बसल्या जागेवरूनच तो वहिनीकडे पाहून हंसला. ती विषण्णपणाने हसली न् एकदम कोणी हाक मारावी; तशी उठून आत गेली.

दादाना पुढें करून सुगंधा पुन्हां आली होती, दादा म्हणाले;

"उमा, तें जडावाचं मंगळसूत्र दे गंधाला. तुला तसच करवून आणतों दुसरं!"

भरल्या बाजारात सर्वस्व लुटलं जावं तशी वहिनी केविलवाणी झाली.

तिला कुठं दागिन्यांचा सोस आहे! पूर्वीं ती सासूच्या हौसेखातर आणि पतीच्या दृष्टिसुखाखातर दागिने घालीत होती. आतां तशी गरज राहिलेली नाही. घराण्याच्या प्रतिष्ठेसाठी अंगावर चार दागिने घालणें भाग आहे, म्हणून ती मोजके दागिने, बाहेर पडायच्यावेळी घालते.

तें जडावाचं मंगळसूत्र, ती नथ नि कुडचाएवढे दागिने घातले तरी उमा साक्षात् उमागौरी सारखी दिसते असा निर्वाळा सासूबाईंनीच दिला होता ना? ह्या तिन्ही वस्तु तिच्या लग्नाच्या दिवशीं, वरातीनतरच्या लक्ष्मीपूजनाच्या वेळी सासूबाईंनी तिच्या अगावर स्वतःच्या हातानी चढविल्या होत्या. त्या वेळी तेव्हां ती मामंजीना नमस्कार करायला वाकली जेव्हा गद्‌गद होऊन ते म्हणाले होते;

"हें खरं लक्ष्मीपूजन, बेटी! पुत्रवती औक्षवती हो!"

दुसऱ्या कुठल्याहि दागिन्याचा तिला मोह नाही, ह्याचे आणखी एक कारण आहे; तिला माहीत आहे हे दागिने ती घालते तेव्हां पतीची नजर तिच्या मुखावरून ढळायला तयार होत नाही.

"देतेस ना उमा? माझा शब्द मोडणार काय तू?" दादाच्या आवाजात बदल झालेला होता.

ती स्वतःच्या खोलीत जाऊन डबा घेऊन आली आणि तिनें तो डबा सुगंधापुढें ठेवला.

बकुळीखालून सदाभाऊ उठला होता. वहिनीच्या त्या हंसण्याने त्याचें समाधान कुठें झाले होते; तो येऊन दरवाज्यात उभा आहे इकडे कुणाचेच लक्ष नव्हते. दागिन्याचा डबा न घेता सुगंधा म्हणाली;

"मला फक्त जडावाचं मंगळसूत्र हवंय!" वहिनीनें डबा उघडून त्यातून मंगळसूत्र काढून सुगंधापुढें केले.

वाऱ्याच्या वेगाने सदाभाऊ मध्यें आला. वहिनीच्या हातांतले मगळसूत्र एकदम घेऊन त्यानें आपल्या रुंद पंजाच्या मुठीत सामावून घेतलें. आणि सुगधेकडे संथपणानें पाहात तो उभा राहिला, निश्चळ!

सुगंधा चटकन् दोन पावलें मागें सरली न् दादाला कांपऱ्या आवाजात म्हणाली;

"बघा आतां तुम्हीच. तुमच्यासमोरच होतंय् हें बरं होतंय!"

सदाभाऊ वहिनीच्या पुढें उभा होता. त्याच्या दंडाला धरून त्याला वळवायचा प्रयत्न करीत वहिनी म्हणाली; "असं करूं नये सदाभाऊ." एरवी वहिनीच्या शब्दावर हलणारा सदाभाऊ जागचा हलला नाहीं. दादा जरबेच्या आवाजात कर्कश्श ओरडला; "इकडे आण तें सदा!"

त्याच्या नजरेला नजर देत, एकेक शब्द उच्चारीत सदाभाऊ शांतपणानें म्हणाला;

"तें आईच आहे!"

दादा सतापून कानाच्या पाळीपर्यंत लाल झाला होता. त्याने सदाभाऊला मारण्यासाठी हात उगारला. वहिनी सदाभाऊच्या पुढें येण्याचा प्रयत्न करीत ओरडली;

—"हूं हूं! हें काय मलतच. देवा रे!" सदाभाऊने डाव्या हातानें वहिनीला निवारून पाठीमागें सारले. तो दादाच्या नजरेला नजर देत ताठ उभा राहिला. दादाचा हात खाली आला. तो वेगाने तेथून निघून गेला. त्याच्या पाठोपाठ सुगधा.

वहिनी धांवतच देव्हाऱ्यापुढें गेली अन् आक्रोशून म्हणाली; "तूं काय काय धिंडवडे करणार आहेस माझे? काय काय पाहायला लावणार आहेस मला?"

सदाभाऊ वहिनीजवळ गेला. तिच्याजवळ बसला. पुन्हां उठला. त्यानें तिथें पडलेल्या किल्ल्या, दागिन्याचा डबा उचलला. तें मंगळसूत्र डब्यांत ठेवलं. ते सारं ठिकाणीं ठेवून कुलूप लावून तो किल्ली घेऊन वहिनीकडे आला. किल्ली वहिनीजवळ न देता आपल्या खिशांत ठेवली न् मग तो वहिनीजवळ बसून राहिला. तिच मनसोक्त रडून झाल्यावर ती ह्याच्याकडे पाहील. तोंपर्यंत तो निश्चल बसून राहील.

* * *

सुगधेने धोरण बदलले. ती सदाभाऊशी गोड वागत होती. "जेवलात कां?", "काय आवडलं आज?", "माझ्या बरोबर फिरायला येणार काय?" असे काही तरी विचारीत होती. पण सदाभाऊ हो म्हणत नव्हता की नाही म्हणत नव्हता. त्याची दवाखान्यांत रवानगी करण्यासाठी दादाचे मन वळवण्याचे प्रयत्नहि चालूच होते. पण त्यांतहि तिला यश येत नव्हते. वहिनी उदास होती. अलिप्तपणानें वावरत होती.

[पृष्ठ २९ वर पाहा]




## झाला शिवबा छत्रपति

झाला शिवबा छत्रपति ।
काय तुला आशीर्वच देऊं, होय स्वप्नपूर्ती ।। ध्रु० ।।
उन्मादानें कड्याकपाऱ्या शिरशिरले किल्ले
कौतुक बघण्या गडाभोंवतीं लाख नेत्र जमले
शिवशंकर परमेश्वर माझ्या पोटीं अवतरले
पवित्र झाली पदस्पर्शानें कणकण ही माती ।।

लाल चित्र तें इतिहासाचें नेत्रीं मीं पाहिलें
आर्त हृदय आक्रोश भयानक कर्णीं मीं ऐकिले
दास्यलेख सुलतानी काळ्या पाषाणीं कोरिले
हृदयीं तरीहि ज्योत शुभंकर तेवत मम होती ।।

त्या ज्योतीचें तेज घेउनी बाळा तूं जन्मला
ज्योतीच्या त्या प्रखरतेंतुनी उदय तुझा झाला
मंगल त्या ज्योतीमधुनी तूं, इन्द्र इथें प्रकटला
स्वर्ग सजविला पराक्रमानें भूवर तूं संप्रति ।।
मनोराज्य मीं रचिलें होतें या शुभ दिवसाचें
हृदयीं जपलें नित्य शुभंकर चित्र भविष्याचें
विश्वविरंचे ! तूं रचिलें हें नगर मानसाचें
त्या नगरींतिल सिंहासनिचा झाला तूं भूपति ।।

हास्य फुलविलें धरतीच्या तूं दीन मुखावरती
हसली पाहुन तुझा सोहळा श्यामल ही धरती
नयन-शिपल्यांमधुनि वाहती मोदाचें मोतीं
तिचे उभे आशीर्वच बाळा नित्य तुझ्या पाठीं ।।

उणीव झरते डोळ्यांमधुनी एकच मम आतां
पतिवांचुन हा पुत्रसोहळा भासे अपूर्णता
मोद झिरपतो एका नयनीं यशोदुंदुभीचा
अश्रुविमोचन वैधव्याचें नित्य दुज्या नेत्रीं ।।
असता जर तव पिता बैसला असतां सिंहासनीं
छत्र शिरीं तूं धरिलें असतें त्याच्या नृप म्हणुनी
कल्पित आतां घडेल कैसें सत्याश्रय सोडुनी
कर्तव्याचा दंड करीं घे मुकुट घाल माथीं ।।

*—विनायक वि. कुलकर्णी*



## मुग्धा

लाल ओठांचीं तोंडलीं
त्यांच्यांतून निघूं दे ना
मनांतलें हीतगूज–
थांबविशी अधरांना
नयनांची नयनांना
फुका भूमि न्याहाळून
मनांतील भावनांचा
नयनाच्या पाण्यांतून
किती सारखे सारखे
पदरानें झांकून कां ?
भूमि कांपतसे तेव्हां
भूगर्भि शांतता हे
एकसारखा होतसे
मुडपलें अधरहि
फुका झाले यत्न सारे–
त्याच प्रयत्नानें आली–

जरा होऊं दे अलग
माळ शब्दांची सलग
काय येईल तें ओठीं
याच काय भीति पोटीं ?
होऊं दे ना भेट-गांठ
टाळशी कां दृष्टादृष्ट
तिथें दिसेल कल्लोळ
खास दिसे मनतळ
उगी झांकशी उरोज
थांबे त्याची तगमग
गिरीशीखर हादरे
मान्य होइल कां बरें ?
ऊर तुझा वरखालीं
दृष्टि तुझी भूमिवरी
नको कळाया इंगीत
मुग्ध क्रीडेला रंगत

*—रामचंद्र हिंगणे*

# भीमातीरीं

भीमातीरीं माझा गांव
भीमा येथें चंद्राकार
दिनरात कीर्तनांत
गुंग होइ चराचर १

ओघ रुपेरी जलाचा
चुरा पात्रांत चांदीचा
गारगोटी हिरेटाळ
ध्वनि त्यांत विठ्ठलाचा २

भक्त सखा पुंडलीक
मायबापांची ती सेवा
करोनिया रात्रंदिन
उभा केला गोड ठेवा ३

गोड ठेवा लाभायला
दिसे मार्ग ज्ञानेशाचा
वारकरी मानतात
कळस तो तुकयाचा ४

रामदासा दिसे राम
नरहरीशीं शंकर
भेटीसाठीं बादशहा
झणि सोडितो बिदर ५

नामा-चोखयांची जोडी
आहे समोरासमोर
अति आवडे प्रभूला
बुक्का तुळशीचा हार ६

नित्य नेमें झडतसे
ढोल सनई चौघडा
भक्ताचिया भेटीसाठीं
देव भुकेजुनी वेडा ७

गेले शैशव खेळांत
यौवन तें संसारांत
'नरा' मुक्ति येथें लाभो
हीच आस मन्मनांत ८

*— स. ज. कापसे*

# निर्विकार

तांबरले डोळे
रडून संध्येचे
मानस सूर्याचें, द्रवलें न
निशेनें तोडिले
पायींचे पेंजण
चन्द्राचें भ्रमण, थांबलें न
पश्चिमेला उभें
शुक्राचें चांदणें
पूर्वेच्या गालीं न, मोह-रंग
क्षणैक सुखार्थ
विसरो तुला न
राहो असे मन, निर्विकार

*— रमेश वामन पोंगडे*

# अगाध लीला तुझी माधवा !

अगाध लीला तुझी माधवा ! ॥ धृ० ॥
चोरुन खाशी दहिदुधलोणी
भजती कां मग तुला गौळणी
मला कळेना नवल केशवा !
ज्यांच्या करशी खोडयाचाडया
तुजसाठीं कां त्या रे वेडया ?
लागे ना मज कांहि सुगावा !
तुझ्या मुरलिनें स्थिरचर डोले
दर्शनवेडें उत्सुकलेले
संतोषाचा अर्थ कळावा !
खेळ खेळशी जगांत नाना
कां न दाविशी मज ते कृष्णा ?
दुजा भाव ना असा धरावा !

*— प्रताप*

# चेकॉव्हच्या दोन कथा



: रूपांतर :

**वि. ग. कानिटकर**

इंजीनिअर बर्वे टेबलाशीं बसलेले होते. त्यांचें मन आज भरकटलेलें होतें. आणि यामुळें त्यांना उदासीन वाटत होतें. संध्याकाळींच ते एका सिनेमाला गेले असतां तिथें त्यांना त्रिवेणी चित्रे दिसली. वीस-पंचवीस वर्षांपूर्वी त्यांनीं तिच्यावर प्रेम केलें होतें. त्या वेळीं त्रिवेणीच्या प्रेमांत कुणींहि सांपडावें अशी ती तजेलदार आणि सुरेख दिसत असे. बर्व्यांना विशेषेंकरून तिचे भावानोत्कट —— बदामी डोळे आठवले. त्यांत निळसर झांक होती, आणि त्या नेत्रकमलांत उचमळणाऱ्या पाण्याचाच शिडकाव तिच्या लांबसडक केसांवर केलेला असे. ती सहसा कुणाशीं बोलत नसे. ती क्वचितच दिलखुलास हंसे पण जेव्हां ती स्मितमुखी दिसे त्या वेळीं —— मेणबत्तीच्या सौम्य प्रकाशासारखी ती आसमंत उजळून टाकीत आहे, असा पाहणाऱ्याला भास होई. पण आज त्यांनीं काय पाहिलें ? गाल खालीं गेलेली – सुकलेली – पिवळसर दांतांची रांग दाखविणारी – त्रिवेणी !

"Shocking !" बर्वे स्वतःशींच म्हणाले, असें म्हणतां म्हणतांच हातांतल्या पेन्सिलीनें ते समोरच्या पॅडवर रेघोटचा ओढूं लागले. त्यांच्या मनांत आलें – "खरोखरच निसर्ग किती क्रूर आहे. त्रिवेणीला जर पूर्वींच कळलें असतें; आपली पुढें अशी अवस्था होणार आहे; तर त्या कल्पनेच्या धसक्यानेंच ती कदाचित् गतप्राण झाली असती."

थोडा वेळ विचारांत ते गुरफटून गेले. मग एकदम ते विंचू डसल्यासारखे ताडकन् उभे राहिले –

[ पुष्ठ २८ वर पाहा ]

# गरीब



: रूपांतर :

भीमराव कुलकर्णी

• मुलांना गोखलेबाईंची शिकवणी ठेवली होती. कांहीं दिवसांपूर्वी मीं त्यांना बोलावणें पाठविलें व माझ्या अभ्यासिकेंत त्यांची वाट पाहत बसलों.

'बसा, बाई !' त्या आल्यावर त्यांना मीं आसन देऊं केलें आणि म्हटलें, 'हं, आतां आपण तुमचा हिशेब पुरा करूं या. सणासुदीचे दिवस जवळ आले आहेत आणि पैशाची अतिशय गरज असतांहि संकोची स्वभावामुळं तुम्हांला पैसे मागण्याचा धीर होत नसेल म्हणून मुद्दाम मीं तुम्हांला बोलावून घेतलं. बरं, तें राहूं द्या. मला वाटतं महिन्याला तीस रुपये देण्याचा आपल्यामध्यें करार झाला होता ?'

'चाळीस.'

'नाहीं हो, तीस रुपये. मीं त्यांची डायरी-मध्यें नोंद ठेवली आहे. मीं यापूर्वीदेखील शिकवणीदाखल सगळ्यांना तीस रुपयांवरच ठेवलं होतं. बरं, ही गोष्ट नक्की झाली ! ... नंतर, तुमची शिकवणी सुरू होऊन दोन महिने झाले, तेव्हां...'

'दोन महिने पांच दिवस.'

'नाहीं, नाहीं. बरोबर दोनच महिने. मीं इथं त्याची बरोबर नोंद केली आहे. आतां तुम्हांला साठ रुपये दिले पाहिजेत. त्यांमधून नऊ रविवार काढून टाका...आणि...तुम्ही निशीची कोणत्याच रविवारीं शिकवणी घेतली नाहीं. रविवारीं त्याच्याबरोबर पर्वतीला फिरावयाला जात होतां, तसंच या काळांत मध्यें तीन सुट्ट्या...'

गोखलेबाई संतापानें लाल झाल्या. त्यांचें मुळांतून गोरें असलेलें नाक तापलेल्या नळी-प्रमाणें दिसूं लागलें. परंतु आपल्या चुरगळलेल्या पदरावरून हात फिरवून तो साफ करण्यापेक्षां त्या कांहींच बोलल्या नाहींत.

'तीन सुट्ट्या ! म्हणजे बारा रुपये कमी झाले. चार दिवस निशी आजारी होता आणि त्याच्या शिकवणीला बुट्टी दिली होती आणि त्यामुळें तीन दिवस नुसत्या लिलीला तुम्हीं शिकवलंत...तीन एक दिवस तुम्हांला दाढ-दुखीचा त्रास होत होता म्हणून आमच्या मंडळींनीं तुम्हांला अर्धा तासच शिकवणी घ्यायला सांगितलं होतं...बारा आणि सात... म्हणजे बारान् सात...एकोणीस...वजा करा... म्हणजे.. म्हणजे ! !...एकेचाळीस रुपये... बरोबर ?'

गोखलेबाई थरथर कांपत होत्या आणि त्यांचे डोळे अश्रूंनीं डबडबले होते. त्यांना एक सौम्य खोकल्याची उबळ आली आणि भरलेलें नाक शिंकरून त्या तशाच बसून राहिल्या. एकहि शब्द नाहीं.

'आणि हे पाहा, मी विसरलोंच होतों !' आपल्या डायरीचीं पानें चाळींत मीं पुढें म्हटलें, 'गणेशोत्सवाच्या वेळीं तुमच्या हातून चहा घेतांना कपबशी फुटली. त्याचे दोन रुपये कमी करा. तुम्हीं फोडलेला कप भारी किम-तीचा होता. आमच्या लग्नांत प्रेझेंट मिळा-लेला...पण तें जाऊं द्या. बरं आणखी काय राहिलं ? 'हो...तुमच्या निष्काळजीपणामुळं निशी एकदां अंगणांतील झाडावर चढला आणि आपला स्वेटर त्यानं फाडून घेतला. त्याचे दहा रुपयेच धरूं या...फार नको...तसंच तुम्ही लिलीला एकदां देवळांत घेऊन गेलां होतां आणि तुमचं लक्ष नसल्यामुळं तिच्या चपला चोरीला गेल्या. माणसाचं कसं सगळी-कडं लक्ष पाहिजे....त्याचे पांच रुपये...आणि... ऽआणि काल दसऱ्याच्या सुमाराला मीं तुम्हांला दहा रुपये दिले.'

'तुम्ही नाहीं दिले !' बाई हळूच पुटपुटल्या.

'मग माझ्या डायरींत ही नोंद कुठून आली !'

'बरं...ठीक आहे.'

'आता एकेचाळीसांमधून सत्तावीस काढून टाका. म्हणजे...ऽ म्हणजे...सातन् चार अकरा, हातचा एक...एकन् दोन तीन आणि तीनन् एक चार...म्हणजे चौदा रुपये राहिले.'

दोन्ही डोळे पाण्यानें भरून आले. सारें शरीर थरथरूं लागलें. क्षीण, टोकदार नाकाच्या शेंड्यावर घामाचे थेंब जमा झाले. गरीब विचारी!

'फक्त एकदांच मी तुमच्याकडून पैसे घेतले होते.' अगदीं क्षीण व रडवेल्या आवाजांत त्या म्हणाल्या, 'आणि तेहि तुमच्या मिसेस-कडून ..फक्त तीन रुपये...त्यानंतर एकहि पैसा घेतलेला नाही...' 'खरच! म्हणजे आता तुम्हीच पाहा मी त्याची नोंद ठेविलीच नव्हती म्हणजे चौदा मधून पुन्हा तीन काढून टाकले पाहिजेत...म्हणजे फक्त अकराच राहिले की! हं, घ्या ही तुमची रक्कम. ह्या पांचापाचांच्या दोन व वरती ही एकाची नोट!'

मी त्यांना अकरा रुपये दिले. त्यानी ते थरथरत्या हातानें मुकाट्याने उचलले व तसेच चुरगळून रुमालात सरकवले.

'उपकार... 'त्या पुटपुटल्या.

'उपकार? कसले उपकार?' मी विचारलें

'पैसे दिल्याबद्दल...'

'अहो पण मी तुम्हाला बनवल, फसवल, खरोखर तुमच्या रकमेवर सरळ सरळ घाला घातला, तुमचा खिसा कापला. मग उपकार... उपकार कसले?'

'दुसऱ्या ठिकाणी लोकानी एवढहि दिलं नाही. काहीच दिल नाही.'

'काहीच दिल नाही? काहीच नाही?... त्यात आश्चर्य कसल! मी तुमची केवळ गमत केली. एक निष्ठुर धडा...केवळ तुम्हाला धडा शिकविण्यासाठी...मी तुम्हाला तुमचे सगळेच्या सगळे ऐशी रुपये देणार आहें! हे पाहा, इथ एका पाकिटात दहाच्या आठ नोटा घालून ठेवून दिल्या आहेत...खरोखर इतक कणा-विहीन असणं तुम्हाला शक्य आहे? तुम्ही विरोध कां करीत नाही? थोडीशी मान कां उचावीत नाही? का इतक्या शात राहतां? या जगात कसलेच छक्के पजे न ठेवता कस राहता येईल? कशा अगदीच अशा खुळ्या हो तुम्ही!'

त्या नुसत्याच हसल्या परतु त्यांचा चेहरा बोलका होता. जणू सागत होता की, 'हे सर्व शक्य आहे!'

मी त्याची क्षमा मागितली, इतके निष्ठुर नाटक रगविल्याबद्दल! आणि त्याना ऐशी रुपये दिले. त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्याचा छोटासा भाव प्रगटला. जाताना फक्त सौम्य स्वरात 'उपकार' एवढेंच त्या पुटपुटल्या आणि हळूहळू पावले टाकीत त्या निघून गेल्या.

त्याना जात असताना मी पाठमोरे पाहिले आणि स्वत शीच म्हटले,

'गरिबाना चिरडणं या जगात किती सोपं आहे!'

● ● ●

## शोध

[पृष्ठ २६ वरून चालू]

"बाप रे!" उठता उठता त्यांच्या तोंडून उद्गार निघाला—"मला हें माहीतच नव्हतं—मला चित्र काढता येतात—!!"

त्याच्या समोरच्या पॅडवर त्यानी ज्या रेषा ओढल्या होत्या त्या गुताळ्यांतून एका स्त्रीचा मोहक चेहरा जन्म घेऊन त्याच्या-कडे पाहत होता. ज्या त्रिवेणीवर त्यानी प्रेम केले—तिचाच तो चेहरा होता. वरवर पाहता त्या चेहऱ्यांत फारसे विलक्षण काही नव्हते. पण त्रिवेणीच्या डोळ्यातील मद-स्निग्ध भाव—चेहऱ्याची ठेवण आणि विपुल केसाचे दर्शन त्या चित्रात जसेच्या तसे प्रतीत झालें होते.

"आश्चर्य आहे" इजीनिअर बर्वे मना-शीच म्हणत होते—"मला चित्र काढता येतात! बावन्न वर्षे वयाला झाली परतु आपल्याजवळ असली कला असूं शकेल याचा सशयदेखील कधी आला नाही आणि आता म्हातारपणी—ध्यानीमनी नसता—नी कला-वन आहें याचा साक्षात्कार झाला! कसं शक्य आहे हें!!"

डोळ्यावर विश्वास बसेना म्हणून बर्व्यांनी पेन्सिलीनें पहिल्या चित्राच्याच शेजारी एका म्हातारीचे स्केच रेखाटले. तेहि सुदर उतरलें.

"कमाल आहे!" असे म्हणत त्यानी खादे उडवले. "मीदेखील कुणी तरी आहें! नुसताच भारवाहू हमाल नाही! छे., छेः, हे थोड आधीच कळायला हवं होतं!

कोटाच्या खिशात अचानक शभराची नोट सापडली असती किंवा—एक्झिक्यूटिव्ह इंजी-निअरच्या जागेवर बढती मिळल्याची ऑर्डर अचानक हाती पडली असती तरीदेखील बर्व्यांना एवढा आश्चर्याचा धक्का बसला नसता. आपण सृजनशील कलावंत आहोत या विचाराने त्याना वेड लागायची पाळी आली. एक तासभर तर टेबलाशी बसून माणसाचीं डोकी, झाडें—विहिरी—घोडे—आठवेल त्याची स्केचेस ते करीत राहिले.

थोड्या वेळानें जेवणाची वर्दी मिळाली तेव्हाच त्याचा चित्रकलेच्या उपासनेत खड पडला. रविवार असल्यामुळें जेवणाचा बेत जरा विशेष होता. पुऱ्या सुधारसावर ताव मारल्यामुळें—जेवल्यानतर त्याना सुस्ती आली. पलगावर आडवे झाल्यावर ते आठवू लागले—

बावन्न वर्षांत कधी आपल्यामध्यें कला-वताचे मन आहे याचा त्याना पत्ता लागला नाही. या सर्व आयुष्यभर त्याना कलेची ओढ विलक्षण होती. तसे पाहिले तर शाळेंत त्यानी एकदा नाटकात काम केलें होते आणि आजतागायत त्याचा नाटकासिनेमाचा नाद—काही चागल वाचल—तर ते लिहून ठेव-ण्याची सवय—या गोष्टी शाबूत होत्या. ते चागल्या प्रकारें सभातून बोलू शकत असत. खासगी सभाषणातून त्याची विनोदबुद्धि त्याना नेहमी साथ करी. त्याच्या मनात आले. "एकूण काय—आपल्यात कलावताचे मन होते यांत सशय नाही—पण या धकाधकीच्या—आणि प्लॅन-एस्टिमेटस्च्या आयुष्यात त्या मनाचा पार चोळामोळा झाला हेच खरें.

"कदाचित् आपल्याला कविता करता येतील—नाटके लिहिता येतील? छे: छे: तारुण्याच्या उमेदीत हा साक्षात्कार झाला असता तर एव्हाना आपण मोठे चित्रकार किंवा कवि—नाटककार झालों असतो पण

आतां त्यांच काय ? –"

मग त्यांच्या कल्पनाविश्वांत ते रंगूं लागले. त्यांचं जीवन इतर सामान्यांहून किती निराळं वेगळं झालं असतं – कलावंताला पदवी-पैशांचा मोह नसतो – त्यांच्या कलानंदांत ते मशगुल असतात –'

असे विचार मनांत येत असतांनाच त्यांना लहानपणचा एक प्रसंग आठवला. एकदां वडिलांचा हात धरून ते सदाशिवपेठेंतून जात असतांना समोरून येणारा एक चेहऱ्यावरून चक्रम वाटणारा माणूस त्यांना भेटला. त्याचे डोळे तारवटलेले होते, दाढी वाढलेली होती, धोतराला ठिगळ होतें. चेहऱ्यावर सगळा फिकेपणा होता. वडील थांबून त्या माणसाचा हात दाबीत किती वेळ तरी बोलत होते. "कोण हो हे ?" त्यांनीं वडिलांना विचारलें. "ते फार मोठे कवि आहेत. लोककवि म्हणतात त्यांना –" वडिलांनीं खुलासा केला होता. मोठमोठ्या सरकारी अधिकाऱ्यांशीं उर्मटपणें वागणाऱ्या वडिलांनीं अंगावर फाटकें घातलेल्या – मळखाऊ कविराजांशीं प्रेमानें बोलावें या घटनेचा त्या वेळीं त्यांच्या मनावर फार परिणाम झाला होता.

"कलावंत स्वतंत्र असतो. कुणाचा गुलाम नसतो –" कुशीवर वळतांवळतां इंजीनिअर बर्वे मनाशीं म्हणत होते. "शिवाय किती कीर्ति आणि प्रसिद्धि ? मी या नोकरींत किती मोठा झालों – माझं नांव सरकारी गॅझेटांत किती वेळांहि आलं तरी त्याला काय अर्थ ! असे कित्येक आहेत. कवि किंवा चित्रकार – स्वतः झोपलेला असला किंवा दारू पिऊन झिंगलेला असला – तरी त्याच क्षणाला – कितीतरी खेड्यांतून शहरांतून त्यांच्या कलाकृतींचं कौतुक चाललेलं असतं. अशा कलावंतांचीं नांवं माहीत नसणं हीदेखील सुसंस्कृत माणसाला न शोभणारी अशी गोष्ट समजली जाते –"

विचार निमूळते होत भावनेच्या वर्तुळांत रिंगण घेऊं लागले तेव्हां त्यांनीं उश्या नीट करून डोळे मिटले.

तितक्यांत त्यांचा जीप-ड्रायव्हर आला. म्हणाला, –" दुपारीं बाईसाहेबांना आणि तुम्हांला फिरायला जाण्यासाठीं जीप किती वाजतां आणूं ?" इंजीनिअर बर्व्यांनीं डोळे किलकिले करून –" बाईसाहेबांना विचार–" असें म्हणून त्याला पिटाळलें. तो निघून जातांच त्यांच्या डोळ्यांपुढें – रस्त्यांतून अनवाणी – दाढी वाढलेला – ठिगळलेल्या कपड्यांनिशी चालणाऱ्या त्या कविराजांची मूर्ति उभी राहिली.

विचारांनीं पुनः पलट खाल्ली – " मोठं नांव आहे, प्रसिद्धि आहे ! काय उपयोग त्याचा.



अँटन चेकॉव्ह

त्याच्या नांवाला लोक मोल देतात आणि त्या माणसाला मात्र विसरतात – तो अनवाणी फिरतो – त्याला धड जेवायला नसतं – त्याचीं मुलंबाळं – एवढे मोठे गडकरी ..! " त्यांच्या बायकोची हकीकत नुकतीच त्यांनीं वाचली होती –

"आहे हे ठीक आहे –" असें मनाशीं म्हणत जड झालेल्या पापण्यांना अखेर इंजीनिअर बर्व्यांनीं शरणागति दिली आणि मऊ गादीवर त्यांना शांत झोंप लागली. ●●●

## आडमुठा

[ पृष्ठ २३ वरून चालू ]

गड्याकडून सुगंधानें सोनचांफ्याचीं फुलें काढून घेतलीं. ओंजळींतलीं फुलें हुंगीत ती सदाभाऊकडे आली. तो बकुळीचीं फुलें वेंचीत होता. तिनें म्हटलें.

"काय तीं बारीक बारीक मातकट फुलं वेचावयाचीं सदाभाऊ ! हीं सोनचाफ्याचीं फुलं पाहा. दिसायला सुंदर, वासाचा घमघमाट–"

सदाभाऊनें तिच्याकडे न पाहतां आपलें काम चालूं ठेवलें.

बघा तरी इकडं. फेका तीं दरिद्री फुलं–" सदाभाऊनें वळून पाहिलें. आणि मग तो बकुळीचा गजरा करण्यासाठीं झाडाच्या बुंध्याशीं बसला.

"आधीं मला ह्या सोनचांफ्याचा गजरा करून द्या ना !" त्याच्यापुढें फुलें ठेवून तिनें मोठ्या गोड आवाजांत विनंति केली.

सदाभाऊनें तीं सोनचांफ्याचीं सारीं फुलें उचललीं. तो सावकाश विहिरीकडे गेला नि तीं सारीं फुलें त्यानें विहिरींत टाकून दिलीं आणि तो कट्ट्याला टेकून आंत डोकावून पाहात बसला.

चांगुलपणाच्या कवचाला एकदम तडा जाऊन सुगंधा भडकली;

"हें काय सदाभाऊ ? फुलं विहिरींत कां टाकलीं ?" तेवढ्यांत वहिनी दाराशीं डोकावली. एकदम धावत येऊन सदाभाऊच्या दंडाला धरून मागें खेंचीत म्हणाली;

"विहिरीशीं जायचं नाहीं म्हणून बजावलं होतं ना ?" सदाभाऊ जागचा हलला नाहीं. दंडावरच्या वहिनीच्या हातावर आपला उजवा हात ठेवून तो शांतपणानें उभाच राहिला. "आतां कसं वागायचं तुमच्या लाडक्या दिराशीं तें तुम्हीच सांगा. मीं मोठ्या प्रेमानें त्याला सोनचांफ्याचीं फुलं दिलीं आणि त्यानं तीं सारीं विहिरींत टाकलीं."

वहिनीनें डोकावून पाहिलें;

"होय सदाभाऊ ? हें काय वेड्यासारखं ? पांचपंचवीस फुलांनीं माठांतल्या पाण्याला सुगंध लागतो. विहिरीच्या पाण्याला कां लागणार आहे तसा ? चला बघूं घरांत !"

ओढणाऱ्या वहिनीच्या प्रयत्नानें तसूभरहि न हलतां तो म्हणाला;

"मला आवडत नाहींत तीं फुलं !"

सुगंधा उसळून म्हणाली;

"आवडत नाहींत म्हणून विहिरींत कां टाकायचीं ?" तिच्या नजरेला नजर देत, सावकाश एकेक शब्द उच्चारीत सदाभाऊ संथपणानें म्हणाला,

"आवडत नाहींत तें विहिरींत टाकीनच !"

त्या नजरेला नजर द्यायला सुगंधा विचकली. तिचा थरकांप झाला. ती मागें मागें सरकली आणि पळतच घरांत शिरली.

आणि मग हट्ट करून सुगंधानें गांवांत वेगळं बिऱ्हाड मांडलें. ●●●



# बाप्पादित्य

## अवनींद्रनाथ

भुसा जसा पहिल्यांदां धुक्‌धुक् करीत अन् शेवटीं एकदम् भडाडून जळायला लागतो, तसंच गुहाच्यानंतर रजपुतांच्यावरला भिल्लांचा राग हळूहळू थोडा-थोडा वाढत-वाढत एक दिवस डोंगरा-डोंगरांत, वना-वनांत वणव्यासारखा पेटला.

गुहाचा सुंदर चेहरा, अमर्याद दया, अढळ साहस ह्या गोष्टी ध्यानांत ठेवून भिल्ल-लोकांनीं आठ पिढ्यांपर्यंत रजपूत राजांचे सगळे अत्याचार सहन केले होते. जेव्हां एखादा रजपूत राजा शिकारीला जातांना वाटेंत एखाद्या भिल्लाच्या काळ्या अंगांतून भाल्याच्या घावानं रक्त सांडून निघून जायचा तेव्हां त्यांना आठवायचं—— राजा गुहानं आपल्याच वंशांतल्या एकाला वाघाच्या तोंडून वांचवून आणून स्वतःच्या हातानं त्याच्या छातीवरलं रक्त पुसलं होतं. जेव्हां एखादा राजकुमार आपली लहर भागवण्याकरितां गांवच्या-गांवं पेटवून देऊन मजा बघत राह्यचा, तेव्हां त्यांना आठवायचं——एके वर्षी, दुष्काळांत राजा गुहानं आपला प्रचंड राजवाडा ठांसून भरलेलं धान्याचं कोठार निराश्रित, दीन, दुःखी भिल्ल प्रजेकरितां सबंध वर्षभर उघडं ठेवलं होतं.

दुर्दैवानं लढाईंत विजय मिळाला नाहीं, तर जेव्हां एखादा भेकड युवराज विश्वासघातकी म्हणून सेनापतींचीं डोकीं एकामागोमाग एक हत्तीच्या पायाखालीं चुरडून टाकायचा तेव्हां सगळं भिल्लसैन्य डोळ्यांतलीं असावं पुसायचं सगळ्यांना आठवायचं——हाय हाय महाराज ! गुह जेव्हां होते, तेव्हां लढाईच्या वेळेला ते भावासारखी आपली काळजी घ्यायचे, आई-सारखं आपलं रक्षण करायचे, वीरासारखे सगळ्यांच्या पुढं असायचे.

इतके अत्याचार होत होते, इतका अपमान होत होता, तरी त्या एकनिष्ठ भिल्ल-प्रजेचं सरळ मन आठ पिढ्यांभर विश्वासानं राजभक्तीनं भरलेलं होतं. पण बाप्पादित्याच्या वडलांनीं——नागादित्यानं—— राजसिंहासनावर बसून जेव्हां घोर अत्याचार सुरू केले, गरीब प्रजेचीं गांवं पेटवून देऊन अन् त्यांचीं शेतं उजाड करून टाकून जेव्हां त्याचं मन संतुष्ट झालं नाहीं, हजारों भिल्लांच्या बायकापोरी जेव्हां तो दासींसारख्या रजपुतांच्या घरोघर वांटून द्यायला लागला, रोजच नवनवे अत्याचार झाले नाहींत तर जेव्हां त्याला झोंप येईनाशी झाली, अन् शेवटीं सगळ्या भिल्लांना प्राणाहून प्रिय असा त्यांचा एकमेव आनंद——वना-वनांत पशूंची शिकार करणं—— तोहि ज्या दिवशीं नागादित्यानं कायद्यानं अजिबात बंद करून टाकला, त्या दिवशीं भिल्लांच्या सोशिकपणाचा बांध मोडून पडला.

हा नवा कायदा भिल्ल-प्रजेवर जारी करून सबंध रात्र सुखाच्या स्वप्नांत घालवून,

नागादित्यानं सकाळीं उठून पाह्यलं–दिवस चांगलाच ढगाळ आहे, थंडगार वारा सुटला आहे, कुठंच धूळ नाहीं, शिकारीकरितां चांगली संधि आहे. तत्क्षणींच हत्ती सजवून लवाजमा घेऊन नागादित्य बाहेर पडला. त्या दिवशीं राजाबरोबर फक्त रजपूत होते. तुकड्यां-मागून तुकड्या, मोठमोठ्या घोड्यांवर स्वार झालेले रजपूत, भिल्लाचा साधा एखादा लहान पोरगादेखील नव्हता. हुकूम नव्हता. शिकार पाहिल्यावर पिंजऱ्यांत चित्ता जसा तडफडतो. तसा ह्या शिकारीच्या दिवशीं घरांत बसून भिल्लांचा जीव तडफडतो आहे हा विचार मनांत येऊन निष्ठुर नागादित्याचं मन आनं-दानं नाचायला लागलं.

महाराज नागादित्य लवाजम्यानिशी भेऱ्या वाजवीत आरोळ्या ठोकीत पर्वतांच्या शिख-रांवर चढले; भेरीचा तो वज्रासारखा भयंकर आवाज ऐकून एरवीं रानरेड्यांचा कळप पाण्यांतून उठून पळायला लागायचा, वनांतले पक्षी घरटीं सोडून आकाशांत उडायला लागायचे, हजारों हरणं जिवाच्या भीतीनं वाट चुकून पळतां-पळतां शिकारी असतील तिथंच यायचीं, झोंप घेत पडलेले सिंह जागे व्हायचे, कुणी हातांत खड्ग घेऊन सिंह धुंडाळण्याकरितां धांवत राहयचे; पण आज नागादित्यानं वारंवार भेरी वाजवल्या, शिका-ऱ्यांच्या टोळक्यानं वारंवार आरोळ्या ठोकल्या, पण त्या विशाल वनांत एकाहि वाघाची डरकाळी, एकाहि पक्ष्याच्या पंखांची फडफड किंवा एकाहि हरणाच्या खुरांची खुटखिट ऐकूं आली नाहीं–सबंध डोंगरच झोंपीं गेला आहे, असं वाटलं. संतापानं नागादित्याचे डोळे तांबडेलाल झाले. लवा-जम्याकडे वळून तो म्हणाला–‘घोडे फिरवा. असंतुष्ट भिल्लप्रजा ह्या वनांतले सगळे पशु पिटाळून दुसऱ्या वनांत घेऊन गेली आहे. चला, आज गांवा-गांवांत, नगरा-नगरांत पशूं-सारखी भिल्लांची शिकार करूं या.’

महाराजांचा राजहत्ती सोंड हलवून कान थरारून पहाडावरल्या इदरपूरकडे तोंड करून उभा राहचला–त्याच्या पाठीवरली सोन्याची अंबारी, जरीची बिछाईत हिऱ्यासारखी झळकली, त्याच्या चोहींकडे घोड्यावर स्वार झालेल्या रजपुतांचें दोनशें भाले सकाळच्या उन्हांत लकलक करायला लागले. नागा-दित्यानं हुकूम सोडला–‘चलाव !’ तेव्हां कुठूनतरी भयंकर डरकाळी फोडून, जणूं समस्त पहाड फोडून एक भला थोरला काळा वाघ, एखाद्या भिल्ल-सेनापतीसारखा, त्या अत्याचारी राजाची वाट अडवून पहाडाच्या वाटेवर राजाच्या हत्तीसमोर येऊन उभा राहचला. उजव्या हातांत भाला घेऊन मोठ्या आनंदानं नागादित्य हत्तीच्या पाठीवरून झुकला. पण त्याच्या हातांतला भाला हातां-तच राहचला––वनाच्या अंधारांतून काळ्या चामड्यानं मढवलेला एक भला थोरला बाण त्याची छाती भेदून, एकीकडून दुसरीकडे,



सों-सों आवाज करीत निघून गेला. अत्याचारी नागादित्यानं भिल्लाच्या हाती प्राण गमावला. मग चारी बाजूनी काळचा वाघासारख्या काळचा कुळकुळीत हजारो भिल्लानी झाडाझुडपाच्या आडून बाहेर येऊन रजपुताच्या रक्तानं डोंगर तांबडा भडक करून टाकला, एकहि रजपूत जिवत राहचला नाहीं; सोन्यानं सजवलेला महाराज नागादित्यांचा काळा पहाडी घोडा मात्र अंधारलेल्या समुद्रासारख्या भिल्लसैन्यामधून झंजावाताच्या वेगानं राजवाड्याच्या दिशेन दौडत गेला.

महाराणी तेव्हा इदरपूरच्या किल्ल्याच्या गच्चीवर राजकुमार बाप्पाला कडेकर घेऊन संध्याकाळच्या हवेत फिरत होती, अन् मधूनच, महाराज ज्या डोंगरात शिकारीला गेले होते, तिकडे बघत होती. अचानक एकदां डोंगराच्या बाजूला गलका झाला; मग राणीन पाहचलं, त्या डोंगरवाटेवरून, वनांतल्या अधारातून, महाराजांचा काळा घोडा बाणासारखा बाहेर पडून झंजावातासारखा किल्ल्याच्या दिशेनं दौडत येतो आहे—मागें शेकडो भिल्ल—कुणाच्या हातात भाला, कुणाच्या हातात धनुष्यबाण. महाराणीन पाहचल—काळचा घोड्याच्या तोंडातून पांढरा फेस मोत्यासारखा चोहीकडे विखरून पडतो आहे, त्याच्या छातीच्या मधून रक्ताची धार मातीत गळते आहे; मग दिसल, आगीसारख्या एका बाणान आयाळीमधून धनुष्यासारख्या त्याच्या सुंदर बाकदार मानेत घुसून घोड्याला जमीनदोस्त करून टाकल, राजाचा घोडा किल्ल्याकडे तोंड फिरवून धुळीत धडपड करायला लागला. नेमक्या त्याच वेळी एक बाण सो-सो आवाज करीत महाराणीच्या डोक्यावरून जाऊन गच्चीवर पडला. झोपलेल्या बाप्पाला ओढणीन झाकून घेऊन महाराणी तावडतोब खाली आली. चारी बाजूना अस्त्राचे खणखणाट नि युद्धाच्या गर्जना सुरू झाल्या—माळवा-पहाडाच्या पश्चिम तीराला सूर्यदेव अस्त पावले.

ती रात्र किती भयानक होती! त्या माळवा-पहाडात असख्य भिल्ल होते, त्याच्यामध्यें मूठभर रजपूत प्राणपणान लढायला लागले; अन् अधाऱ्या राजनगरीत नागादित्याची विधवा-महाराणी पाच वर्षांच्या राजकुमार बाप्पाला छातीशी कवटाळून वाड्यात एकटी बसून राहचली, तिनं कितीदातरी किती दासीना हाका मारल्या—कुणाचीच ओ आली नाही. महाराजाची खबर कळावी, म्हणून तिनं कितीदातरी किती पहारेकऱ्याना बोलावलं, पण ते सगळेच लढाईंत गुंतलेले, महाराणीच्या प्रासादातून ते पळत गेले, तरी तिच्या बोलण्याकडे मात्र त्यानीं लक्ष दिल नाही. मग व्याकुळ अंतःकरणान मांडीवरल्या बाप्पाला एका लहानशा उटाच्या कावळचात गुडाळून घेऊन, अतःपुराचा प्रचड चदनी दरवाजा सोन्याच्या चावीन उघडून, राणीन बाहेर डोकावून पाहचल—रात्र अधारी, राजनगरी अधारी; भलीथोरली दगडी दालनं, त्यातले हस्तीदताच काम केलेले मोठमोठे दरवाजे सताड उघडे; एवढचा मोठ्या राजनगरीत जणू एकहि माणूस नव्हतं.

आश्चर्यचकित होऊन एका हातान बाप्पाला छातीशी धरून अन् दुसऱ्या हातात सोन्याच्या चाव्यांचा जुडगा घेऊन महाराणी उघड्या दरवाज्यांत उभी राहचली. अचानक त्या अंधारांत कुणाच्यातरी पावलाचा आवाज ऐकू आला; कातडी चढाव घातलेला रजपूत वीराच्या खचखच पायाचा आवाज नव्हे; रुप्याच्या वाक्या घातलेल्या राजदासीच्या रुमझुम पायांचा आवाज नव्हे; लाकडी खडावा घातलेल्या पचाहत्तर वर्षांच्या म्हाताऱ्या राजपुरोहिताच्या खाड्खाड् पायाचा आवाज नव्हे—हा जणू चोरासारखा, सापासारखा खसखस, खुट्टखुट्ट पावलाचा आवाज! महाराणीला भीति वाटली. बघतां-बघता राक्षसासारखा एक भिल्ल सरदार तिच्यासमोर येऊन उभा राहचला. महाराणीन विचारल—'कोण तू? तुला काय हवंय्'? वाघासारखा गर्जत भिल्ल सरदार म्हणाला—'मी कोण, तें माहीत नाही तुला? माझ्या पोटच्या पोरीला तुझ्या राजान दासीसारख चितोडच्या राजाला देऊन टाकल—तो मी. आज किती सुखाचा दिवस आहे! हचाच हातान नागादित्याच्या छातीत भाला घुसवला, आज हचाच हातान त्याच्या मुलासकट महाराणीला दासीसारख बाधून घेऊन जाईन.' महाराणी पायापासून डोक्यापर्यंत शहारली. 'देवा रक्षण कर!' अस म्हणून बावनकशी सोन्याच्या मोठमोठ्या चाव्याचा जुडगा तिन जोरात भिल्लसरदाराच्या कपाळावर फेंकून मारला. अगडबब भिल्ल 'आईग!' अशी किंकाळी फोडून जमिनीवर कोसळला; कोवळचा बाप्पाला छातीशी कवटाळून महाराणी राजनगरीतून बाहेर पडली. तिचं अर्धं मन महाराज नागादित्याकरिता आक्रोश करायला लागल अन् अर्ध मन ह्या महासकटात जिवापाड आवडत्या बाप्पाचं रक्षण करण्याकरितां व्यग्र झालं.

राणी वाट चालायला लागली—खडे टोचून पायाला भोकं पडली, थडीनं हात गोठून गेले, अंधारात वारवार वाट चुकायला लागली—तरी राणी रस्ता चालत राहचली. *किती लाब! किती लाब! डोंगराची वाट* किती लांब आहे? रस्ता कुठं गेला होता, त्याला जणू शेवट नव्हता. राणी किती वाट चालली, तरी ती वाट सपत नव्हती. हळूहळू पहाट झाली, रस्त्याच्या आजूबाजूला ब्राह्मणाची एकदोन घर दिसायला लागली. डोंगरी वारा बर्फासारखा गार होता, पक्षीहि अजून जागे झाले नव्हते, अशा वेळी नागादित्याच्या महाराणीनं राजपुत्र बाप्पाला कडेवर घेऊन वीरनगरच्या त्या ब्राह्मण कमलावतीच्या दारावर थाप मारली. आठ पिढ्यामागें एक दिवस शिलादित्याच्या महाराणी पुष्पवतीन कुमार गुहाला हचाच वीरनगरच्या कमलावतीच्या ओटीत घातल होत; अन् आज कितीतरी काळानतर त्याच कमलावतीच्या नातवाच्या नातवाच्या वृद्ध राजपुरोहिताच्या हाती गुहाच्या वशातल्या गिल्होटच्या राजकुमार बाप्पाला सोपवून देऊन नागादित्याच्या महाराणीन चितेच्या अग्नीत उडी घेतली.

वृद्ध पुरोहितान सकाळीं राजपुत्राला आसरा दिला, अन् त्याच दिवशी सध्याकाळच्या वेळी एका भिल्लाच्या मुलीन दोन लहान-लहान मुल कडेवर घेऊन त्या वृद्ध पुरोहिताच्याच घरीं आसरा घेतला. ह्याच्याच पूर्वजानं पहिल्याप्रथम स्वतःचं बोट कापून रजपूत गुहाच्या कपाळावर राजटिळा लावला होता—अन् रजपूत राजाच्याबरोबर त्याचाहि सत्यनास होऊन गेला होता; बडखोर भिल्लानी त्यांच्या घरादाराला आग लावून देऊन त्याना तिघाना डोंगरावरून हाकलून दिल होत. त्या तीन भिल्लाना नि राजकुमार बाप्पाला घेऊन वीरनगर सोडून माडीरच्या किल्ल्यात यदुवशातल्या दुसऱ्या एका भिल्लाच्या राज्यात राजपुरोहितान काही

काळ घालवला. पण तिथंहि भिल्लच राजा; तिथंहि भीति होतीच–कुणीतरी भिल्ल एखाद् दिवशीं पोरक्या बाप्पाचा खून-बीन करायचा! अन् ब्राह्मणानं तर महाराणीपाशीं प्रतिज्ञा केली होती, कीं आपण केव्हांहि अनाथ बाप्पाचं रक्षण करूं ! भिल्ल-राज्य अजिबात सोडून, ह्या सगळ्यांना घेऊन, तो नगेंद्र-नगरला निघून गेला. एका बाजूला समुद्राच्या तीन लाटांसारखा त्रिकूट पर्वत, अन् दुसऱ्या बाजूला ढगासारखं अंधारं पराशर अरण्य, मधें नगेंद्रनगर, जवळच सोळंकी-वंशांतल्या एक रजपूत राजाचा राजवाडा. वृद्ध ब्राह्मणानं त्या नगेंद्रनगरांतच ब्राह्मणपाड्याच्या सीमेलगत बिऱ्हाड थाटलं. ती भिल्लाची मुलगी घरचं सगळं काम करायला लागली, अन् राजपुत्र बाप्पा त्या दोघां भावांना–बाळा अन् देवला–घेऊन माळा-माळावर, वना-वनांत गुरं चारीत, गुराखी पोरांबरोबर गुराख्या-सारखं खेळत, हिंडायला लागला. बाप्पा राजाचा मुलगा आहे, ही गोष्ट राजपुरोहितानं कुणाकडेच फोडली नाहीं. फक्त एका तांब्याच्या कवचांत इत्थंभूत सगळी ओळख स्वतःच्या हातानं लिहून, तें कवच बाप्पाच्या गळ्यांत बांधून टाकलं–त्याला फार भय होतं, कुणा भिल्लाला बाप्पाचा सुगावा लागला तर !

## अवनींद्रनाथ



पाश्चात्य चित्रकलेच्या प्रभावातून भारतीय चित्रकला मुक्त करणारा चित्रकलमहर्षि म्हणून अवनींद्रनाथ टागोर साऱ्यांना परिचित आहेतच.

पण त्यांच्या साहित्याचा परिचय आपल्याला व्हावा तसा नाहीं.

'अस्सल बंगाली शैलीचं दर्शन माझ्यापेक्षां अवनींद्रनाथांच्या साहित्यांतच घडतें असा अभिप्राय गुरुदेव टागोरांनीच एकदा व्यक्त केला होता.

अवनींद्रनाथांच्या **'रजपुतांच्या कथां'त** या त्यांच्या अस्सल बंगाली शैलीचा चांगलाच प्रत्यय येतो.

मार्च ६३ च्या अंकापासून 'माणूस'मध्यें या कथा कालानुक्रमानें व क्रमशः येत आहेत.

मग बाप्पा जेव्हां मोठा झाला, माळा-माळावर मोकळ्या हवेंत पळापळी करून, डोंगरा-डोंगरावर चढ-उतार करून राजपुत्र बाप्पाचं सुंदर शरीर दिवसें-दिवस पोलादासारखं मजबूत बनलं, माजलेला रेडा एका हातानं जागच्या जागीं खिळवून ठेवायची रग त्याच्यांत आली. सगळीं गुराखी पोरं, बाप्पा राजपुत्र आहे हें माहीत नसूनदेखील, राजासारखं बाप्पाला भ्यायला लागलीं, त्याची सेवाभक्ति करायला लागलीं, तेव्हां वृद्ध ब्राह्मण बराचसा निश्चिंत झाला. मग तो बाप्पाच्या शरीराच्याबरोबरच मनालाहि घडण द्यायला लागला. रोज संध्याकाळच्या वेळीं निर्जन खोलींत बाप्पाजवळ बसून तो त्याला माळवा-पहाडाची गोष्ट, भिल्लांच्या बंडाची गोष्ट, राणी पुष्पवती, महाराज शिलादित्य, राजकुमार गुह, त्याचा तो आवडता मित्र मांडलिक–ह्यांच्या एक-एक गोष्टी सांगायला लागला. ऐकतां–ऐकतां कधीं बाप्पाच्या डोळ्यांत पाणी यायचं, कधीं संतापानं त्याचा चेहरा लाल होऊन जायचा, तर कधीं भीतीनं त्याचं अंतःकरण थरारायचं. रात्रभर बाप्पा कधीं सूर्याचा रथ, कधीं डोंगरावरल्या भिल्लांची लढाई–ह्यांचीं स्वप्नं बघून जागा व्हायचा; त्याला वाटायचं–आपणसुद्धां कदाचित् कधींतरी राजा होऊं, लढाया करूं.

असे दिवस जात होते. त्याच वेळीं एक दिवस श्रावण महिन्यांत कोंवळ्या-कोंवळ्या गवतावर गायींना चरायला सोडून बाप्पा एकटाच डोंगरांतल्या वाटेनं भटकत हिंडत होता. त्या दिवशीं झुलन उत्सव होता, रजपुतांतला मोठा आनंदाचा दिवस; सकाळ होते-न-होते तोंच टोळक्या-टोळक्यानं गुराखी नवे कपडे घालून, कुणी धाकट्या भावा-बहिणीला कडेवर घेऊन, कुणी दह्याची कावड खांद्यावर घेऊन, एकजण मजा बघायला, तर दुसरा पैसे कमवायला – सगळेच नगेंद्रनगरच्या रजपूत-राजाच्या राजवाड्याकडे जत्रा बघायला गेले. विशाल वनांत बाप्पा एकटा राहयला; त्याच्या जिवलग मित्रांनीं, बाळा न् देवनं, ताईचा हात धरून त्या आनंदाच्या दिवशीं बाप्पाला कितीदां बोलावलं – 'भाऊ, तूं राजवाड्यांत येणार ना?' बाप्पानं निव्वळ मान हलवली होती – 'नाहीं, मी येणार नाहीं.' त्याला कदाचित् वाटलं असेल – मला भाऊ नाहीं, बहीण नाहीं, आई नाहीं, मी कुणाचा हात धरून, कुणाला घेऊन, आज कसल्या आनंदाची जत्रा बघायला जाऊं? पण बाळा नि देव जेव्हां आपल्या भिल्लीणताईबरोबर हंसत-हंसत निघून गेले, सकाळचं ऊन जेव्हां ढगांच्या आड झांकलं गेलं, बाप्पाची एकच गाय जेव्हां चरतां-चरतां माळामागून माळ पार होऊन वनाच्या आड दिसेनाशी झाली, वनांत जेव्हां कसलीच चाहूल नव्हती, मधूनमधून फक्त रातकिड्यांचं किरकिरणं, पानांची सळसळच तेवढी, तेव्हां बाप्पाला एकटं-एकटं वाटायला लागलं. भिल्लीणताईच्या तोंडून ऐकलेलं भिल्ल-राज्याचं एक गाणं तो

खिन्न मनान एका लहानशा बांसरीवर वाजवायला लागला. त्या गाण्याचे शब्द काही त्याला माहीत नव्हते, पण अगाईसारखा त्याचा सरळ सूर ढगाळ दिवसाच्या ढगाळ हवेत मिसळून बाप्पाभोवती स्वप्नासारखा घोटाळायला लागला. आज जणू त्याला आठवायला लागल – ही पश्चिम दिशा, जिथं ढगांच्या कडेवर सूर्याचा उजेड लखलखतो आहे, जिथं काळे-काळे ढग दगडासारखे जाम बसले आहेत, तिथच, त्याच अधाऱ्या आकाशाच्या खाली, आपल घर होत; त्या घराच्या गच्चीवर चादण्यात आईचं बोट धरून आपण हिंडायचो; ते घर किती सुदर होतं! तें चादण किती अद्‌भुत होतं! आईचा चेहरा किती हसतमुख होता! तिथं हिरव्या गवतावर हरणाची पिल्लं चरत भटकायची; पोपट उडून झाडावर बसायचे, डोगरात फुलाचे घोसच्या-घोस लटकायचे – त्याचा रग किती सुदर होता, त्याचं डोलणं किती सुंदर होतं! आसवानी भरलेल्या डोळ्यानी ढगाकडे बघत-बघत बाप्पा बासरीवर भिल्लाच गाण वाजवायला लागला – बासरीचा करुण सूर रडत-रडत, थरथरत-थरथरत एका वनातून दुसऱ्या वनात गोल-गोल फिरायला लागला.

त्या वनाच्या एका बाजूला आज झुलन-पौर्णिमेच्या आनदाच्या दिवशी सोळंकीवंशांतल्या राजाची मुलगी सखीच्याबरोबर खेळत हिंडत होती. राजकुमारी म्हणाली –' ए ऐकलस का ग, वनात गुराखी-राजा बासरी वाजवतो आहे.' सख्या म्हणाल्या –' चल बाई, चांफ्याच्या झाडावर झोपाळा बाधून आपण झोके घेऊ या.' पण झोपाळा बाधायला दोरी कुठ होती? ते वृंदावनासारख घनदाट वन, तो पावसाळी दिवसाचा ढगाचा गडगडाट, त्या दूर वनांत गुराखी-राजाची गोड बासरी, त्या सखीच्यामध्यें श्रीराधेसारखी स्वरूपवान् राजकन्या, सगळं काही आज त्या युगयुगातरापूर्वीच्या वृंदावनातल्या राधा-कृष्णांच्या पहिल्या झूलनासारख. असा दिवस काय झोपाळा बाधायच्या एका दोरीकरतां वायां जाणार? तळहातावर गाल टेकवून राजकन्या विचार करायला लागली. परत तीच बासरी, पक्ष्याच्या गाण्यासारखी, वनाच्या ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत आनंदाचा प्रवाह खेळवून वाजायला लागली. आपलं रत्नजडित ककण सखीच्या हातावर ठेवून राजकुमारी म्हणाली – 'जा बाई, ह्या कंकणाच्या बदल्यात त्या गुराख्याकडून एक दोरी घेऊन ये.'

ते ककण हातात धरून राजकुमारीची ती सखी बाप्पाकडे येऊन म्हणाली — 'ह्या ककणाच्या बदल्यात राजकुमारीला एक दोरी देशील का?' हंसत-हंसत बाप्पा म्हणाला– 'देईन, पण राजकुमारीनं माझ्याशी लग्न केल पाहिजे.'

त्याच दिवशी त्या निर्जन वनात, राजकुमारीच्या हातात ते रत्नजडित ककण घालून, चाफ्याच्या झाडावर झोपाळा बांधून, राजकन्येचा हात आपल्या हातात घेऊन राजकुमार बाप्पा झोपाळ्यावर बसला. नवऱ्यामुलामुलीना घेरून सगळ्या सख्या झोपाळ्याभोंवती फिरत झुलनाच गाणं म्हणायला लागल्या — 'अजि आनंद! अजि आनंद!' खेळणं सपलं, संध्याकाळ झाली; वनातल्या गुराख्याशी लग्न लावून राजकुमारी राजवाड्यात परतली; अन् फुला-फुलांनी बहरलेल्या चाफ्याखाली बसून, वाटोळ्या चद्राकडे बघून, बाप्पाला वाटायला लागल — 'अजि आनंद! अजि आनंद!'

अचानक एकदम पूर्वेकडून वाऱ्याची एक झुळूक आली, अन् झाडाची पान सळसळवून, फुलांचा वास विखरून, सो-सों आवाज करीत, पश्चिमेला निघून गेली. त्याचबरोबर पावसाचे दोन टपोरे थेंब चांफ्याच्या हिरव्या पानावरून झरून टप्‌टप् खाली पडले. बाप्पानं वर आकाशाकडे पाहिल — पश्चिमेकडून एक काळा ढग हळूहळू पूर्वेकडे सरकत होता — मधून-मधून ढगाचा गडगडाट होत होता अन् विजेचा लखलखाट होत होता. बाप्पा घाईघाईनं उठून उभा राहिला; आठवल, घरी जायला हव. दुधासारखी शुभ्र अशी त्याची ढवळी गाय वनात सोडलेली होती. चाफ्याच्या झाडावरून काबळ काढून घेऊन बाप्पा ढवळ्या गायीच्या शोधांत निघाला. चोहीकडे अंधारल होतं, मधून-मधून झाडा-झाडातून ढीग-ढीगभर काजवे हिऱ्यासारखे लकलक करीत होते, अन् जागोजागी भिजल्या मातीचा मंद वास, सबंध वन भरून टाकीत होता. त्या अधाऱ्या वनाच्या वाटे-वाटेवर ढवळीच्या शोधात बाप्पा फिरायला लागला. अचानक एके जागी, घनदाट वेळूच्या वनाच्या आड बाप्पान पाहिलं — एक तेजोमय ऋषि ध्यानस्थ बसलेले आहेत. त्यांच्या बरोबर समोर आपली ढवळी गाय नंदीसारखी स्थिर उभी आहे, अन् त्या शुभ्र गायीच दाट दूध अमृतासारखं एका संगमरवरी शिव-पिंडीवर आपोआपच झरून पडत आहे. आश्चर्यचकित होऊन बाप्पा तिथंच थांबला.

कांही वेळानं ध्यान सपून महर्षीचे डोळे सकाळच्या वेळी उमलणाऱ्या कमळाच्या पाकळ्यासारखे हलके-हलके उघडले. महादेवाला नमस्कार करून महर्षीनं ओंजळभर दूध प्यायलं. मग बाप्पाकडे वळून ते म्हणाले — 'ऐक वत्सा, मी महर्षि हारीत. तुला आशीर्वाद देतो — तूं दीर्घायुषी हो, पृथ्वीचा राजा हो. तुझ्या ढवळीच्या दुधाच्या धारेनं मी आज फार सतुष्ट झालों आहे. आज माझ्या महाप्रस्थानाचा दिवस, ह्या शेवटच्या दिवशी तुला आणखी काय देऊं? हे भगवती भवानीचं खड्ग. हे अक्षय्य धनुष्यबाण— हे खड्ग पहाडहि विदीर्ण करत, हें धनुष्य-पृथ्वी जिंकून देतं — ही दोन्ही तू घे अन् वत्सा, भगवान् एकलिंगाची ही सगमरवरी मूर्ति जवळ ठेव, सदैव ह्याची पूजा कर. आजपासून तुझं नांव एकलिंगजीका दीवाण. तुझ्या वशात जितके म्हणून राजे होतील, ते सगळे ह्याच नावानं सिंहासनावर बसतील.' मग स्वत:च्या हातानं बाप्पाच्या गळ्यात चामड्याच जानव घालून महर्षि समाधिस्थ झाले. बघता-बघता त्याच पवित्र शरीर आगीसारख जळून गेल. कमरेला खड्ग, हातात धनुष्य-बाण, डोक्यावर एकलिंगाची मूर्ति, ढवळीच्या मागोमाग बाप्पा परत निघाला—ढगाचा गडगडाट, देवाच्या दुंदुभीसारखा सबंध आकाशभर वाजायला लागला.

तेव्हा पहांट झाली होती, जत्रा उरकून शिणल्या चेहऱ्यान जो–तो आपापल्या घरी परतत होता, त्याच्याचबरोबर बाप्पा घरी परतला.

नंतर थोडक्याच दिवसांनी बाप्पाला नगेंद्रनगर सोडून जावं लागल. झुलन–पौर्णिमेला खेळांत दोघाच लग्न झाल्यावर, राजकुमारीला मागणी घालण्याकरिता म्हणून परदेशातून एक ब्राह्मण दरबारात येऊन दाखल झाला. त्याच दिवशी सध्याकाळी नगेंद्रनगरात सगळीकडे कळल, कीं राजकन्येचा हात पाहून कालगणना करून, ब्राह्मणानं सांगितलं आहे, की राजकुमारीच लग्न आधीच कुणा एका

परदेशी माणसाशीं होऊन गेलेलं आहे. राजाचे गुप्त हेर त्या परदेशी माणसाच्या शोधात हिंडत होते. राजान त्याच डोक आणून हजर करायचा हुकूम दिला होता. हे ऐकून बाप्पाच मन अस्वस्थ झाल सवघ रात्र काळजी करण्यात घालवून पहाटें उठून तो देश सोडून जाण्याकरिता तयार झाला. जायच्या वेळी वडलाच्या जागी असलेल्या पचाऐंशी वर्षांच्या त्या राजपुरोहिताला बाप्पान सगळ सांगितलं; तो म्हणाला– 'पिताजी, मला निरोप द्या. आतां मी मोठा झालो आहे, माझ्याकरितां तुम्ही का सकटात पडता ?' ब्राह्मण म्हणाला. –'वत्सा, आपण कोण आहोत, हे तुला माहीत नाही; तूं राजपुत्र आहेस, तुझी आई तुला माझ्या हवाली करून गेली आहे; आज या पोरवयात एखाद्या भिकाऱ्यासारख्या तुला मी कसा निरोप देऊ?' तेव्हा देवीच तें खड्ग अन् अक्षय्य धनुष्य-बाण दाखवून बाप्पा म्हणाला– 'परदेशात हेच माझे मदतगार, अन् एकलिंगजी आहेतच.' तेव्हा आनदानं दोन्ही हात उचलून ब्राह्मणान आशीर्वाद दिला–'जा वत्सा, तू राजाचा मुलगा आहेस, राजासारखच धनुष्य-बाण तुला हातांत मिळाल आहे. मी, वृद्ध ब्राह्मण, तुला आशीर्वाद देतों–पृथ्वीचा राजा होशील. जर कुणी तुझी हकीगत विचारली, तर गळ्यातलं कवच उघडून दाखवून दे, कोणत्या पवित्र वशात तुझा जन्म झाला आहे, तुझ्या पूर्वजानी कोणत राजसिंहासन उजळ केलं होतं दाखवून दे. जा वत्सा, सुखात रहा.'

ब्राह्मणाचा निरोप घेऊन झाल्यावर बाप्पा भिल्लीणताईचा निरोप घ्यायला निघाला, पण तिथला निरोप घेणं तितक सहज गेलं नाही. खूप रडून झाल्यावर मग भिल्लीणताई म्हणाली–'बाप्पा रे, तू जाणारच तर तुझ्या दोघां भावाना–बाळा न् देवला बरोबर घेऊन जा. बाप्पा, तुला एकट्याला अस सोडून देताना माझ मन तगमगतय् रे!' मग तिघाच्या हातात तीन भाकऱ्या देऊन भिल्लीणताईन तिघां भावाना निरोप दिला. बाळा न् देवला बरोबर घेऊन बाप्पा घोर वनात निघून गेला. तिथं मोठमोठ्या दगडी खाबासारखी जाड-जाड झाडाची खोडं वर आकाशाकडे गेली होती, कुठं मोर-लाडोरी वनभर उडत हिंडत होत्या, कुठ एखादा अजगर एक सबंध बोकड गिळून सुस्त पडून होता; कुठ वाघाची डरकाळी, तर कुठं पक्ष्याच गाणं; एके ठिकाणी हिरव्या गवतावर सोनेरी ऊन, तर दुसऱ्या ठिकाणी काजळासारखा निळा अधार, बाळा न् देवला बरोबर घेऊन कधी वनाची मनोहर शोभा बघत-बघत, तर कधी मोठमोठ्या सकटातून भवानीदेवीच खड्ग हातात घेऊन बाप्पा निर्भयपणें चालला.

ते विशाल पराशर अरण्य पार करायला त्याना तीन दिवस न् तीन रात्री लागल्या ते तीन दिवस बाप्पान तीन भाकऱ्या खाऊन घालवले. मग गावामागून गाव, देशामागून देश पार करून, कित्येक पावसाळे, कित्येक हिंवाळे वाटेंतच काढून, बाप्पा मेवाडात मौर्यवशाच्या राजा मानच्या राजधानीत, चितोड नगरात, येऊन पोचला. तेव्हा तिथ मुसलमानाशी लढाई करण्याची मोठी तयारी चालली होती. हत्तीच्या पाठीवर, उंटाच्या पाठीवर, दारू-गोळा, डाळ-तांदूळ, तबू-कनाती, बैलगाड्यातून शस्त्रास्त्र, खायचे पदार्थ; मोठमोठ्या रांजणात पिण्याच पाणी, तळणीचं तूप भरल जात होतं. रस्तोरस्ती रजपूत सैनिक डोक्यावर फेटे बांधून, हातांत भाले घेऊन हिंडत होते. चोहीकडे राजाचे हेर मुसलमानाना धुंडाळीत फिरत होते. महाराज मान सरदाराना बरोबर घेऊन, घोड्यावर स्वार होऊन, लढाईची तयारी बघत जातीन फिरत होते–सगळीकडे धूमधाम चालली होती.

इतकी गजबज, इतकी माणस, इतकं मोठ नगर, इतकी मोठमोठी दगडी घर, बाप्पान आत्तापर्यंत कधीच पाह्यली नव्हती. नगेंद्रनगरात घरं होती, पण भिंती मातीच्या होत्या. तिथहि मदिर होती, पण तीं किती छोटी! आश्चर्यचकित होऊन बाप्पा रस्त्याच्या एका कडेला उभा राहुचला. मोठमोठे हत्ती बघून बाळा न् देव आ वासून बघतच राहुचले. त्याच वेळी राजा मान घोड्यावरून त्या रस्त्यावर आला; पाढऱ्या शुभ्र घोड्याचा सोन्याचा साज जमिनीवर लोळत होता, डोक्यावर राजछत्र झिरमिळत होत, दोन्हीकडे दोन माणसं मोराच्या पिसाच्या चवऱ्या ढाळीत होती. बाप्पास व टल–राजाला भेटायला हीच योग्य वेळ आहे. ताबडतोब बाळा न् देवचा हात धरून रस्त्याच्या मधोमध येऊन, भवानीदेवीचं खड्ग कपाळाला लावून, बाप्पान महाराजाना प्रणाम केला. राजा मानन विचारल – 'कोण तू? काय हवय् तुला?' बाप्पा म्हणाला – 'मी रजपूत राजाचा मुलगा आहे, आपल्या आश्रयाला राजासारख राहण्याची माझी इच्छा आहे' हा भिकारी अन् राजाचा मुलगा! चारी बाजूना असलेले मोठमोठे सरदार हसायला लागले, पण बाप्पाच धिप्पाड शरीर, सुदर चेहरा, अक्षय्य धनुष्यबाण अन् तें भवानीच खड्ग बघून राजा मानन लगेचच ओळखलं होत, की हा कुणीतरी भाग्यवान् आहे; देवानं दया दाखवून ह्या लढाईच्या वेळेला ह्या वीर पुरुषाला आपल्याकडे पाठवलं आहे. मान राजान ताबडतोब आपला जरीचा शेला बाप्पाच्या अंगावर घालून एक काळा घोडा बाप्पाकरिता त्यानं आणवला. बाप्पा म्हणाला –'महाराज, माझ्या भिल्ल-भावाच्याकरिता घोडे मागवा.' मग बाळा न् देवला घोड्यावर बसवून बाप्पा स्वतः त्या काळ्या घोड्यावर बसला – सबध सैन्य नि सेनापतीच्या डोक्यांच्या वर बाप्पाच धिप्पाड शरीर, समुद्रातल्या पर्वतासारखं, जवळजवळ निम्म वर राहुचल; ते बघून रस्त्यावरले लोक म्हणायला लागले –'हा खरा वीर आहे, जसा चेहरा, तसच शरीर!' सगळ्याना धन्य-धन्य वाटलं; राजाचे सगळे सेनापति मात्र डोक्याला राजवस्त्र गुंडाळलेल्या त्या भिकाऱ्याला बघून मनातल्या-मनात मान राजावर असंतुष्ट झाले. दिवसेदिवस राजा बाप्पावर जितका खुश होत गेला, जितकं त्याच कौतुक करायला लागला, मान राखायला लागला, तितकीच सेनापतीची मनं द्वेषाच्या आगीत होरपळून निघायला लागली.

मग काही दिवसानी मुसलमानांशी लढाई करायचा दिवस येऊन ठेपला. त्या दिवशी देशोदेशीचे सगळे सामत, राजे, सगळे म्हातारे सेनापति एकमतानं मान राजासमोर उभे राहून म्हणाले – 'महाराज, आम्ही अनेकदा, अनेक लढायात, तुमच्याकरितां प्राण द्यायला गेलों आहोत, तें केवळ तुमचं आमच्यावर प्रेम होतं म्हणून. तुमचा आमच्यावर विश्वास होता म्हणून, पण महाराज, ते प्रेम विसरून जर रस्त्यावरल्या भिकाऱ्याला आज तुम्ही आमच्या सगळ्याच्या वर बसवलंत, तो जर तुम्हाला प्राणाहून प्रिय झाला, सगळ्याच्या-

पेक्षां विश्वासू झाला – तर मग आतां आम्हांला कामच काय राहचलं ? वाप्पालाच हचा मुसलमानाशी होणाऱ्या लढाईंत सेनापति करा; आमच शौर्य तर तुम्ही खूपदां पाहचलं आहे, नवा सेनापति कसा युद्ध करतो, ते हचा वेळी पाहूं या. ' चिरकाळ विश्वासू असलेल्या राजभक्त सरदाराच्या तोडचे हे अचानक निष्ठुर शब्द ऐकून मान राजा वज्र कोसळल्यासारखा स्तब्ध बसून राहचला, कांही बोलायची शक्ति त्याच्यात राहचली नाही. तेव्हां त्या विराट दरबारात, त्या बंडखोर सरदारांच्या मधोमध उभें राहून पंधरा वर्षांचा वीर बालक बाप्पादित्य म्हणाला – ' ऐका महाराज ! आज राजस्थानचे प्रमुख सरदार दरबारात उभे राहून म्हणताहेत, की हचा घोर सकटाच्या काळी बाप्पालाच सेनापति होऊन हें युद्ध चालवू दे; ठीक आहे, तसच होऊं दे ! ' राजा मानन निराशेन चोहीकडे पाहचल; मग धीरे-धीरे तो म्हणाला – ' ठीक तर, तसंच होऊ दे ! ' मग एकीकडे जवळजवळ बेशुद्ध झालेला मान राजा सेवकांच्या खाद्यांवर भर देऊन अतःपुरात निघून गेला; अन् दुसरीकडे बाप्पादित्य सैन्य तयार करायला बाहेर पडला.

बडखोर सरदारांच्या माना खाली झाल्या. त्यांना वाटलं होत, की पंधरा वर्षांच्या बाप्पाला लढाईवर जायचा धीर मुळीच व्हायचा नाही–भर दरबारात त्याचा अपमान होईल; पण त्या वीर बालकान निर्भयपणानं, हंसतमुखान, त्या भयंकर युद्धाचा भार राजाकडून मागून घेतला, तेव्हां त्याच्या आश्चर्याला काही सीमाच राहचली नाही. ते आणखी आश्चर्यचकित झाले जेव्हां तोच बाप्पा–ज्याला त्यानी एक दिवस रस्त्यावरला भिकारी म्हणून संबोधलं होतं–पंधरा वर्षांचा तोच बालक बाप्पा–लढाई जिंकून कोटचवधि रजपूत प्रजेचे आशीर्वाद नि जयजयकार याच्यामध्यें एका शुभदिनी, शुभक्षणी, सवध राजस्थानच्या राजमुकुटासारख्या रजपूत राजधानीत, चितोड नगरात, परत आला ! त्या दिवशी सवंध राजस्थानभर किती आनंद, किती उत्साह !

सबंध राजस्थानला मुसलमानाच्या हातून वाचवून नवा सेनापति बाप्पा ज्या दिवशी चितोड नगरात परत आला, त्याच दिवशी राजा मानचे म्हातारे-म्हातारे सरदार खिन्न मनानं दरबार सोडून निघून गेले. मान राजान कितीदातरी त्यांना परत आणायचा प्रयत्न केला, तो काकुळतीला आला, त्यान विनवण्या केल्या, एवढच काय पण सरतेशेवटी राजगुरूलाहि त्यांच्याकडे पाठवलं. पण कशानच काही झाल नाही; सरदारांनी दूताकरवी तोडी निरोप धाडला ' आम्ही महाराजाच निमक खाल्लेलं आहे, एक वर्षभर आम्ही शत्रुत्व करणार नाही, वर्ष सपल्यावर रणागणात गाठ पडेल.

ते एक वर्षभर किती भयकर कट, किती भयंकर मसलती चालल्या होत्या. एक वर्षानंतर बडखोर सरदाराच्या दुष्ट मसलतीन मान राजाबद्दल गैरसमज होऊन बाप्पा त्या सगळयांचा सेनापति बनून लढाईवर चालला. मान राजान जेव्हा ऐकल, की बाप्पा आपलं सिहासन हिसकून घ्यायला येतो आहे, जेव्हा ऐकलं, की ज्या बाप्पाला एक दिवस आपण रस्त्यावरल्या धुळीतून उचलून राजसिहासनाच्या जवळ घेतल होत, ज्याला आपण प्राणापेक्षाहि प्रिय मानलं होतं–हाय, तोच अनाथ बाप्पा आज सगळी कृतज्ञता विसरून आपलच राजछत्र बळकावायला येतो आहे, तेव्हा त्याच्या दोन्ही डोळयांतून टपटप आसव झरायला लागलीं.

त्या उतार वयात तो स्वतःच राजभक्त सैनिकाची एक तुकडी घेऊन लढायला गेला; ही लढाईच त्याची शेवटची लढाई; रणागणावर बाप्पाकडूनच मान राजा मारला गेला. देवबदरच्या राजकन्येशी लग्न करून, हिंदुमुकुट, हिंदुसूर्य, राजगुरु, तलवार-बहाद्दर वगैरे पदव्या घेऊन, सोळा वर्षांचा बाप्पा चितोडच्या राजसिंहासनावर बसला. बाळा नू देव हचा दोन भिल्ल भावानी बाप्पाच्या कपाळावर राजटिळा लावला; त्याना दोन गावं बक्षिसी मिळाली त्या दिवशी बाप्पान नियम करून टाकला, आपल्या वशातल्या प्रत्येक राजानं हचा दोन भिल्लाच्या वशजांकडून राजटिळा लावून मगच सिंहासनावर बसावं आजदेखील तो नियम पाळला जातो. हा नवा नियम जेव्हा बाप्पानं राजस्थानात प्रचलित केला, तेव्हा भिल्लाकडून राजटिळा लावून घ्यायची हकीकत ज्यान-ज्यान म्हणून ऐकली, त्याला-त्याला वाटलं, की ही एक नव्या राजाची नवी लहर आहे; पण मान राजाच्या दरबारी पंडिताना प्रश्न पडला, म्हणजे हा गिल्होट राजकुमार गुहाच्या वंशातला आहे की काय ? –भिल्लाकडून राजटिळा लावून घ्यायचा नियम तर फक्त सूर्यवशातच होता. म्हणजे, महाराज बाप्पा हे नागादित्याच्या महाराणीचे, चितोडच्या राजकुमारीचे, पुत्र तर नव्हेत ? राजा मान, बाप्पाच्या आईचा भाऊ, त्याचा मामा तर नव्हे ? पाप ! पाप ! बाप्पानं हा काय अधर्म केला–चोरासारख मामाचं सिंहासन स्वतः घेतलं ! अशा निष्ठुर राजाच्या राज्यात राहण हेदेखील महापापच ! पंडित परत दरबाराकडे फिरकले नाहीत–जो-तो चितोड सोडून दुसऱ्या देशात निघून गेला. हाय, त्याना जर माहीत असतं, की बाप्पा अगदी निर्दोष आहे, तर–बाप्पाला स्वप्नांतहि कधी कल्पना आली नव्हती की राजा मान आपला मामा आहे ! आपल्या वडलाच्याकडून, त्या वृद्ध राजपुरोहिताकडून, भिल्लाच्या बंडाची, गुह राजाची, गायबगायबीची वगैरे गोष्टी त्यानं ऐकल्या होत्या; पण त्याला हें माहीत नव्हतं, की ज्याच्या निष्ठुर अत्याचारामुळें सरळ मनाचे भिल्ल एक दिवस चिडून उठले होते, ते महाराज नागादित्य म्हणजे आपले वडीलच होते ; त्याला माहीत नव्हतं, की राणी पुष्पवतीनं ज्या राजकुमार गुहाला ब्राह्मण कमलावतीच्या हाती सोपवून चितेच्या अग्नीत उडी घेतली होती, तो गुह आपलाच पूर्वज होता. बाप्पाला वाटायचं, आपण कोणत्यातरी साध्यासुध्या राजाचे राजपुत्र होतों.

राजा झाल्यानंतर बाप्पा जेव्हा देववंदरच्या राजकन्येशी लग्न करून परत आला, तेव्हा त्यान बाणमातादेवीची सोन्याची मूर्ति बरोबर आणली होती. चितोडच्या राजप्रासादातल्या संगमरवरी मदिरात ती मूर्ति प्रतिष्ठापून, बाप्पा रोज सकाळ–संध्याकाळ तिची पूजा करायचा.

खूप दिवस गेले होते, बाप्पा जवळजवळ म्हातारा झाला होता, अशा वेळी एक दिवस भक्तिभावान बाणमातेला प्रणाम करून उठत असताना बाप्पाच्या गळचातून त्याचं तें लहानपणीच ताब्याचं कवच तुटून पडलं. बाप्पा खूप मोठा झाला होता, पण सुतानं बाधलेल ताब्याच कवच त्याच्या गळचात जसच्या–तसच होत––खूप दिवसांच्या संवयीनं लक्षातच यायच नाही की आपल्या

गळ्यांत कांही आहे. त्या दिवशी जेव्हां हिऱ्यामोत्याच्या वीस पदरी हाराखालून ते जुन कवच तुटून पायदळी पडलं, तेव्हा बाप्पा दचकला. त्याला वाटलं, 'अरे, इतके दिवस लक्षातच नव्हतं, की मी कोण आहें अन् कुठं होतों. हे सगळं ह्याच्यात लिहिलेल आहे. आज सगळा पत्ता लागेल.' उत्साहानं तें ताब्याच कवच महाराणीच्या हातात आणून देऊन बाप्पा म्हणाला– 'वाच ग, बघू!' बाप्पाला स्वत.ला एक अक्षरदेखील वाचायला येत नव्हत. बाप्पाच्या पायाशी बसून महाराणी वाचायला लागली. कवचाच्या एका बाजूला लिहिलेल होत–'राहण्याच ठिकाण त्रिकूट पर्वत, नगेंद्रनगर पराशर अरण्य.' हसून राणीच्या खाद्यावर हात ठेवून बाप्पा म्हणाला–'हा माझ्या लहानपणचा देश, इथ किती खेळ खेळलोय् मी! तो त्रिकूट पर्वत, ऐशी वर्षाच्या वृद्ध पुरोहिताचा तो गंभीर चेहरा, नगेंद्रनगरातली झुलन-पौर्णिमेची ती चादणी रात्र, सोळकी-राजकुमारीच ते गोड हसू–स्वप्नासारख अजुनी आठवतं. मी किती वेळा किती लोकाच्याकडे चौकशी केली, पण जगांत तीन शिखराचे पर्वत किती आहेत, त्याचा कुणाला पत्ता असणार? मला जर सागता आलं असत, की ढगासारख्या त्या तीन पर्वताच्या लाटेला 'त्रिकूट' म्हणतात; जर सागता आलं असत, की त्या लहानशा शहराचं नाव 'नगेंद्रनगर' होतं, जर माहीत असत, कीं ते घनदाट वन, जिथं मी गुराख्याच्याबरोबर खेळत भटकायचों, जिथं झुलन-पौर्णिमेच्या दिवशी मी सोळकी–राजकुमारीशी लग्न केलं होतं, ते वन पराशर अरण्य होतं, तर काहीच गोधळ झाला नसता; हाय हाय! आयुष्यात कधी लिहाय–वाचायला शिकलों नाही, त्याचं हे अस फळ मिळालं! इतक्या काळानतर काय तो वृद्ध ब्राह्मण, ती सोळकी-राजकुमारी आतां परत मिळेल? वाच बघू आणखी काय–काय लिहिलय ते!' कवच उलटून राणी वाचायला लागली–'जन्मस्थान माळवा–पहाड, पिता नागादित्य, माता चितोडकुमारी, नाव बाप्पा.'

महाराणीचे मोठाले डोळे भयकर आश्चर्यानं जास्तीच मोठे झाले–तें तांब्याचं कवच हातांत धरून, बाप्पाच्या पायांशी, फुलाच्या बिछाइतीसारख्या सुदर गालिचावर ती आश्चर्यानं थक्क होऊन तशीच बसून राहचली; अन् उजव्या हाताच्या बोटांतल्या रक्ताच्या थेंबासारख्या मोठ्या माणकाच्या अगठीकडे बघत हस्तिदंती पलंगावर बसून बाप्पाला वाटायला लागल, 'हाय हाय! काय पाप केल मी हे! ह्या हातानी पितृघातकी भिल्लाना शिक्षा न करतां, मामाचा प्राणघातक होऊन आपण सिंहासनावर बसलो.' 'महाराणी, मी महापापी आहे, मी चितोडच्या सिंहासनावर बसायला लायक नाहीं. पित्याच्या हत्येचा सूड आणि मामाच्या वधाचं प्रायश्चित्त हेच आता माझ्या जीवनाच व्रत झालं'

त्याच दिवशी सगळ्याचा निरोप घेऊन, दहा हजार दिवाणी फौज घेऊन, एकलिंगचा दिवाण बाप्पा चितोडमधून बाहेर पडला. त्याचा सगळा राग माळवा–पहाडांतल्या भिल्ल-राज्यावर जाऊन पडला माळवा-पहाड जिंकून, भिल्ल राज्याचा नायनाट करून बाप्पा निघून गेला. मग देश-परदेश–काश्मीर, काबूल, इस्पाहान, कदाहार, इराण, तुराण त्यान जिकले. बाप्पाच्या सगळ्या इच्छा पुऱ्या झाल्या; माळवा-पहाड जिंकून पित्याच्या हत्येचा सूड घ्यायची इच्छा पुरी झाली, अर्धी पृथ्वी चितोडच्या छात्राखाली आणून मामाच्या वधाच्या यातना बऱ्याचश्या कमी झाल्या; पण तरी मनाची शाति, अंत:करणाची स्वस्थता कुठं मिळाली? सबध दिवसभर लढाई केल्यावर दमून-भागून बाप्पा जेव्हां स्वत:च्या शिबिरात बसून राहयचा, नि:स्तब्ध रणांगण जेव्हां एखाद्‌दिवशी पौर्णिमेच्या चद्रप्रकाशानं उजळून निघायच, तेव्हा बाप्पाला त्या झुलन-पौर्णिमेच्या रात्रीच्या चाफ्याच्या झोपाळ्यावरल्या सोळकी-राजकुमारीची हसऱ्या चेहऱ्याची आठवण यायची; जेव्हा एखादा नवा देश जिंकून, तिथल्या नव्या राजप्रसादातल्या सोन्याच्या पलगावर, नौबतीचा गोड सूर ऐकताऐकता राजाला झोप लागून जायची, तेव्हा त्या पौर्णिमेच्या रात्री चाफ्याभोंवती फेर धरून राजकुमारीच्या सख्यानी म्हटलेल ते झुलन-गाणं स्वप्नाबरोबर बाप्पाच्या अतकरणात यायच. शेवटी ज्या दिवशी त्यानं नगेंद्रनगरात जाऊन पाहचल, की आपली पानाची झोंपडी, मातीच्या भिंती जमीनदोस्त होऊन गेल्या आहेत; जेव्हां पाहचलं, की सोळंकी-राजाचा राजवाडा निर्मनुष्य, नि:स्तब्ध, अंधारा होऊन पडून आहे–ती राजकुमारी नाही, त्या सख्याहि नाहीत–तेव्हा बाप्पाचं मन पारच खचून गेल; शाति हरवून बसलेल्या वेड्या माणसासारखा तो ते दिग्विजयी सैन्य घेऊन शातीच्या आशेनं ह्या देशातून त्या देशात भटकायला लागला; रिकाम सिंहासन अन् एकट्या राणीला घेऊन चितोडचा प्रचड राजप्रासाद तसाच पडून राहचला.

अशा प्रकारे देशोदेशी भटकतां-भटकता एक दिवस बाप्पा वल्लभीपुरांत गायनी-नगरला आला–जिथ दोघा भावाबहिणीनी, गायब-गायबीनी, पृथ्वीवरला प्रकाश पहिल्यादा पाहचला होता–तिथ बाप्पा येऊन पोचला. सोळा वर्षांचं वय असताना एक दिवस राजा मानचा सेनापति बनून मुसलमान सुलतान सलीमच सगळं सैन्य ह्या गायनी-नगरातून हाकलून देऊन बाप्पा चितोडला परतला होता; आज कितीतरी वर्षांनंतर जेव्हा काळे केस पिकायला लागले होते, डोळ्यांखाली काळी वर्तुळं उमटली होती, अंग थुलथुलीत झाल होतं, जग वरंच जुनं-जुन वाटायला लागल होतं, अशा वेळी बाप्पा फिरून एकदां त्याच गायनी-नगरात परत आला. गायनी-नगर बघून बाप्पाला त्या दोघां भावडांची, गायब-गायबीची गोष्ट आठवली

त्या सूर्यकुडाच्या पाण्यान सूर्याची पूजा करून गायनीच्या राजप्रासादाच्या सगमरवरी शयन-मदिरात बाप्पा विश्राति घ्यायला गेला. अचानक अर्ध्या रात्री कुणाच तरी गोड गाण ऐकताऐकता बाप्पाची झोप मोडली. शयनमंदिरातून बाहेर गच्चीवर येऊन तो उभा राहचला. समोर मुसलमानाची भलीथोरली मशीद चादण्यात धवधबीत दिसत होती; आकाशांत अर्धा चंद्र; चोहीकडे नि.स्तब्ध. चादण्यात उभा राहून बाप्पा गाणं ऐकायला लागला. त्याला वाटलं, हें गाण आपण कुठं तरी ऐकल आहे! अचानक दक्षिणेच्या वाऱ्यान गाण्याचे शब्द जास्ती स्पष्टपणे बाप्पाच्या कानांजवळ तरंगत आले; बाप्पानं ऐकलं, अन् तो दचकला–"आज की आनद! झुलत झुलने श्यामर चंद!" –हे तेच गाणं! नगेंद्रनगरच्या रजपूत राजकुमारीचं झुलन-गाण!

बाप्पा गच्चीवर झुकून उभा राहयला, खालीं पाहचलं, एक भिकारीण रस्त्यात उभी

वर्षारंभ अंक

**माणूस**

जून १९६३

वर्ष ३ रें अंक १ ला

या अंकांत—

मधु मंगेश कर्णिक

मधुकर केचे

वि. ग. कानिटकर

श्री. ज जोशी

शिरीष पै

आनंद यादव

रामचन्द्र हिंगणे

रंगा मराठे

आणि

मनमोहन

—यांचें साहित्य

राहून गात होती—'आज की आनद !' बाप्पानं तत्काळ त्या भिकारणीला बोलवायला माणूस पाठवला. त्या चद्रप्रकाशात, संगमरवरी गच्चीवर, रस्त्यावरली भिकारीण राजेश्वर बाप्पाच्या समोर येऊन उभी राहचली. बाप्पान विचारल—'तूं कोण ? नगेंद्रनगरची सोळकी-राजकुमारी ती तूच का ? तू कधी झुलन-पौर्णिमेला एका गुराखी मुलाशी लग्न केलं होतस ?' भिकारीण बराच वेळ एकदृष्ट बाप्पाच्या चेहऱ्याकडे पाहात राहचली, मग जरास हंसून म्हणाली—'महाराज, मध्यरात्री भिकारणीला बोलावून घेऊन ही कसली थट्टा !' बाप्पा म्हणाला—'तर मग तू राजकुमारी नाहीस !' भिकारीण सुस्कारा सोडून म्हणाली—'एक दिवस मी राजकुमारी होते, पण आज भिकारीण आहें ! महाराज मी मुसलमान नवाब सलीमची मुलगी आहे. पधरा वर्षांचं वय असताना एक दिवस तुम्ही आमचं राज्य काबीज केल होतंत, त्या दिवशी ह्या-राजप्रासादाच्या ह्या गच्चीवरून मी तुम्हाला पाहचल होत–किती सुदर चेहरा होता, किती धिप्पाड शरीर होतं ! अन् आज मी तुम्हाला हे असें पाहतें आहे. ते शरीर नाही, तें हंसू नाही ! तुमची अशी दशा कुणी केली ? कोणत्या रजपूतकुमारीच्या आशेनं तुम्ही वेडयासारखे देशोदेशीं हिंडत भटकत आहात ?' बाप्पा म्हणाला—'ते राहूं दे, तूं परत ते गाण म्हण.' भिकारीण गायला लागली—'आज की आनंद ! झुलत झुलन श्यामर चद !' सगळं दु.ख विसरून बाप्पा त्या भिकारणीच्या तोंडाकडे बघत राहचला ! गाणं सपल ; बाप्पा म्हणाला—'नवाबजादी, बोल, तुला काय देऊं ?' भिकारीण म्हणाली—'जर माझं राज्य असतं, तर मी म्हणाले असते, मला तुमची बेगम करा–पण ती आशा आतां नाहीं, आतां मी भिकारीण आहे ! मला तुमची दासी करून जवळ ठेवा.' बाप्पा म्हणाला—'तुझी योग्यता दासी होण्याची नाही, मी तुला बेगम करीन, तू कायमची माझ्या-जवळ बसून हें गाण गात राहा.'

त्याच्या दुसऱ्या दिवशी त्या मुसलमान कन्येशी लग्न करून बाप्पा खोरामान देशात निघून गेला. तिथं गुलबागेतल्या खास महलात गुलाबपाण्याच्या कारज्याच्या काठावर सिराजीचा पेला हातांत धरून बेगमच्या तोंडचे अरबी गझल नि हिंदुस्थानातल ते झुलन-गाण ऐकता-ऐकता बाप्पाच्या हृदयाला स्वस्थता, मनाला शाति मिळाली होती की नाही कुणास ठाऊक !

शभर वर्षं वय झाल, तेव्हा बाप्पा मरण पावला. पूर्वेकडे हिंदुस्थानात त्याची हिंदु महाराणी, हिंदु प्रजा; पश्चिमेस इराणात त्याची मुसलमान बेगम, अन् पठाणाच्या टोळ्या. हिंदूची इच्छा होती, आपल्या महाराजाना चितेवर ठेवावं, अन् नौशेरी पठाणाची इच्छा होती, मुसलमानासारख त्याच दफन कराव. शेवटी, एका बाजूला सूर्याचं स्तोत्र अन् दुसऱ्या बाजूला अल्लाचा दुवा लिहिलेली भली थोरली मखमली चादर बाप्पावरून काढण्यात आली, तेव्हा तिथ काहीच दिसल नाही–फक्त राशी-राशीन कमलपुष्प अन् गुलाबाची फुल ! चितोडच्या महाराणीन ती कमळ बाणमातेच्या मदिरांतल्या मानससरोवराच्या पाण्यांत ठेवून दिली इराणी बेगमन गुलाबाच एक फूल गुलाबागेंतल्या खासमहलामधल्या गुलाबपाण्याच्या कारज्याच्या कडेला लावल; अन् त्याच दिवशीं हिंदुस्थान नि इराण ह्याच्या मधोमध असलेल्या हिंदुकुश पर्वताच्या शिखरावर हिऱ्या-जवाहिरान मढवलेल एका राजाच शरीर चितेवर ठेवून एक सन्यासिनी म्हणाली—'सख्यानो, तुम्ही ते गाण गा !' चारी बाजूना चार सन्यासिनी चितेभोवती फिरत-फिरत गायला लागल्या—'आज की आनद !'

सन्यासिनी ती सोळकी-राजकुमारी; अन् राजदेह तो बाप्पाचा मृतदेह–दोघहि आयुष्यभर एकमेकांच्या शोधात भटकत होती, पण इहलोकी मीलन झालं नाही.

● ● ●

# चंद्रबळ

आनंद रामचन्द्र फुले

एखाद्या वावटळींत गुरफटून टाकणारा तो क्षण तिनें ओलांडला. भीति एकच राहिली—पुनः असा एखादा क्षण आला तर ?

एकाएकीं उषेची चाल मंदावल्याचें इंदूला जाणवलें—तसें तिचें गोष्टीवेल्हाळ मन भानावर आलें. गोष्टींच्या भरांत आपण बस-स्टॉपजवळ येऊनदेखील पोहचलों हें आत्तां तिला जाणवलें. त्याचबरोबर उषेची चाल मंदावण्याचें कारण ...

उषा बावरलीच जरा. तिचें लक्ष भिर-भिरूं लागलें. खेळकर मनोवृत्तीनेंच जणुं प्रसंगाच्या तालावर गंभीर कलाटणी घेतली होती...

बस स्टॉपच्या खांबालगतच तो उभा होता...तर...

पण वदिली अशी कीं जणुं आपण त्या गांवचेच नाहीं...

इंदूनें मनगटावरल्या घड्याळांत पाहिलें... ५–३५ च्या बसला निदान आठ मिनिटांचा अवधि होता. उषेचा पडका चेहरा त्या आठ मिनिटांची दहशत लपवूं शकत नव्हता. ..

पाहतां पाहतां आठ मिनिटें गेलीं... ५–३५ ची बस आलीदेखील ... उषेच्या पाठोपाठ इंदु बसमध्यें आली...बसायला जागा जरा समोरच होती...

तो अगदीं थेट समोरच्या कोपऱ्यांत जाऊन बसला...चेहऱ्यावरची अनोळखी वृत्ति पूर्वीसारखीच होती. पण डोळे फसवे होऊं पाहत होते. वारंवार होत होते. उषेवर रोख-लेली नजर उषेला नक्कीच जाणवत होती. ती त्याला टाळण्यासाठीं म्हणून खिडकींतून बाहेर पाहण्याचा बनाव करीत होती. इंदूला हें सारें जाणवत होतें...

महाराजबागेच्या स्टॉपवर बस थांबतांच त्या दोघी उठल्या तसा तो कांहींसा भांबा-वला...हें त्याला अपेक्षित नव्हतें...

त्या दोघींपाठोपाठ तोहि उतरला...त्या दोघी स्टॉपवरच घुटमळल्या...'बस दूरवरच्या' स्टॉपवर स्थिर झाल्यासारखी दिसत होती. तो सरळ चालत गेला. एक दोनदां त्यानें मागें वळून पाहण्याचा प्रयत्न केल्याचें देखील इंदूच्या नजरेंतून सुटलें नाहीं...एव्हांना तो बराच दूर गेला होता...

आतां त्या दोघी महाराजबागेच्या फाट-कांत शिरत होत्या...

भित्री भागुबाई कुठली !"

" भित्री भागुबाई कुठली " म्हणतच इंदु अगदीं आजबाजूला चार हातांवर जाण-वण्याइतपत मोकळेपणानें खळाळून हंसली... उषा डोळे विस्फारून पाहतच राहिली... इंदूची ही प्रतिक्रिया तिला अनपेक्षित होती...

" वेडे हंसूं नको तर काय करूं ? मुळूं-मुळूं रडूं—कर्माला दूषण लावीत ? उषा, तुझ्या-माझ्या नाहीं, साऱ्या तरुण मुलींच्या वांट्याला हेंच दुःख येत असतं ! पुरुषांची—' सावज 'गिरी कांहीं नवीन नाहीं कीं अप-वादभूत नाहीं. साऱ्या तरुण मुलींना असल्या प्रसंगांना तोंड द्यावंच लागतं. त्यांत रंगा-रूपानं उजळ असलेल्या मुलींना जरा जास्तच झळा पोहचतात—पण असले प्रसंग संभाव्य धोके समजून दीपगृहांप्रमाणं समजायचे अस-तात. असल्या प्रसंगांना धैर्यानं तोंड द्यायचं असतं. भिऊन पळवाट शोधून नाहीं..."

इंदूच्या शब्दाशब्दांतून धीराचा अंगार फुलत होता. निखारा प्रज्वलित होतांना फुलतो ना, अगदीं तस्सा !...

इंदू बोलत होती. ...

उषेची जिवाभावाची मैत्रीण.

इंदूच्या जीवनाच्या प्रत्येक रंगरेषा उषेला जाणवत होत्या. मामीच्या रामरगाड्यांत वावरलेली इंदू लग्नानंतरचीं दोन वर्षे आपल्या चिमुकल्या विश्वांत देहभान विस-रून रममाण झालेली इंदू. वैधव्याची कुऱ्हाड मोठ्या धीरानें सहन करणारी इंदू. नवऱ्याची कोणतीहि साक्ष मार्गात आडवी नसतांना; सासरच्या लोकांच्या अनास्थेच्या झळा सहन करीत लहान दिरासाठीं आणि नणदांसाठी आपल्या आयुष्यांतील सुखाचा होम करणारी इंदू. सासूशीं पटत नसतांना; सासर-माहेरांना धोंड म्हणून वाटणारी इंदू, स्वतःच्या सास-रच्या लोकांसाठींच झिजत होती. जगत होती. पंचवीस वर्षांची ही पोरगेलेशी विधवा सासर-माहेरांचे घरादारांचे पाश सारून एकटी एका खोलींत राहत होती. स्वतःच्या हिंमती-वर स्वतःच्या मिळकतीवर ... माहेरच्या माणसांची ' दुभती ' माया तिला नको होती न् नवऱ्याच्या कर्तव्याची आठवण तिला आधार देत होती. सासरच्या लोकांना तिच्या वागण्याची दहशत वाटत होती.

ती नोकरी करते हें त्यांना पटत नव्हतें. जगाला मुकलेली एक स्त्री चुलखंडाशींच नातेंगोतें उरलेली एक विधवा—ह्या जग-रहाटीच्या परंपरेला तडा गेला होता. सास-रच्या किडूकमिडुकांतच एका जिवाची, मरत नाहीं म्हणून निस्तरावी लागणारी ब्याद म्हणून होणारी तिची भरती तिनें नाकारली. आज ती नोकरीसाठीं उघड्या जगांत पांढऱ्या कपाळानें वावरणार न् उद्यां कुणाचा हात धरून पळून गेली तर...पळूनच कशाला जायला पाहिजे. ह्या गांवांत तिला पुर्नविवाह करायला कोण आडकाठी करूं शकणार

होतें...शिवाय मागीत आदल्या घरचें एखादें पोरहि येऊं शकणार नव्हतें ... बरेंच बरें होतें...

नवरा मेल्यावर जेव्हां ती अट्टहासानें नोकरीला प्रवृत्त झाली तेव्हांच सासरच्या लोकांच्या औदासीन्याला वाढती कळा लागली ... सकाळीं स्वयंपाक, उष्टेंपाणी, आटोपून जेव्हां ती ९–४० च्या बससाठीं निघायची तेव्हांची सासऱ्याची ती विचित्र मर्मभेदक पुरेशी बोलकी नजर...५–३५ ची बस चुकल्यावर ६–१० च्या बसनें घरीं यायला जर एखाद्या दिवशीं दिवेलागणी झाली तर सासूची ती संशयी नजर. ती रात्र न् नंतरचे एकदोन दिवस पिच्छा पुरवायची. सासरच्या लोकांपेक्षां तिच्याच मनाचा जास्त कोंडमारा होत होता. सासरच्या लोकांनीं महिन्याकांठीं येणाऱ्या पगाराच्या लाचारीनें पाळलेलें मौन; नजरेवर बांधलेली नियतीची पट्टी न् मुळांतलें औदासीन्य तिला विलक्षण अस्वस्थ करीत होतीं. लहान बहीण-भावंडांच्या लग्ना-शिक्षणांची जबाबदारी तिच्या नवऱ्यानें



शेवटच्या श्वासापर्यंत पाळली होती. तो क्षण तिनें टिपला होता. नवऱ्याच्या त्यागाची ती परंपरा अभंग राहावी म्हणून तो क्षण तिनें आपलासा केला. ती जगत होती. नव्हे ती परंपरा जागवीत होती.

सासरचे लोक तिला समजूं शकत नव्हते हें तिचें दुःख होतें. पण त्यापेक्षां विलक्षण दुःखद टोंचणी तिला होती ती त्यांच्या वागणुकीची...आर्थिक विवंचनेनें पिचलेले मामंजी लाचारीनें हतबल झाले होते. जें जें होईल तें तें पाहावें ही त्याची नियतीवर सर्वस्वीं विसावलेली हवालदिल वृत्ति तिच्या आयुष्याचा नियम झाली होती. जणुं कांहींसें विचित्र-जगावेगळें घडत आहे–घडणार आहे पण आपणांला त्यांच्याशीं कांहींच कर्तव्य नाहीं. सुनेच्या आयुष्यांत दररोज येणारे सकाळी साडेनऊ ते संध्याकाळीं साडेसहा हे नऊ तास आपणांला विसरायलाच हवेत. सुनेच्या आयुष्याचा दिवस सकाळीं साडेनऊपर्यंत न् संध्याकाळीं साडेसहा नंतरचाच ही त्यांची निर्लेप धारणा तिला अस्वस्थ करीत होती.

घराच्या चार शिंदीच्या भिंतींमध्यें परमेश्वरावर हवाला ठेवून न जगतां कमाईसाठीं म्हणून जगांत वावरणारी आपली विधवा सून एखाद्या दिवशीं अगदीं राजरोसपणें दुसरा गृहप्रवेश करणार न् आपल्या घराण्याच्या बेचाळीस पिढ्यांना काळिमा लावणार ह्याबद्दल सासूबाईंना संदेहच नव्हता. सकाळीं साडेनऊ ते संध्याकाळीं साडेसहापर्यंत आपली सून कुठें वावरते – ऑफिसांत कां ऑफिसाच्या नांवानें दुसऱ्या कुठेंतरी – ह्याचाच घोळ त्यांचें मन सदान्कदा करीत राही. त्यांच्या मनाला ह्याचा चाळाच जडला होता. सुनेच्या आयुष्यांतला ऑफिसचा –खरें म्हणजे ऑफिसच्या नांवानें मोडणारा – काळ विसरण्याचा त्या हेतुपुरस्सर प्रयत्न करीत, तसें त्यांचें मन त्या विचारांतच अधिकाधिक खोल गुरफटत जाई. मनाच्या त्या बेगुमान भरकटण्याला त्यांना कांहीं केल्या आवर घालतां येत नसे. दिवसांच्या सहवासानें त्यांना प्रत्यहीं जाणवूं लागलें होतें कीं सून 'तशी' नाहीं तरी पण त्यांचें मन सुनेच्या 'तशा' असण्याचाच ध्यास घेई. असें कां होतें हेंच त्यांना कळत नसे. तशांत सून नेहमींच्या वेळेपेक्षां उशिरां आली कीं त्यांचें नाठाळ मन शंकाकुल होई. घरीं उपेशीं बोलतांना एखाद्या पुरुषाचा उल्लेख सुनेच्या बोलण्यांत आला कीं त्या अधिक जागरूक होत – अगदीं त्यांना स्वतःला कळत-नकळत! नेहमींपेक्षां सकाळीं जरा उशिरां उठली कीं त्या कावऱ्याबावऱ्या होत. कधीं कधीं तर अगदीं स्वप्नांतदेखील त्यांना सुनेला दिवस गेल्याचें दिसे. मग त्या जाग्या होत. सून बाजूला झोपलेली असायची. आपल्याला स्वप्न पडलें होतें हें कळूनहि त्यांची नजर सुनेच्या अंगावरून आपादमस्तक सरसरत जायची. किती तरी वेळ मग त्या सुनेच्या ओटीपोटाकडे पाहात असत. अगदीं बालंबाल खात्री करून घेत – 'तसें' कांहीं नसल्याची. मग एक प्रकारचा विलक्षण थकवा त्यांना जाणवायचा ...

मग ह्या त्रिकोणाची परिसीमा झाली एके दिवशीं ... ऑफिसांतले रानडे सुपरिटेंन्डेंट बढतीच्या हुद्यावर मुंबईला बदलून गेले त्या दिवशीं. त्या दिवशीं ऑफिस सुटल्यावर त्यांच्यासाठीं "निरोप समारंभ" आयोजित करण्यांत आला होता. त्यामुळें इंदूला घरीं येण्यास नऊ वाजले होते. ५–३५ ची बस चुकलेल्या दिवशीं जें तंग वातावरण तिच्या अनुभवास आलें होतें त्याचीच पुनरावृत्ति त्या दिवशीं झाली. पण जरा कळसच झाला.

रात्रींचीं जेवणें – जेवणें कसलीं – पानांवर बसून अन्नाची चिवडाचिवड करून कसेबसे बळेंच घश्याखालीं गिळलेले घांस–संपवल्यावर मामंजींनीं मांडलेला तो (अविवेकी) विवेक– इंदूची इच्छा असल्यास तिनें दुसरें लग्न करावें. त्या दिवशीं इंदूनें सासर वर्ज्य केलें. तिची मनाची जळजळ व परिस्थितीनें केलेली काहिली कुतरओढ व्यर्थ गेली.

त्या रात्रीं इंदूनें मामंजींना स्पष्ट शब्दांत सांगितलें होतें–" उद्यां मी तुमचं घर कायमचं सोडणार. हेंहि सांगून ठेवतें कीं मामांकडे राहयला जाणार नाहीं. मी स्वतःला न् स्वतःचं सांभाळून घ्यायला समर्थ आहें. आतां प्रश्न उरला माझा स्वतःचा. तो मी माझा पाहून घेईन. ह्यांतच तुम्ही काय तें समजा!"

अन् खरेंच तिनें शब्दन् शब्द खरा केला होता. रामदास पेठमध्यें एका चाळींत एक लहानशी पण स्वतंत्रशी खोली घेऊन ती राहत होती. ती रामदास पेठेंत राहयला गेल्यावर सासूबाईंना–अन् मामंजींना देखील–बरेंच दिवस वाटत होतें कीं इंदूनें लग्न



केल्याचें किंवा ‘ तसें ’ कांहीं असल्याचें किंवा ‘ तसें ’ कांहीं झाल्याचें कानीं येईल. पण नांव नको ! दैवानें खैर केली न् तसें कांहीं त्यांच्या कानीं आजवर आलेंच नव्हतें. ऑफिसांत इंदू वावरत होती अगदीं बेदरकारपणें. तिच्या नांवाचा दरारा विलक्षण होता. कामापुरतें नेमकेंच बोलणें न् आपण बरें न् आपलें काम बरें, हा तिचा स्वभाव साऱ्यांना ठाऊक होता. तिच्या मर्यादशील व्यक्तिमत्त्वाचा वचक होता साऱ्या ऑफिसांत.

ऑफिसांतल्या साऱ्या लोकांना केवढें चविष्ट हाडूक मिळालें होतें ‘ मिसेस मुंजे, रामदास पेठेंत खोलीं घेऊन एकटी राहते ’ ह्याचें ! पण इंदूच होती ती म्हणून पुरून उरली साऱ्यांना. आधींच ऐन पंचवीशींतली विधवा. बरें तर मूलहि नाहीं न् रंगारूपांनीं चारचौघींत देखणी. तशांत सासर–माहेर गांवांत असतांना एकटी खोली घेऊन राहते. साऱ्यांनीं आपल्या परीनें खणण्याचा प्रयत्न करून पाहिला. कांहींनीं ऑफिसांतच चांचपून पाहण्याचा प्रयत्न केला. कांहीं चिकाटीचे वीर घराची आगंतुक वारी करून परत आले तसेच. हेडक्लार्क सुधाकर देसाई जिद्दीचा खरा ! त्यानें नाहीं म्हणायला पुष्कळच पाठपुरावा केला होता. ... इंदू उषेला सांगूं लागली––

“ माझं ऐक तूं ! अशी भिऊं नकोस ! तुझी गोष्ट किती वेगळी आहे; न् माझी ? आठवतो ना देसायांचा पाठपुरावा ? त्यांच्या मनांत माझ्याविषयीं निदान घाणेरडी तरी भावना नव्हती; हें मान्य करूनहि त्यांना नकार देण्याचा प्रसंग माझ्यावर आलाय. लिबर्टीला चांगला सिनेमा लागला आहे ! याल कां ? ह्या प्रश्नाला मीं उत्तर दिलं होतं –“ मिस्टर देसाई; ऐन पंचविशींत दुर्दैवानं वैधव्याची कुऱ्हाड कोसळली असतांना उभा जन्म वैधव्यांत मन मारून काढायचा आहे न् तो मी प्रयत्न करतें आहें, अशी जर तुमची धारणा असेल तर ती चुकीची आहे. मरण येत नाहीं म्हणून मी जगतें असं नाहीं तर मला जगायचं आहे. माझ्या नवऱ्यावर माझ्या दिरा-नणदांच्या योगक्षेमाची जबाबदारी होती. त्यांचा वारसा मी सांभाळतें आहें. त्यांच्यासाठीं मी जगतें आहें. माझ्या जीवनांत विमनस्क पोकळी नाहीं. माझं कर्तव्य मला ठाऊक आहे. त्याच मार्गानं मी जात आहें. प्रश्न उरला एकटं राहण्याचा. ती दिवसांची जडणघडण आहे. माणसं खूप जवळ असतात तरी परस्परांना समजूं शकत नाहींत–जाणूं शकत नाहींत, पण तींच दुरावल्यावर परस्परांना जास्त चांगलीं समजूं शकतात. माझं अलग राहणं जर जगाच्या नजरेंत मधाचं बोट ठरत असेल तर तो जगाचा भ्रम आहे. माझ्या डोळ्यांसमोर भेडसावणारा काळाकुट्ट अंधार नाहीं तर प्रकाश आहे उज्ज्वल भविष्याचा. कर्तव्यपूर्तीच्या समाधानाचा. दिरांच्या-नणदांच्या लग्ना-शिक्षणांच्या कर्तव्यमुक्तीचा. तेव्हां पुन: मला असं कांहीं विचारूं नका ! ” पण उषे ! त्या दिवशीं मी फक्त देसायांच्या मनोवृत्तींतच स्थित्यन्तर केलं नव्हतं तर मला जिंकलं होतं. जगाला धैर्यानं तोंड देतां येतं. जगांत वावरूनहि वावटळीपासनं अलिप्त राहतां येतं, फक्त मनाचा खंबीरपणा लागतो. परिस्थितीनं तो एकदां दिला कीं मग अगदीं इतमामानं जगतां येतं. जगाच्या आदराच्या कक्षेंत वावरतां येतं. तुझ्या आयुष्यांत हा क्षण आला आहे – स्वत:च्या दुबळ्या भेकड मनाला जिंकण्याचा. तूं धैर्यानं तोंड देऊन ह्या मनाला जिंक – मग जग जिंकल्यांतच जमा आहे. पण आतां जर कां तूं पळवाट काढलीस; भ्यालीस किंवा हरलीस तर जन्माची पराभूत होशील !

दुसऱ्या दिवशीं उषा नेहमीप्रमाणें ५–३५ च्या बससाठीं बसस्टॉपवर आली. तो सिगरेटचे झुरके घेत उभा होता ऐटींत. तशीं बसला दहा–बारा मिनिटें होतीं. तरी पण नेहमीसारखी तिची विकल मनोवस्था नव्हती. तिचें हृदय जाणवण्याइतपत वेगानें धडधडत नव्हतें. ५–३५ ची बस येईपर्यंतचा वेळ तिला तितकेसें अस्वस्थ करणारा ठरला नाहीं. बस आली. बसमध्यें ती खिडकीशीं बसली. बस चालूं झाली. तो तिच्याजवळच बसल्याचें तिच्या लक्षांत आलें. पण आज ती बेचैन झाली नाहीं. महाराजबाग स्टॉपवर उतरून ती थेट बागेंत शिरली. बागेंत एका झाडाच्या बुंध्याशीं हिरवळीवर बसली. तो पाठोपाठ आलाच न् पाहतां पाहतां तिच्या बाजूला येऊन बसला......

“ काय ओळखलं कीं नाहीं ? ” तो.

“ डॉक्टरांची ओळख विसरायची नसते ” ती.

“ अजून मी पुरता डॉक्टर झालों नाहीं, फायनलला नोव्हेम्बरमध्यें बसायचा विचार आहे. तसा अर्धा डॉक्टर आहें मी ! ” नंतर तो स्वत:च हंसला. ती हंसली. पण वेगळ्याच कारणानें ! “देवीच्या दर्शनाला (Exhibition ह्या अर्थानें) गेला होतां कीं नाहीं ? ”

“ नाहीं ! शक्य झालं नाही तें मला ! ”

"आज तुम्ही पाहयला हवं. शेवटचाच दिवस आहे. उद्यां दसरा......"

"जमेलसं वाटत नाही...... "

"न जमायला काय झाल? रात्रीची सोबत जर नसेल तर ......"

"हे कस शक्य आहे पण ... एकतर तुम्ही परके ... रक्ताच नात नाही न् मानलेल्या नात्यावर विश्वास नाही. उरला प्रश्न नातं होण्याचा ... पण तीहि शक्यता नाही. तीन लहान भावाचं शिक्षण; दोन बहिणीचं शिक्षण आणि आईची जबाबदारी ह्या तीन गोष्टीनी माझ्यामधनं हे लग्नाच अग वेगळं केलं. भावासाठी – बहिणीसाठी – आईसाठी जगते आहे मी! त्याच्या सुखसुखाड्यातच माझं सुख सामावलं आहे! डॉक्टर; माझा रस्ता वेगळा आहे न् तुमचादेखील! जबाबदारीतनं पार पडेपर्यंत मला माझं असं वेगळं 'अस्तित्व'च नाही. वडिलांनी आम्हा भावडाना पोरकं केल तीच माझ्या लग्नाची घटका होती. त्या मुहूर्तावरच माझ लग्न जबाबदारीशी लागलं. भावडाचा ससार हाच माझा ससार! घरादाराच अस्तित्व हेंच माझ अस्तित्व!

अनायास आपणहून बोललात म्हणून एवढ बोलण्याचं धाडस केल. एखादा शब्द लागल्यास त्याबद्दल माझा नाइलाज आहे. देवाजवळ एवढीच प्रार्थना करावीशी वाटते की पुन: असा जीवघेणा प्रसंग कुणाच्याच वाट्याला यायला नको. बर आहे, डॉक्टर! मला जायला हव आता!"

उषा उठून बसस्टॉपकडे चालायला लागली ... जगाच्या वावटळीत गुरफटणारा तो क्षण तिने धैर्याने आपलासा केला होता.

बसमध्यें बसल्यावर तिच्या मनात आले 'आपण केल हें चूक की बरोबर? पुन. एखादा असा क्षण आला तर ...तर कदाचित् ...'

ती घाबरली. तिनें बसबाहेर पाहिले. इंदूच्या घराजवळच्याच स्टॉपवर बस उभी होती. ती सपाट्यानें तीरासारखी उतरली. बस निघून गेली. अगदीं नेहमीच्या सथपणानें ती इंदूच्या घराकडे जात होती.

• • •

# जुन्या-नव्याचा घोळ

विकर्ण

काही काही वाक्यें सुदर स्त्रीसारखी असतात. प्रथमश्रवणीच प्रेम जडते.

नुक्ताच एक लेख पाहण्यात आला. 'लेखक नेहमीच स्वत:च्या अभिरुचीनुसार लिहूं शकतो का?'–असा प्रश्न आहे. कॉलिन विल्सननेहि याबद्दल दोनदां लिहिले होते. आता युजिन इओनेस्कोने याच विषयावर सक्षेपाने आपली मतें व्यक्त केली आहेत. हा लेख निदान मला तरी आवडला. आणि तो आवडण्याचे पहिले कारण असें की या लेखाच्या सुरुवातीलाच मला एक अतिशय सुदर वाक्य मिळाले. : All thought, all art is aggressive.

युजिन इओनेस्कोची ओळख आता मराठीतल्या साहित्यिकाना थोडीथोडी होऊं लागली आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रातल्या नाटचरसिकानाहि अगदी अलीकडेच त्याची एक छोटीशी नाटचकृति पाहण्याचा योग आला होता. मुबईच्या 'रंगायन'नें आपल्या तीन एकाकिकाच्या कार्यक्रमात इओनेस्कोची 'पुढारी' घेतली होती. आता, 'रंगायन'च्या 'पुढारी'च्या प्रयोगामुळें जाणत्यांना इओनेस्कोची ही ओळख नकोशी वाटली, हें सोडून द्या. परतु इओनेस्कोची प्रथमच गाठ पडणाऱ्या मडळीना 'रंगायन'च्या प्रयोगांतल्या अक्षम्य दोषांसकटसुद्धा इओनेस्को जबरदस्त वाटला, ही इओनेस्कोची थोरवी. तसे म्हटले तर दहा वर्षांपूर्वी त्याचें नाव फारसे ऐकू येत नव्हते.–म्हणजे फ्रान्समध्येंहि ते फारसे ओळखीचे नव्हते. गेल्या पाचसहा वर्षांतच युरोपने त्याला जणू नव्याने शोधून काढले आहे. फ्रान्ससारख्या देशात वास्तविक प्रतिभावान् माणसे धूमकेतूसारखी उगवतात आणि धूमकेतूसारखीच मावळतात; तिथेंसुद्धा आपल्या नाटकासकट इओनेस्को एक तपभर उपेक्षितच राहिला, ही आश्चर्याची गोष्ट आहे, पण या उपेक्षेची निष्पत्ति तरी चागलीच झाली म्हणायची. आज युरोपांतल्या सर्वच देशातल्या आधुनिक साहित्यिकात इओनेस्कोचें नाव आदराने घेतलें जातें. हेंहि अनपेक्षितच आहे.

तूर्त त्याचें चरित्र राहू दे. त्याच्या या लेखाकडेच आपण वळू या. इओनेस्कोचे म्हणणें असें आहे : कला आणि विचाराच्या इतिहासात अशी एक वेळ येते, जेव्हा कलेला व इतिहासाला नव्याने प्राणधारणा करावी लागते (इओनेस्कोने 'रिन्युअल' शब्द वापरला आहे). परंतु ही वेळ केव्हां व कशी येते? या प्रश्नाच्या उत्तरादाखल इओनेस्को म्हणतो– 'सस्कृति जेव्हा एका टोकाला पोचते, तेव्हां ही वेळ येते.'

माणसाचा इतिहास चाळला तर असें दिसून येईल–सकटें एकामागून एक आली होती. ह्या सकटांनी नाना रूपानी दर्शन दिले होते. कधी शर्ती मोडल्या गेल्या होत्या, कधी उघडच त्या मानल्या नव्हत्या, कधी तुलना करावी लागली होती, तर कधी जुनीच वृत्ति चागली असें वाटले होतें–अर्थात् दृष्टिकोन तेवढा नवीन घेऊन.

'जर संकटें नसतील'– इओनेस्को सूर धरतो, 'जर संकटे नसतील, तर जखडलेली दशा असेल, जखडलेल्या दशेचा स्थाणुपणा, दगडी जडता, आणि मृत्यु!' म्हणून 'सबध विचार, सबध कला आक्रमक असते.'

या अर्थी रोमँटिसिझम हे क्लासिसिझम वरले आक्रमण आहे. क्लासिसिझमच्या सर्वव्यापी सत्याविरुद्ध रोमँटिसिझमने आपले वेगळें सत्य कल्पिले होते, ते व्यक्त केले होते. नवीन विचारप्रवाहात सापडून रोमँटिकानी आपली मनोवृत्ति अनुभवायचा प्रयत्न केला होता, यांत शकाच नाही. आणि पॅरनॅशियन चळवळ म्हणजे रोमँटिसिझमला विरोध करून नव्या प्रकारच्या क्लासिसिझममध्यें परतण्याचा एक प्रयत्न होता हे नि:सशय आहे. मग सिम्बॉलिझमनें पॅरनॅशिअन चळवळीविरुद्ध बड केलें, आणि नॅचरॅलिझमने सिंबॉलिझमविरुद्ध बड केले, असें हे चालू आहे.

कलेंतलें कोणतेंहि आंदोलन म्हणजे बंडच असतें. प्रत्येक काळांतले कलाकार एक नवीन घाट शोधून काढतात, किंवा शोधून काढायचा प्रयत्न करतात. एका विशिष्ट पद्धतीनेंच सारें कांहीं सांगण्याचे दिवस आतां गेले. आतां नव्या प्रकारें सांगण्याची भाषा हुडकून काढली पाहिजे--हें माणसाला कधीं उपजतच तर कधीं भरपूर काळ गेल्यावर उमगतें.

जुनी भाषा (भाषा म्हणजे शब्द तेवढे नाहींत, बोलण्याची-सांगण्याची धाटणी, विचार, मन वगैरे-वगैरे) वापरून-वापरून संपली आहे, जुने आराखडे लाख वेळां टांगून झाले आहेत, आतां ह्या जुन्यांतच भागवतां येणार नाहीं, नवी भाषा शोधून काढायला हवी, जुने आराखडे फाडून फेंकून दिले पाहिजेत, नाहींतर नवी गोष्ट, सांगण्याजोगं-लिहिण्याजोगं जें आहे, तें सांगतां-लिहितां येणार नाहीं.

नव्याची सुरुवात कां म्हणून होते ? प्रामुख्यानें अशामुळें सुरुवात होते, कीं नवीनांना एका सामान्य सत्याची प्रतिष्ठापना करायची असते. त्यांना हें जाहीर करायचें असतें, कीं आमच्या पूर्वजांहून बहुतेक बाबतींत आम्ही वेगळे आहोंत.

हा विचार, नवीनांचा विचार--कीं आम्ही आमच्या पूर्वजांहून बहुतेक बाबतींत वेगळे आहोंत--ही मनोवृत्ति किंवा समजूत हळूहळू कमी होत जाते. ही वृत्ति कमी होईलच आणि मग असें दिसून येईल, कीं जुन्यांशीं मिळतेंजुळतें असें कांहींतरी एक नव्यांत आहे. आणि जुन्याशीं नव्याचें हें प्रकृतिगत सादृश्य, किंवा कोणत्याहि प्रकारची का होईना एकात्मता, दिसून येईल, तेव्हां त्या एकात्मतेंत माणसाला स्वतःचा शोध लागेल, तेथें त्याला स्वतःची ओळख पटेल. आणि साहित्य-कलेच्या इतिहासांत तेंच तेवढें टिकून राहील.

यानंतर इओनेस्कोनें आपल्या नव्या संप्रदायानें केलेल्या प्रयत्नांविषयीं कांहीं लिहिलें आहे, स्वतःच्या लिखाणाविषयीं कांहीं थोडें लिहिलें आहे. तें येथें अप्रासंगिक आहे, म्हणून तें आपण वगळूं.

पण इओनेस्कोचा मूळ मुद्दा मात्र केव्हांहि ग्राह्यच वाटतो. साहित्य किंवा कला यांतील कोणतेंहि नवें आंदोलन कधींच सार्थ होत नाहीं--जोंपर्यंत त्याला जुन्याशीं कुठें-ना-कुठें संबंध जोडतां येत नाहीं, तोंपर्यंत. संपूर्णतया नवीन अशी कांहीं चीज विचारांत किंवा कलेंत कधींच नसते. कांहींहि नवीन जुन्यापासून तुटक नसतें, जुन्याशीं नव्या प्रकारें संबंध प्रस्थापित न केलेलें कांहीहि नवें कुचकामीच आहे. मराठींतल्या नव्या लोकांनीं यापासून का होईना कांहीं धडा घेतला, तर त्यांचें विशेष कांहीं बिघडेल असें नाहीं. पोकळ डामडौलाचे व प्रतिष्ठेचे डोलारे तेवढे ढांसळतील. पण हें जितक्या लौकर होईल तितकें बरेंच !

● ● ●

## समीक्षा

# रसरशीत कथाबीजें असलेला संग्रह

श्रीकृष्ण पोंक्षे

श्री. वसंत कुंभोजकरांच्या कथांना लाभलेलीं कथाबीजें रसरशीत आहेत. सामान्यांपासून असामान्यांपर्यंत सर्वांनाच तीं जिव्हाळ्याचीं वाटावीत. एखादी परिचयाचीच व्यक्ति परंतु बऱ्याच दिवसांनीं आपणांला भेटावी आणि त्या भेटीचा आनंद आपणांला व्हावा तशा तऱ्हेचा आनंद कुंभोजकरांच्या कथांतील पात्रें भेटल्यावर झाल्याशिवाय राहणार नाहीं. त्यांच्या कथेंत वावरणारीं लहानमोठीं पात्रें नित्य आपल्या जगांत आपणांभोंवतीं वावरत असतात तींच जशींच्या तशीं उभीं झालीं आहेत. नेमक्या आणि मोजक्या रंगरेषांत एखादा जाणता चित्रकार जसें प्रभावी चित्रलेखन करतो त्याप्रमाणें कुंभोजकरांच्या लेखणीला या संग्रहांत यश लाभलें आहे.

**रसिला**

वसंत कुभोजकर

महाराष्ट्र प्रकाशनगृह,
महाद्वार रस्ता, कोल्हापूर.

तीन रुपये

या संग्रहांत एकूण नऊ कथांचा समावेश आहे; ज्या कथेचें नांव या संग्रहास दिलें गेलें आहे ती कथा एका डळमळीत मनाच्या तरुणीच्या जीवनावर आधारली आहे. जीवनांत सुख हें पैशानेंच मिळेल. या विचारानें झपाटलेली रसीला आपणांवर निस्सीम प्रेम करणाऱ्याला धुडकावते. त्याच्या मृत्यूला कारण ठरते आणि एका धनाढ्य आणि आपणांवर लुब्ध झालेल्या पैशाच्या बळावर भोग खरीदणाऱ्या माणसाच्या जीवनांत अडकते. आपल्या अंगसौंदर्यावर अनेकांना झुलविणारीची ही शोकांतिका आहे. या मोहोबतीच्या दर्यांत तिनें उडी घेतली असती तर ती जास्त प्रभावी व्यक्तिमत्त्वाची झाली असती. उडी टाकणारा जीव सर्व गोष्टींचा अंदाज घेतो आणि चुकलाच तरी धडपड करतो. पडणाराची अगतिकता त्याच्यांत निश्चित नसते.

" सुख " या कथेंतील गंगाराम नोकरीसाठीं मन मारतो, एकाकी बनतो आणि अगतिक जीवन जगतो. या अगतिकतेचीं लक्तरें तोडण्याचें सामर्थ्य नसलें तरी तसा विचार त्याच्या " झेंप " या कथेंतील जाफरच्या जवळ दिसून येतो. एखादी माळ तुटावी आणि त्यांतील मणी इतस्ततः उधळले जावेत तसें असूत्र जीवन जगणाऱ्या जाफरच्या जीवनांत प्रीतीचा, आत्मीयतेचा कोंब लवलवूं लागतो ज्याला तो विटला होता त्या थिएटरच्या रिंगणांत त्याला रति उत्पन्न होते. ज्या मॅनेजरला तो पाण्यांत पाहात होता त्याला वांचविण्यासाठीं तो बेदरकारपणें आगींत झेंप घेतो. जीवनांतील पुरुषार्थाची प्रेरणा प्रीतीच्या पोटीं कशी असते हें सूत्र कुंभोजकरांनीं कलात्मक रीतीनें मांडलें आहे.

जीवनांतील कोणतेंहि न्यून जिवंत मनाला जखमी करतें. मग तें नैसर्गिक असो वा अनैसर्गिक असो. मर्यादित मिळकतींत प्रपंच

नेटका करण्याकरिता संततीनियमन करणाऱ्या कुमारला आपल्या या प्रयोगात पराभव पतकरावा लागतो. मानवी मनाच्या भुका सर्वांशाने नाही तरी अल्पाशाने भागल्या नाहीत तर त्या भुकेसाठी एखादा मनोहर "सैतानाचा सवाल" या कथेंत विरक्ति आणि अनुरक्तीच्या रस्सीखेचीत विळला जाऊन तळमळतो. विव्हळतो. धर्म, नीति, सुविचार या साऱ्यांवर अनाम पांघरूण घालून काळोखाचा जिना चढतो.

कुमोजकरांच्या काही कथाचे हे रसग्रहण. याशिवाय "तुझा खेळ होतो", "किमया", "हिवाळचातील रात्र" आणि "कोडी" या कथाहि सरस आणि सकस आहेत. कुमोजकराची लेखणी मनोविश्लेषणांतहि कथेची गति रोधीत नाही हें विशेष उल्लेखनीय आहे.

* * *

# पंडिती परंपरेंत शोभणारा काव्यसंग्रह

एके काळी गाजलेली कविता, असे ह्या संग्रहांतील अभिप्राय पाहतां या कवीच्या रचनेबद्दल म्हणावयास हरकत नाही. कवि भृंग (श्री. पडित, यांचे काव्यलेखन सर्वच जरी नाही तरी बरेंचसे अनुवादित आहे, आणि अनुवादाला ज्या काही अपरिहार्य मर्यादा पडतात त्या सर्व याहि ठिकाणी दिसून येतात. स्वतत्र रचनेपेक्षां अनुवादित रचना करणे याकडेच वहुतेक पडिती थाटाचें काव्य वळलेले आहे त्याला भृंगहि अपवाद नाहीत. मूळ सस्कृतातील रचना मराठीत आणण्याची परंपरा फार जुनी खरी पण त्यात पैजेवर अमृताला जिंकण्याची हिंमत आणि करामत फारच थोडयाच्या वाटचाला आली तरी पडिती परंपरेने जें काव्य निर्माण केलें त्यात भृंगांना स्थान निश्चित आहे; पण एकंदर काव्य पाहतां असे म्हणावेसें वाटते की, भृंगाना परतत्त्वाची ओढ होती. मात्र तळमळ नव्हती. भक्ताच्या पायरीपर्यंत त्यानी झेंप घेतली. भक्तीच्या पुढची मनाची झेंप भावरतीची असते तेथपर्यंतचा पल्ला त्यांच्या प्रज्ञेला जाणवला असला तरी तो प्रतिभेतून व्यक्त झालेला नाही. त्याचा पेशा त्यांचे व्यासपीठ याचा विचार करता त्याचे काव्य त्यांच्या भूमिकेला साजेसेच होते असें त्याच्या चरित्रावरुन वाटू लागते जगत् सन्मार्गी लागावें या इच्छेपोटी त्यांनी रचना केली ती प्रवचनकाराच्या भूमिकेवरून. प्रवचनकार हा अनताचा यात्रिक नसतोच असे नव्हे, पण सर्वसधारण त्याची भूमिका ही मार्गदर्शिकेसारखी असते. एखाद्या चौकात हातपाटी असते ती सागत असते हा रस्ता पढरपुराकडे जातो. योग्य मार्गदर्शन करणें एवढेंच तिचे कार्य.

त्यांच्या रचनेत भल्याबुऱ्याचे, पापपुण्याचे विचार आले आहेत. पण त्यात आत्माविष्कार, आत्मानुभूति कमीच आहे. भृगानी अनेक जातीच्या पुष्पातून मधु जमविला आहे, पण त्यानी एका मर्यादित बगीच्यातीलच मध गोळा केला. त्यातच ते तृप्त झाले आणि म्हणूनच याची सवेदना व आत्मानुभूति एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच जाऊं शकली. प्राचीन ग्रंथभाण्डारापलीकडे जाण्याची त्यानी कधी धडपडच केली नाही. त्यामुळें त्यांची काव्यशक्ति अल्पसतुष्ट आणि परावलबी झालेली वाटते.

लौकिक जीवनात काव्य करणे हे करंटेपणच म्हणावयास हरकत नाही. कारण त्याचा हा सग्रहच त्याची साक्ष देईल. ज्या वेळी हा कवि प्रसिद्धि आणि लोकप्रियतेच्या मार्गावर होता तेव्हाच त्याचा हा संग्रह प्रकाशित व्हावयास पाहिजे होता. तेव्हा तो न होता त्याच्या मृत्यूनतर त्याच्या चाहत्याना गुणगौरव स्मारक समिति स्थापून प्रसिद्ध करावा लागला.

नवीन अभिरुचीच्या सध्याच्या कवितेच्या जगात त्या गुंजारवास विशेष स्थान लाभेल असे वाटत नाही. भृंगगुणगौरव स्मारक समितीने हे पुस्तक काढून कवि भृंगाना साहित्याच्या जगात अक्षरदेह दिला. रसिक जर त्याच्या अतरगात शिरलाच तर त्याला त्यात काही मधु लाभेल.

● ● ●

**गुंजारव**
*श्रीकृष्ण पोंक्षे*
*भृंग स्मारक ग्रंथ*
भृंग गुणगौरव समिति
७५/४२ कृष्णकुज, चिपळूणकर रस्ता,
पुणें ४.
पाच रुपये


● व्यक्तिमत्त्वाचा विकास २=६०
ग. वि. अकोलकर

* *

● आचारसंहिता अहवाल ३=५०

* *

● लोकमत २=००
सदाशिव आठवले

* *

सभासदग्राहकांना २५ टक्के सवलत

इतर प्रकाशनासाठी लिहा :

**समाज प्रबोधन संस्था**
१२४२ सदाशिव पेठ, विद्यापीठवाडा, पुणें २



श्री. पंडित शेटे दि. २६-३-६३ ला निधन पावल्याचें वृत्त दि. २७ ला सकाळीं वाचलें आणि क्षणभर आपण काय वाचीत आहोंत हेंच कळेनासें झालें. त्यांचा माझा परिचय-स्नेह गेल्या ३-४ वर्षांतलाच. परंतु जेव्हां जेव्हां गांठभेट व्हावी तेव्हां तासदीडतासाच्या गप्पांत ते इतके रंगून जात कीं ती भेट संपली तरी त्यांची स्मृति ही महिनोंमहिने शिल्लक उरे. शेटे अत्यंत मनमोकळे होते. फार मेहनतीनें लिहिलेली कथा परत आली तर ते सगळ्या रागलोभासह त्यासंबंधीं बोलत असत आणि 'झिरमिर'सारखी कथा दिवाळी अंकांत प्रसिद्ध होणार याचा आनंद दिलखुलासपणें सांगत सुटत. त्यांत कसलाहि आडमुठा अभिमान डोकावत नसे. त्यांनीं लघुकथेवर प्रदीर्घ लिहावयाचें ठरवलें व त्यांना कळलें कीं माझ्याजवळ त्यासंबंधीं कांहीं टिपणें आहेत. यामुळें आमची चारदोन वेळां अधिक गांठभेट झाली.

साहित्यिक गप्पा सुरू झाल्या कीं त्यांना वेळेचें अवधान राहत नव्हतें. एकदां आम्ही सायंकाळीं भेटलों कोपऱ्यावरच्या एका हॉटेलांत. फारच कमी खाणें करून फार वेळ बसलों हें वाईट दिसेल म्हणून, पुढच्या नाक्यावरच्या हॉटेलांत बसण्याची त्यांनीं सूचना केली. अखेर फार रात्र झाली म्हणून ते घाईनें उठले. साहित्याचें, कथाचर्चेचें-टीकेचें त्यांना विलक्षण वेड होतें.

ते कॉलेजला सुटी लागून पुण्यांत आले कधीं-आजारी झाले कधीं यासंबंधीं कांहींहि न कळतां त्यांच्या निधनाचीच वार्ता वाचावी लागली. नेहमीं हंसतमुख असणाऱ्या या स्नेह्याची भेट पुनः कधींच होणार नाहीं हा विचार सतत अस्वस्थ करतो. फार अस्वस्थ करतो.

**वि. ग.**

पुणें, ता. २७-३-१९६३.

पंडित शेटे

आठनऊ दिवसांपूर्वी टिळकरोडवर बादशाही हॉटेलजवळ आपण भेटलों होतों. औरंगाबादहून तुम्ही नुकतेच आलां होतां. "तुम्हांला औरंगाबाद चांगलं मानवलं" असं मी म्हणालों, तेव्हां तुम्ही म्हणालां – "आतां काळज्या बऱ्याचश्या कमी झाल्याहेत." मी नंतर तुम्हांला म्हणालों – "तुम्ही अलीकडे कांहीं लिहिलं नाहीं" तसे तुम्ही म्हणालांत– "आतां पुष्कळ लिहायचंय...पुष्कळ वाचायचं आहे. चांगली तीन महिने सुट्टी आहे. मनांत खूप कल्पना आहेत. कांहीं पाहिलंय, कांहीं अनुभवलंय. येतोंच तुमच्याकडं एकदोन दिवसांत. पुष्कळ दिवसांत गप्पा मारायला मिळाल्या नाहींत. चांगले तास दोनतास बसूं." पंडित तुम्ही असं म्हणालांत आणि अंजुमाठीं दूध घरीं न्यायचं होतं म्हणून घाईघाईनं गेलांत. घाई तुम्हांला नेहमीं असायचीच.

आणि पंडित, त्यानंतर मी तुमची वाट पाहात होतों. म्हटलं कीं तुम्ही नुकतेच औरंगाबादहून आलां आहांत. थोडी सारवासारव झाली कीं याल. मग पुष्कळ बोलूं. तुमच्या नव्या कल्पना ऐकूं. काय नवीन वाचलंय तें ऐकूं. पण तुम्ही कुठं आलांत ?...आली ती तुमची बातमी.

खरं सांगायचं तर तुम्ही आतां नाहीं ही कल्पनाच मनाला पटत नाहीं. कालपरवां भेटलां होतां, तसेंच उद्यांपरवां भेटाल असंच वाटतं ! बातमी वाचूनदेखील वाटतं. पण मग मीच स्वतःला पटवूं पाहतों कीं आतां तुम्ही कधींच भेटणार नाहीं. पण मनाला हें पटत नाहीं.

तुम्हीं ती म्हाताऱ्या मुसलमानाची कथा मला अनेकदां ऐकवली होती. ती लिहिणार कशी ? कोर्टांत तुम्हीं पूर्वी शिरस्तेदाराची नोकरी करीत असतांना तो निष्पाप वृद्ध मुसलमान तुम्हांला भेटला होता. त्याचा गुन्ह्याशीं कांहींहि संबंध नसूनदेखील तो एका खटल्यांत गोंवला गेला होता. सारी कहाणी त्यानें तुमच्यापुढें उघडली होती. त्या म्हाताऱ्याची कथा सावकाशीनें हळुवारपणानें तुम्ही लिहिणार होतां. खरंच पंडीत तुम्हीं आतां ती कथा लिहिणार तरी कशी हो ?

पंडित, तुम्हांला साहित्याचं विलक्षण प्रेम होतं. कथा लिहायचं वेड होतं, कथांवर टीका करायचं वेड होतं. तुमच्या स्वतःच्या प्रसिद्ध झालेल्या कथांवर तिऱ्हाईत दृष्टीनें पाहून त्यावर तुम्ही टीकालेख लिहिणार होतात ना ? तो आतां कुठं प्रसिद्ध होणार आहे ? पंडितराव, तुम्ही जर हें लिहिणार नव्हता, तर सांगितलंत तरी कशाला ?

विजयनगर कॉलनींतून येतांना आज तुमच्या पूर्वीच्या खोलीकडे लक्ष गेलं. तासन् तास मारलेल्या गप्पांची आठवण झाली. मी तेथून चालत तसाच पुढं आलों, पण माझं मन मात्र तिथं घुटमळत राहिलं.

पंडित, एकसारखी तुमच्या बोलण्यांतली जिद्द आठवते. गप्पांची बैठक आठवते. आणि एका रात्रींत 'झिरमिर' लिहून काढली व सकाळच्या चहाला वाचून दाखवली तें आठवतं. दिवाळी अंकानंतरच्या गप्पा आठवतात. कोणाची किती झेंप आहे याचं तुम्हीं केलेलं विवेचन आठवतं ! साहित्यक्षेत्रांत पडायचं तर हौस हवी, चिकाटी हवी, जिद्द हवी, प्रयोग हवेत हे आपल्या गप्पांतले नेहमीचे निष्कर्ष आठवतात.

पंडितराव, पुष्कळ गप्पा झाल्या...आणि पुष्कळ गप्पा राहिल्याहि आहेत...कितीतरी नवीन पुस्तकं आलीं आहेत. पण आतां काय उपयोग ? आपल्या साऱ्या गप्पा आतां नुसत्या आठवणींत राहणार ... रेंगाळत राहणार.

सत्य कटु असतं. यापुढें साहित्यावर गप्पा मारायला, हौसेनं नवंनवं कांहींतरी सांगायला तुम्ही नाहीं ही खूणगांठ मनाशीं पक्की बांधावी लागणार आहे. . . .

आतां राहणार आहेत नुसत्या आठवणी... अगदीं ताज्याताज्या वाटणाऱ्या...

आपला स्नेहांकित
**मधुकर परांजपे**

# माझा पति – हंगेरीचा हुतात्मा



पाल मालेटर

★

: लेखिका :

मारिया मालेटर

★

*कम्युनिस्ट राजवटींविरुद्ध लढतांना प्राणार्पण करणारा पाल मालेटर याची त्याच्या पत्नीनें कथन केलेली चित्तथरारक हकीकत.*

★

: अनुवाद :

श्याम तामणे

★

माझे पति कर्नल पाल मालेटर यांची ही कथा आहे. १९५६ मध्यें झालेल्या रशियाविरोधी उठावाचे ते नेते होते. कम्युनिस्टांनीं त्यांना १९५८ मध्यें फांशीं दिलें.

माझ्या व पालच्या कुटुंबाचा फार पूर्वीपासून परिचय होता. पण मी स्वतः २१ वर्षांची होईपर्यंत पालला भेटलें नव्हतें. त्या वेळीं मला नोकरी नव्हती कीं माझें घर नव्हतें. माझ्याच देशांत मी निर्वासित होतें.

१९४५ च्या एप्रिलमध्यें सोव्हिएट सैन्य आमच्या कासा या गांवांतून पश्चिमेकडे गेलें. ज्या मध्यम वर्गास कम्युनिस्ट विश्वास ठेवण्यास नालायक समजतात त्या मध्यम वर्गांतील मी होतें. आमच्या गांवांतील कम्युनिस्ट सत्ताधाऱ्यांनीं आमचें घर जप्त केलें व मला पकडण्याचा हुकूम झाला. त्या एकंदर गोंधळाचा फायदा घेऊन मी निसटलें ती थेट डेब्रेसन या शहरांत आलें. डेब्रेसनला मला काय दिसलें तर आप्तांच्या जळलेल्या घरांचे अवशेष ! ! आतां मला या जगांत कोणी नव्हतें. वडील वारलेले व कुटुंब विस्कळित झालेलें. सुदैवानें कासा गांवांतील माझ्या मित्रांनीं मला कॅप्टन पाल मालेटर यांचें नांव सांगितलें होतें. त्या वेळीं पाल हंगेरीच्या सीमेवरील पहिल्या पलटणीचा प्रमुख होता. पूर्वी मीं त्याला कधींच पाहिलेलें नव्हतें पण आतां तेंच माझें एक आशास्थान होतें.

### पहिली भेट

प्रथमतः मला बटॅलियनच्या परिसरांत प्रवेश नाकारण्यांत आला. त्या आधींची रात्र मीं एका मोकळ्या इमारतींत कशीबशी काढली. माझा चेहरा अश्रूंच्या सतत सिंचनामुळें म्लान झाला होता. जीर्ण बूट व आईचे अंगाला न येणारे कपडे माझ्या अंगावर होते. कॅप्टन पाल मालेटर जर त्या वेळीं स्वतःच दरवाज्याजवळ आला नसता तर मला कदाचित् कधींच आंत प्रवेश मिळाला नसता. पाल चांगला सव्वा सहा फूट उंच व सडपातळ होता. पण त्याच्या वागणुकींतील गांभीर्य हें त्याच्या अठ्ठावीस वर्षें वयापेक्षां कितीतरी मोठ्या वयाला शोभेसें होतें. त्यानें एकंदर परिस्थितीचा एका दृष्टिक्षेपांतच अंदाज घेतला व मीं माझें नांव सांगतांच आपल्या कचेरींत मला नेलें.

"बसा, तुम्ही येणार असें मला वाटतच होतें." त्याच्या या शब्दानें मला एकदम हलकेंफुलकें आणि सुरक्षित वाटूं लागलें. मीं यापुढें काय करायचें ठरवलें आहे, असें त्यानें विचारतांच 'माझा सोप्रानला जाण्याचा विचार आहे' असें मीं उत्तर दिलें. माझी आई व बहीण हेलन तेथेंच होत्या. "पण तें शक्य नाहीं." पॉल म्हणाला, "सोप्रान येथें जायला सबंध हंगेरी ओलांडून जावें लागेल. सध्यां तुला येथेंच राहावें लागेल." कांहीं काल विचार करून मग त्यानें

मला त्याच्याच ऑफिसात टायपिस्टची नोकरी दिली.

मला केवळ नोकरी देऊन मात्र पाल थाबला नाही. त्याच दिवशी दुपारी जवळपासच्या एका झोपडीत त्याने माझी राहण्याची व्यवस्था केली. मी घरात येऊन बसते तोंच कोणीतरी दार वाजवले. पाहते तों एक स्त्री फुलाचा गुच्छ घेऊन आलेली. युद्धामुळें भग्न झालेल्या शहरांत ही फुले कोठून आली कोणास ठाऊक ! पण फुलाबरोबरच्या भेटकार्डावर पालने लिहिले होते " मारिया, चागली विश्राति घे. "

नंतरचे कांही आठवडे म्हणजे माझ्या आयुष्यातील अत्युच्च सुखाचा काळ होता. मी त्या शहरात नवीन होते व माझी नोकरी त्रासदायक व जिकीरीची होती. पण या गोष्टीकडे माझें लक्षच नव्हतें. कारण... कारण मी माझ्या स्वतःच्या एका वेगळयाच जगात वावरत होतें. तेथे सर्व काही पालमय झाले होते. मला सर्व ठिकाणी पालच दिसत होता.

सारखे शातपणे उभे राहिलों. पालनें मग आमच्या वाङ्निश्चयाची अगठी माझ्या बोटात घातली व आपले ओठ माझ्या ओठावर टेकविण्यासाठी तो वाकला हाच आमचा पहिला ओष्ठस्पर्श.

ऑगस्ट १९४५ मध्ये आमचे लग्न झाले. जवळच्याच एका गावातील एका झोंपडीत आम्ही आमचा मधुचद्र साजरा केला. त्या झोपडीतील जमीन मातीची होती त्यामुळें आम्हाला गवतावर झोपावें लागे. मात्र आजूबाजूचे सृष्टिसौदर्य फारच आकर्षक होते. ते तीन आठवडे मी अतुलनीय अशा सुखात घालविले. त्या वातावरणातील साधेपणा व शातपणा पालला फारच आवडला. कारण सैनिक या नात्याने त्याने आयुष्यात आजपर्यंत अस्वस्थताच फार अनुभवली होती. पाल म्हणे, " आपल्याला जर सारं आयुष्यं असं शातपण घालवता आलं तर मला आणखी दुसर काही नको. "

अर्थात् त्या धामधुमीच्या काळात अशी इच्छा करणे व्यर्थ होते !

*१९५६ साली हंगेरींमध्यें रशियन दडपशाहींविरोधीं जो उठाव झाला त्यांत कर्नल पाल मालेटर याचें स्थान अढळ आहे. रशियाविरुद्ध लढण्याअगोदर पालला आपल्या सदसद्विवेकबुद्धींशीं मोठा झगडा द्यावा लागला. त्याच्या अंतर्मनांत चाललेल्या परस्परविरोधीं भावनांचा संघर्ष त्याचीं पत्नीं मारिया हिनें अत्यंत भावपूर्ण व स्पष्ट शब्दांत सांगितला आहे.*

*हीं कथा एकट्या पालचीं किंवा मारियाचीं नाहीं तर रशियन दडपशाहींखालीं चिरडल्या गेलेल्या हजारों हंगेरियन बंधुभगिनींचीं हीं कथा आहे. या कथेंतून हंगेरींचा आत्मा बोलत आहे.*

### लग्नाची रुजुवात

पाल अनेक दृष्टीनी वेगळा होता. तो दिसायला फार उमदा होता; त्याची वागण्याची एकदर पद्धत अत्यत रुबाबदार होती. त्याच्या डोळ्यांत एक वेगळेच तेज चमकताना दिसे. त्याच्याइतके बोलके व भावपूर्ण डोळे मी दुसऱ्या कोणत्याच माणसाचे पाहिले नाहीत. ऑफिसात असताना तो माझ्यापासून अगदी दूर राही व शिस्तीने वागे. पण नतर आम्हाला जो मोकळा वेळ मिळे तो आम्ही अधिकाधिक एकमेकाच्या सान्निध्यात घालवीत असू. तो नेहमीच शांत व विचारी असे. माझ्या अगतिकतेचा फायदा घेण्याचा त्यानें कधीहि प्रयत्न केला नाही.

अशा तऱ्हेनें एक महिना घालविल्यानतर एक दिवस पालने मला लग्नाबद्दल विचारले. माझी पात्रता वादग्रस्त होती. त्याचें कुटुंब गेली ३०० वर्षे प्रॉटेस्टट पंथी होते, तर आम्ही कट्टर कॅथॉलिक होतों. माझें स्वत.चें शिक्षण कॉन्व्हेन्टमध्यें झाले होतें. त्यामुळें मला या गोष्टी महत्त्वाच्या वाटत होत्या.

दुसऱ्या दिवशी ऑफिसात शिरताच पालने माझा हात हाती घेतला व आपण आज सुटी घ्यायची असें जाहीर केले. मला त्याने त्याच्या घरी नेले. टेबलावर निरनिराळया रगाचीं फुले व्यवस्थितपणें माडलेली होती व मध्यभागी त्याच्या आईवडिलांचा लग्नाच्या वेळचा फोटो ठेवला होता. ते एकदर वातावरण इतकें गंभीर व प्रसन्न होते की आमच्या भावना हेलावल्या व काही क्षण आम्ही चर्चमध्ये असल्या-

### रशियन सैनिकांची दादागिरी

साध्या आगगाडीच्या प्रवासातसुद्धा अत्याचाराचे प्रकार व्हायचे. एक प्रसग मला चांगला आठवतो. आम्ही मालाने गच्च भरलेल्या एका गाडीतून जात होतों. त्या वेळी हगेरी भयानक अशा चलनवाढीच्या चक्रात सापडला होता. पैशाला काही किंमतच राहिली नव्हती. शहरातून खायलादेखील कांही मिळत नसे. स्वाभाविकपणेच शहरातील लोक आपल्या जवळच्या वस्तु खेड्यात नेत व त्याच्या बदली धान्य घेत. या त्याच्या परिस्थितीचा फायदा घेऊन रशियन सैनिक आगगाडीवर त्यांना लुबाडण्यासाठी येत.

आमची गाडी झालेनॉक स्टेशनावर थाबल्याबरोबर अशा एका लुटारूचा जमाव प्रवाशावर तुटून पडला आणि सूटकेसेस् बदुकीने चाचपू लागला. एका हगेरियन स्त्रीने डोळ्यात प्राण आणून त्याना विरोध केला तेव्हा तिला क्रूरपणे बाजूला ढकलून देण्यात आले. एक मोठा थोरला रशियन सैनिक तिच्या वस्तु तपासू लागला. त्यात काही न मिळाल्यामुळें त्याने मुद्दाम तिरस्काराने तिचे सर्व सामान अस्ताव्यस्तपणे भिरकावून दिले. त्यात लहान मुलाचे कपडे, औषधाच्या बाटल्या होत्या. अशा वस्तु त्या काळच्या हगेरीत मिळत नसत. तिच्या मोठमोठ्याने झालेल्या आक्रोशानें पालचे लक्ष तिकडे गेले. त्या रशियन सैनिकाची उद्दाम वागणूक पाहून पालचा चेहरा रागाने लाल झाला. त्याने त्या सैनिकाला हटकले. तेव्हा चिडून त्याने पालची कुचेष्टा आरभली. पालची सहनशक्ति सपली व एका

जबरदस्त प्रहारानें पालनें त्याला मूर्च्छित केले. बाजूच्या लुटालूट करण्यांत गर्क असणाऱ्या सैनिकांनी पालवर हल्ला केला. पालने त्यांच्याशी चागलीच झुंज दिली व गाडी सुटल्यावर आपली सुटका करून घेऊन गाडीत उडी मारली.

पालचें हें शौर्याचे कृत्य पाहून मला त्याच्याबद्दल अधिकच अभिमान वाटू लागला. या घटनेमुळें पालला आतां शाततेचे जीवन जगणें मात्र अशक्य होणार होते.

## १९४६ मधील हंगेरी

पालची बदली आतां बूडापेस्टला झाली व तेथें आम्ही आमचे वैवाहिक जीवन सुरू केले. मी पाच महिन्यांची गरोदर असतानाच पालला ४० मैलावर असलेल्या उत्तर सीमेवरील व्हॅक या गावीं जाण्याचा हुकूम झाला. आगामी बाळतपणाच्या सोयीच्या दृष्टीनें मी बूडापेस्टलाच राहणें हितावह आहे असे पालचें मत पडल्याने मी तेथेंच राहिलें.

चलनवाढीमुळें तें पहिले वर्ष फारच कठिण गेलें. कम्युनिस्टानी हेतुपुरःसर परिस्थिति अधिक विकट केली. मध्यम वर्ग चिरडून टाकण्याकरितां पैशाची किंमत इतकी झपाट्यानें कमी करण्यात आली कीं कधीं कधी जीवनाच्या आवश्यक गरजा मागविण्यातच पालचा सर्व पगार संपून जायचा. सुदैवानें माझा भाऊ वेला हा तेथेंच होता. तो मला अलाइड कंट्रोलच्या ऑफिसमधून बंद डब्यांतील अमेरिकन पदार्थ आणून द्यायचा पौष्टिक जेवण मिळावे म्हणून. जवळजवळ दररोज पालच्या आत्याकडे मोठ्या कष्टाने मला जावे लागे. इतकी काळजी घेऊनसुद्धां माझें वजन दिवसेदिवस घटतच होते.

सातव्या महिन्यात मी झेगेड (Szeged) येथें जावें असा पालचा आग्रह पडला. कारण, माझी आई तेथे होती व तेथें माझी योग्य ती काळजी घेतली गेली असती. आपल्याला मुलगा व्हावा अशी पालची दांडगी इच्छा होती. पालखेरीज दुसरा मुलगाच त्याच्या घराण्यात नव्हता. झेगेड येथील परिस्थिति बूडापेस्टपेक्षा जरा बरी होती. त्यामुळें मी हळुहळू गेलेली शक्ति परत मिळवू लागले.

जून १९४६ मध्यें आठव्या महिन्यातच मला अपुऱ्या दिवसाचा मुलगा झाला मालेटर घराण्याचा वंश चालू झाला. पाल आनदसागरांत जणूं बुडालाच ! ज्या दिवशी पालचा जन्म झाला तो दिवस माझ्या आयुष्यातील अतीव सुखाचा होय !

प्रथमपासून पालला पॉलविषयी अमर्याद अभिमान वाटे पाल आता दररोज पत्र पाठवू लागला व दर रविवारी आमच्या सहवासात काही तास घालविण्यासाठी तो त्रासदायक प्रवास सहन करायचा. येताना तो फुले व पॉलकरितां खेळणी आणायचा. खरे म्हणजे ती खेळणी समजण्याइतका पॉल मोठादेखील नव्हता. लौकरच आम्ही जेथें पालची बदली झाली होती त्या व्हॅक या गावी आमचे बिऱ्हाड हलविले. पालचा आनद गगनात मावेना !

नंतरच्या काही वर्षांत पालने त्याच्या नोकरीत बढती मिळविली. अर्थात् त्यामुळें ४ वर्षांत ७ ठिकाणी बदल्या झाल्या. १९४८ मध्यें तो लेफ्टनंट कर्नल झाला. या वेळेपर्यंत आमच्या चिमुकल्या घरात आणखी दोन मुलांची वाढ झाली होती. मुलांशी तासन् तास खेळताना पाल अगदी रमून जाई. त्याना गोष्टी सागणें व वळण लावणे या दोन्ही गोष्टी पालला साधत असत.

१९५० च्या उन्हाळयात पालची बदली परत एकाएकी बूडापेस्टला झाली आणि तेथेंच त्याला शेवटपर्यंत नोकरी करावी लागणार होती. आतां यापुढें आम्हाला सुख कधीच लाभणार नव्हते

## थोडी पूर्वपीठिका

मनाला क्लेश देणाऱ्या समोवतालच्या परिस्थितीत दुसऱ्याहि काही गोष्टी होत्या. पालचे वडील विश्वविद्यालयात प्रोफेसर होते. ते ध्येयवादी होते. त्याची मिळकत सरकारवर अवलबून नव्हती. हंगेरीतील सामाजिक जीवन व त्यातील विषमतेची जाणीव त्यांनी पालला तीव्रतेने करून दिली होती. परतु त्यांचे कौटुंबिक जीवन मात्र विचित्र होते. पत्नीबरोबर त्याचे कधीच पटले नाही. आठवडेच्या आठवडे ते बायकोशी बोलत नसत. ध्येयवादाचें बाळकडू मिळालेला पाल अशा तऱ्हेने एका सुसंस्कृत घरांत वाढला परंतु त्या घरांत आईवडिलात परस्पर द्वेषाचेच वातावरण होतें.

याउलट माझें माहेरचे घर प्रेमाच्या सूर्यप्रकाशाने न्हात होतें. माझे वडील मनमिळाऊ होते. वडिलांचें कासा या शहरांत मोठे हॉटेल होते. ते उद्योगप्रिय होते. आई अत्यत सुसंस्कृत व धार्मिक अशा (Szeged) झेगेड कुटुबातील होती. सार्वजनिक व सेवेच्या कार्यांत ती सक्रिय भाग घेत असे. मोठी निस्पृह आणि तत्त्वनिष्ठ स्त्री होती ती. पण ती सनातनी हंगेरीत वाढल्यामुळें थोडी जुन्या वळणाचीच राहिली होती.

पालच्या व माझ्या या परस्परविरुद्ध कौटुंबिक पार्श्वभूमीमुळें विवाहाच्या पहिल्या कांही दिवसातच आमच्यातले घर करून बसलेले मतभेद दृग्गोचर होऊ लागले कोणत्याहि विवाहात अशा तऱ्हेच्या बारीक सारीक झटापटी (conflicts) होतातच व त्या विसरल्याहि जातात पालच्या व माझ्यामध्यें मात्र जी एक अनुल्लंघनीय भिंत होती ती म्हणजे पालचे कम्युनिस्ट पार्टीवरील प्रेम !

## जाळयांत गावला मासा

ह्याची सुरुवात नकळत १९४२ मध्येंच झाली होती. त्या वेळी हंगेरियन मिलिटरी ॲकॅडमीमधून पाल नुकताच सेकड लेफ्टनंट म्हणून बाहेर पडला होता. रशियाच्या सरहद्दीवर नेमणूक झालेल्या सर्व हंगेरियन ऑफिसर्सना अशी सक्त ताकीद असे की काही झाले तरी शत्रूच्या हातात जिवन्त सापडायचें नाही. कैद्याचा अमानुषपणें छळ करण्याबद्दल तर रशियन प्रसिद्धच होते. अशाच एका भयकर परिस्थितीत सापडला असतांना पाल आपल्याजवळील शेवटच्या ग्रेनेडने स्वतःला मारून घेणार इतक्यात मशिनगनच्या गोळ्यानी त्याला खाली पाडलं. पाल बेशुद्ध पडला. त्याला पकडून नेण्यात आले.

आश्चर्य असे की रशियनानी पालला फारच दयाळू वागणूक दिली. आपल्या जखमेवर यानी मीठ कसें चोळले नाही याचे त्याला आश्चर्य वाटले. पाल गोंधळला. नाझींचा पाल द्वेष करीत असल्यामुळें रशियनाना पालला जिंकणे सोपे गेले. बरा झाल्यावर त्याला इतर कैद्याबरोबर एका कँपमध्यें ठेवण्यात आलें. हंगेरियन कम्युनिस्ट पक्षाचे पुढारी रोज त्याना व्याख्याने देत आणि पालसारख्या असामान्य सैनिकाची तर ते फारच काळजी घेत. नाझींशी लढण्यासाठी व हंगेरीची मुक्तता करण्यासाठी शिक्षण घ्यायला जे स्वखुशीने तयार झाले त्यात पाल अग्रेसर होता.

कांही आठवड्याच्या प्रशिक्षणानतर पालला आपली पहिली कामगिरी मिळाली. सैनिकाच्या एका छोटया तुकडीसह एरडले (Erd-

ely) येथें पॅरॅशूटमधून उड्या टाकायच्या, आगगाड्या उडवून द्यायच्या, पुलाची नासधूस करायची व शरण जाण्यासाठी हंगेरियन सैनिकाचे मन वळवायचे हे पालच्या तुकडीचे काम होते.

अर्थातच हे काम धोक्याचे व कठीण होते. पण पालने तें यशस्वी रीत्या पार पाडलें. पाल रशियनांना खात्रीचा माणूस वाटला. त्यांनी त्याला आणखी एक अशा प्रकारचें काम दिले व तेसुद्धा पालने तितक्याच धाडसाने पार पाडले.

पालला सन्मान मिळाला, कॅप्टन म्हणून बढती मिळाली व युद्धाच्या शेवटी शेवटी त्याची सीमेवरील एका ठाण्यावर नेमणूक झाली. त्या अगोदर हगवणीच्या प्राणघातक आजारातून पाल नुकताच बरा झाला होता. युक्रेन येथील हॉस्पिटलमध्यें तो अनेक दिवस बेशुद्धावस्थेत पडून होता. त्यानंतर थोड्याच दिवसात माझी व पालची भेट झाली.

त्याने जी पार्टीची कामें केली होती त्याचा अर्थाअर्थी कम्युनिझमशी काही एक संबंध नव्हता. पाल कट्टर देशभक्त होता व देशाचे हित तो इतर कोणत्याहि गोष्टीपेक्षा जास्त महत्त्वाचे मानीत असे. हंगेरीची नाझींच्या तडाख्यातून सुटका करण्यासाठी केवळ त्याने रशियनांच्या हातामध्यें हात घालून काम केले.

मी कम्युनिस्ट नाही व कधीहि होणार नाहीं असें पालने मला लग्नाच्या वेळी सांगितले होते आणि म्हणूनच तीन महिन्यानंतर कम्युनिस्ट पार्टींत आपण शिरलों असें पालने जाहीर केल्यावरोबर मला धक्काच बसला.

त्याने आपले मन का बदलले ? त्याच्या धोरणाने एकदम अशी कोलांटी उडी का मारली ? याचें नक्की कारण मला कधीच समजले नाही.

### शेवटची मुक्त निवडणूक

अलाइड कंट्रोल कमिशनच्या देखरेखीखाली जी निवडणूक झाली त्याच सुमारास पालने हा निर्णय घेतला हंगेरीतील मी पाहिलेली ही शेवटचीच स्वतंत्र वातावरणातील निवडणुक ! निवडणुकीत यश मिळविण्यासाठी अर्थातच् कम्युनिस्टांनी त्यांचे मुरब्बी प्रचारक राबवले. पालला अशाच कोणत्यातरी प्रचारकानें वश केले असावें.

परंतु प्रत्यक्षात मात्र वेगळेच घडले. १९४५ च्या नोव्हेम्बरमध्यें झालेल्या निवडणुकीत कम्युनिस्टांना एकूण मतदानाच्या १७ टक्के मते मिळाली. तरीहि स्थानापन्न झालेल्या नवीन मंत्रिमंडळात एक जागा त्यांनी हिकमतीने हस्तगत केली. अंतर्गत पोलीस खात्याची ही जागा होती व त्यामुळे अटक करण्याचा अधिकारहि त्यांच्याकडेच होता. साहजिकच हें खाते लालभाईंच्या वर्चस्वाखाली आल्यावर संबंध हंगेरीवर छुप्या कम्युनिस्ट दडपशाहीचा नंगा नाच सुरू व्हायला फार वेळ लागला नाही.

कम्युनिस्टांच्या चळवळीकडे ध्येयवादी पाल ओढला गेला. कम्युनिस्ट पार्टींत तू का शिरलास असें मी पालला विचारलें तेव्हा तो म्हणाला की हंगेरियन जनतेला कम्युनिझमच चांगले दिवस आणील; विशेषत: रशियाने युद्ध जिंकल्यावर त्यांच्याबरोबर काम करण्याशिवाय दुसरा उपायच नाहीं. गेली कित्येक शतके, देशातील चांगल्या गोष्टींचा उपभोग फक्त एका लहान स्वार्थसाधू (privileged) गटानेच घेतला. आतां हे बदलेल. सर्वसामान्य जनतेलासुद्धां या गोष्टी आता उपभोगायला मिळतील. यामुळें काहीं थोड्या लोकांना त्रास होईल पण अनेकांच्या कल्याणासाठी त्यांनी ते सहन करायला पाहिजे.

पालच्या या कल्पनांशी मी सहमत होऊं शकत नव्हते. उलट आगामी संकटाच्या भीतीनें मी व्यग्र झाले,

### वैवाहिक जीवनाला सुरुंग

या गोष्टींचा आमच्या दैनंदिन जीवनावर कित्येक दिवस काहीच परिणाम झाला नाही राजकारणाविषयी मला बिलकुल आदर नव्हता आणि अधूनमधून पाल मला पार्टीच्या कामाविषयी व्याख्यानें ऐकवीत असला तरी त्यालामुद्धा राजकारणात मर्यादितच रस असावा अशी माझी भावना होती. आपल्या नोकरीमध्यें कोणी ढवळाढवळ करू नये ही एकच त्याची इच्छा होती. आमचे एकमेकांवरील निस्सीम प्रेम व मुलाविषयी आम्हाला वाटणारा जिव्हाळा यात आम्ही इतके गुरफटलेले होतो की पाल कम्युनिस्ट पार्टीचा सभासद होऊन पांच वर्षे झाली ही गोष्ट लक्षांतहि येत नसे.

१९५० मध्यें परिस्थिति वाईट होऊं लागली. कम्युनिस्टांनी हंगेरियन सरकारवरील आपली पकड घट्ट करण्यास सुरुवात केली आणि पालसारख्या पार्टीच्या सभासदावर त्यासाठी त्यांनी दडपण आणायला सुरुवात केली. त्याच्या ह्या दडपणाखाली पालचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व व वागण्याची पद्धत बदलली. पाल आता तासन् तास कोणाशीहि न बोलतां एकटाच वेळ घालवूं लागला. मनगटावरील घड्याळाकडे तो सतत नजर टाकी व बाहेर बारीकसा आवाज झाला तरी उडी मारून सावध राही.

सोव्हिएट तत्त्वप्रणालीच्या अभ्यासातहि तो बराच वेळ घालवी. याबद्दल मी त्याची कान उघाडणी करताच तो गंभीरपणें म्हणे, मला त्यांची धोरणं आणि डावपेंच माहीत असण आवश्यक आहे. तरच त्यांचा यशस्वी प्रतिकार करतां येईल. नाहीतर सर्व संपल्यासारखच आहे. (I must know how to counteract them, otherwise we are lost) त्याच्या मनाला किती क्लेश होत होते हे मला यावरून कळून चुकले.

भावनावश होऊन मी पालचा हात धरला व म्हटलें, "पाल, आपण हा देश सोडून निघून जाऊ या. इथं आपल्याला जगण अशक्य आहे. आपण (पश्चिमेला) जाऊं आणि–"

त्याच्या नजरेंतील भाव पाहून मी थांबले "नाहीं, ते शक्य नाही" पाल म्हणाला "देश संकटांत असताना मला तो सोडून जाणं शक्य नाही. मला इथच राहिल पाहिजे व जनतेच्या सुखदु:खात सहभागी झाल पाहिजे. मग त्यात मरण आलं तरी बेहेतर." नंतर क्षणभर कुणी नाही अस पाहून तो खालच्या आवाजात म्हणाला "मारिया, भिऊं नकोस. वेळ येईल तेव्हा मी योग्य तसाच वागेन."

बूडापेस्टला आमच्याकडे माझी आई राहाते हे पार्टीला आवडले नाही. एका शस्त्रक्रियेंत मी फारच अशक्त झाल्यामुळें मला मदत करण्यासाठी ती माझ्याकडे आली होती व नंतर काही दिवस राहिली होती. आर्थिक दृष्टीनेसुद्धा ती आम्हाला मदत करीत असे. शिवाय ती मुलाकडे पाहत असल्यामुळें मला नोकरी करणे शक्य झाले. पॉललासुद्धा माझ्या आईचे फार वेड होतें. पण ती जुन्या पिढीचें प्रतीक असल्यामुळे कम्युनिस्ट तिच्याकडे मोठ्या संशयानें पाहत.

## सैन्यावर कबजा

कम्युनिस्टाना हंगेरियन सैन्य आपल्या हातातील एक प्यादें बनवायचें होते व त्या दृष्टीनें त्याचे प्रयत्न चालले होते. सैन्यातील कट्टर देशाभिमानी हंगेरियन अधिकारी ही त्याच्या मार्गातील एक मोठीच धोड होती. म्हणून अशा अधिकाऱ्यांना बदलून त्यांच्या जागी कम्युनिस्ट पक्षातील नुकतेच सथा दिलेले अधिकारी नेमले जाऊं लागले. जे जुने अधिकारी अजून जागेवर होते त्याना जारीनें पुन्हा शिक्षण दिले जाई व ते पक्षाशी एकनिष्ठ आहेत की नाहीत हे कसून तपासलें जाई. त्याच्या या नवीन सैन्यात स्वाभाविकपणेच पाल त्याना पाहिजे होता. कारण त्याचे धाडस व तेज याबद्दल त्याची खात्री होती. मात्र पालवरसुद्धा यानी सक्त नजर ठेवली होती.

अता हंगेरीत भीतीचें वातावरण सर्वत्र पसरलें होते. प्रत्येक महिन्याला परिस्थिति खालावत होती. पालला स्वतंत्र वैयक्तिक आयुष्य असे आता राहिलेच नव्हते. आपला मोकळा वेळ आपण कोठें व कोणाच्या संगतीत घालविणार आहोत हें त्याला अगोदर कळवावे लागे. आमच्या मित्रांना व ओळखीच्या लोकाना हे अशा प्रकारचे कळविलें जाणे अजिबात आवडत नसे व त्यामुळें ते आम्हाला टाळू लागले. मी माझ्या स्वतःच्या कुटुंबियानासुद्धा आता भेटूं शकत नव्हतें. पालचें धैर्य असामान्य होते. पण त्याचा त्याच्या मनाशी चाललेला वाढता संघर्ष मला दिसत होता. रस्त्यातून चालतांनासुद्धां त्याचें चोहोकडे लक्ष असे व मी जरा मोठ्यानें बोलू लागले तर तो मला "कोणी ऐकेल, हळू बोल." अशी सावधगिरीची सूचना द्यायचा. शिवाय माझें बोलणें कदाचित् धोकादायक असण्याचा संभव होताच.

## गुप्तचरांचा ससेमिरा

पालला जाळ्यांत पकडण्यासाठी कम्युनिस्टानी अनेक क्लृप्त्या योजल्या. एका विश्वासू सहकाऱ्यानें पालला खाजगी रीत्या सागितले कीं त्याला पालवर नजर ठेवण्यास सागितले आहे, कारण पाल परकीय भाषा शिकून पश्चिमी राष्ट्राशी संबंध जोडण्याचा प्रयत्न करतोय असा त्यांना त्याचा संशय येतोय. त्याची ती मित्रत्वाची सूचना ऐकून मी भावनाविवश झाले पण पालने ओळखले की यात काही तरी डाव आहे. त्यानें हा प्रकार लगेच आपल्या वरच्या अधिकाऱ्यांच्या कानावर घातला. पालचा तर्क खरा ठरला. त्यानी कबूल केले की हा सर्व बनाव त्याची एकनिष्ठता संशयातीत आहे की नाही हें पाहण्यासाठी घडवून आणला गेला होता.

एकदा मी व पाल सकाळी कामावर जाण्यासाठी निघालों असतां दारावरची घंटा खणखणली. पाल चिंताग्रस्त झाला व दार उघडण्यासाठी गेला. तो परत आला तेव्हा त्याच्या हातांत एक चिठी होती. तिच्यावर लुडोव्हिको मिलिटरी ॲकॅडमीतील त्याच्याबरोबर असलेल्या एका वर्गमित्राची सही होती. त्यात लिहिले होतें, "पाल मालेटर, आम्ही तुला ओळखतों, आपण स्वतंत्र जगात राहतों आणि आपण हंगेरीच्या मुक्ततेकरिता लढत आहोंत. आमच्या सस्थेशीं सहकार्य करणें हें तुझें कर्तव्य आहे." थोडक्यात म्हणजे त्यांनी पालला कम्युनिस्ट राजवटीविरुद्ध फितूर व्हायला सागितले होते. हे सर्व पाहून मी दचकले. चिठी घेऊन आलेल्या माणसाला सोडून द्यावें म्हणून मी पालला विनविलें. कारण, त्यालादेखील बायकापोरे असतील व कम्युनिस्टाना जर त्याच्या हेरगिरीबद्दल समजलें तर त्याला फाशीच देतील.

पण पालनें माझें ऐकले नाही. "या गोष्टी तुला समजणार नाहीत." तो म्हणाला व त्याने आपली बदूक काढली. त्या माणसाला आपल्या बंदुकीच्या धाकाखाली तो घेऊन गेला.

या वेळीदेखील पालचेंच वागणें बरोबर ठरले. गुप्त पोलीस खात्याने त्याला पालची परीक्षा पाहण्यासाठी पाठवले होते. दुसऱ्याच दिवशी तो गणवेषांत आला आणि पालच्या प्रामाणिकपणाबद्दल त्याने त्याची स्तुति केली.

माणसानें असल्या नीचपणाशी कसली बरोबरी करायची? मानवी मूल्याचा सपूर्णपणें अभाव असलेल्या एखाद्या नरकात आपण राहतोय असें मला कधी कधी वाटायचे.

एक दिवस पहाटें पांच वाजताच दारावरची घंटा खणखणली. पोलीस खात्याचाच कोणी तरी माणूस असणार असें आम्हाला वाटले. उघडून पाहिले तर पालच्या एका जवळच्या मित्राची पत्नी रडत उभी होती.

तिच्या नवऱ्याने दारूच्या धुंदीत कम्युनिस्ट सरकारला आणि रशियाला भरपूर शिव्या दिल्या होत्या. थोड्याच वेळात पोलिसानी त्याला पकडून नेले होतें.

डोळ्यांत पाणी आणून तिनें आपल्या पतीला तुरुंगांतून सोडवून आणण्यासाठी पालला विनंती केली. पालने आपल्याला जें शक्य आहे तें सर्व कांही आपण करूं असें तिला आश्वासन दिले.

गेल्यावर थोड्याच वेळात तिने फोन केला व आपला नवरा घरी आल्याचे आम्हाला सागितले. ही बातमी ऐकून पाल मात्र चिंतातुर झाला. बराच वेळ तो विचार करीत बसला.

शेवटी मी त्याला विचारले "या भानगडीतून तुझा मित्र सहीसलामत सुटला याचा तुला आनंद नाही का झाला?"

"नाही" तो कटुपणे म्हणाला, "कम्युनिस्ट कोणालाच इतक्या सहजपणे व पटकन् सोडून देत नाहीत. माझ्यावर नजर ठेवण्यासाठी निश्चितच त्याला हुकूम मिळाले असले पाहिजेत. कारण त्याना माहीत आहे की याच एका मित्राला मी नियमीतपणे भेटतों.

"नाही, असें असणे शक्य नाही," मी म्हणाले, "असें वाईट साईट बोलू नकोस."

"मारिया, माझ्यावर विश्वास ठेव. मी कम्युनिस्टाच्या पद्धती पूर्णपणें ओळखून आहे."

आणि या वेळीसुद्धा पालचें म्हणणेंच खरे ठरले! कारण या घटनेनतर तें जोडपें एकदम वेगळें वागायला लागले. ते कोणाशी बोलेनात व गंभीरपणें वागायला लागले. आमचे मित्रत्वाचे संबंध दुरावले.

## इकडे आड तिकडे विहीर

एकतर मी कम्युनिस्ट व्हावे किंवा पालने घटस्फोट घ्यावा असें पालवर दडपण येऊ लागले. त्यामुळें आमच्या वैवाहिक जीवनावर फार ताण पडू लागला. कम्युनिस्ट तत्त्वज्ञानानुसार जो कोणी आपल्या घरातील मडळीना कम्युनिस्ट करूं शकत नाही, तो सच्चा कम्युनिस्ट नव्हे. अशा लोकाना ते टोचून बोलत व तो आपल्या हाताखालच्या लोकाना शिकवायला नालायक समजण्यात येई.

मध्येंच कधीतरी पाल त्या दृष्टीने प्रयत्न करी पण त्यामध्यें

त्याला कधीच यश आले नाही. यामुळें जें नैराश्य व दुजा भाव निर्माण झाला तो आम्हाला एकमेकापासून दूर नेई. जेवणाच्या वेळचा तो प्रसंग मला अजून आठवतो. बटाटे थोडे कच्चे राहिले होते व एवढयाश्या कारणावरून पाल माझ्यावर सारखा ओरडत होता.

**स्फोट झालाच !**

आमचे संबंध बिघडत चालले व शेवटी असह्य झाले. ते तोडायला पुढील कारण पुरेसें झाले एक दिवस संध्याकाळी पाल मला कम्युनिस्ट विचारसरणी पटविण्याचा प्रयत्न करीत होता. मला ते काही सहन होईना व मी एकदम ओक्साबोक्शीं रडू लागले. "या बाबतीत मी कधीच तुझ्या पावलावर पाऊल टाकणार नाही." मी ओरडले, "असल्या खोटया कल्पना घेऊन तू जेव्हां घरी येतोस तेव्हां मला तुझा अगदी तिटकारा येतो मी गुदमरते कीं काय असे मला वाटतें."

स्टोव्हला टेकून मी शून्य मनाने उभी राहिले. माझ्या डोळयातून द्वेष व राग ओसडत होता. "मला हे सर्व असह्य झालय. मला एकटीला सोड." अखेर मी सांगून टाकले.

पालचा पाराहि चढला. "तुला माझं तोडहि पाहवत नाही काय? बरं आहे. मग मीच इथून निघून जातो."

त्याच दिवशी तो बंगल्याच्या दुसऱ्या स्वतंत्र खोलीत राहायला गेला. सर्व जग कोसळतें की काय असें मला वाटले.

नंतर थोडयाच दिवसात मी कामावर गेलेली असताना पाल ते घर सोडून निघून गेला. त्यानें आपल्या नवीन घराचा पत्ताहि मागें ठेवून दिला नव्हता.

माझ्या आयुष्यातील अत्यंत वाईट काळाला आता सुरुवात झाली. १९५३ च्या वसंत ऋतूत माझी वृद्ध आई आजारी होती व त्यामुळें ती मुलाचा सभाळ करू शकत नव्हती. मला नोकरी सोडणे शक्य नसल्यामुळें मी दोन्ही मुलीना बोर्डिंगमध्यें ठेवले. आम्ही वेगळे झालों असलों तरी मुलांना त्याचा त्रास होऊ नये म्हणून पालने त्यांना सैनिकाच्या मुलाकरिता असलेल्या गृहात ठेवले. एक दिवस टेलिफोन करून त्याने हेहि स्पष्ट केले की वेगळें होण्याचा निर्णय अजून निर्णायक नव्हता. दर रविवारी तो मुलाना घेऊन येई व मग जेवायला थाबे.

एक मंगळवारी मला संस्थेकडून फोन आला की माझ्या दोन्ही मुलीना ताप आलाय व मी त्याना घेऊन जावें. मी त्याना आणायला गेले असताना मला जें दिसले तें अत्यंत सतापजनक व विस्मयकारक होते आजारी असलेल्या व आजारी नसलेल्या दोन्ही प्रकारच्या मुलाना एकत्र आंघोळ घातली जात होती. हा बेजबाबदारपणा मला असह्य झाला व मुलाना कितीहि गैरसोय झाली तरीहि घरीच वाढवायचे असे मी ठरवले.

या काळात पालचे वागणे अतिशय लहरी होतें. काही दिवस दर रविवारी तो जेवायला येत असे व दररोज फोनवरून प्रेमाचे चार शब्द बोलत असे. कधीकधी तो फोनवरून मला दुरुत्तरे द्यायचा. पुढेंपुढे तो मला प्रत्येक तासाला फोनवरून मुलाना घेऊन जाण्याची धमकी देऊ लागला. माझ्यावर खोटेनाटे आरोप करू लागला. शेवटी मी अगदी कटाळले.

**खाजगी जीवनांत हस्तक्षेप**

एक दिवस मला संरक्षणखात्याचे बोलावणे आले. एका ऑफिसरच्या खोलीत मला नेण्यात आले व त्याने मला काहीही न विचारता आमच्या लग्नाबद्दल बोलण्यास सुरुवात केली. जणू काय आमचं लग्न हा सरकारचाच प्रश्न होता. माझा जन्म कोठें झाला, माझी कोण माणसें आहेत, माझे सध्याचे मित्र कोण आहेत, माझ्या नवऱ्याच्या कामाबद्दल माझें काय मत आहे व शेवटी मी मार्क्सच्या तत्त्वाचा अभ्यास केला आहे की नाही वगैरे प्रश्न मला विचारण्यात आले.

माझी वागणूक काय आहे व माझ्या मनाची एकदर बैठक काय हे समजून घेण्याकरिता त्या अधिकाऱ्याने कित्येक तास प्रयत्न केला. मग त्यानें सरळच मला पार्टीची भूमिका स्पष्ट केली. मी माझ्या पतीच्या कामात व्यत्यय आणीत आहे असे त्याचें मत होते व राजकीय दृष्टया जर मी सुधारले तरच मला पालबरोबर वैवाहिक जीवन जगता येईल असे मला सागण्यात आले.

शेवटी तो म्हणाला, "पालचं जीवन इतकं अस्थिर झालय की आम्हाला ते पाहवत नाही. कम्युनिस्ट कर्नल अशा रीतीने राहू शकत नाही. एक तर त्यानें पूर्वीचेंच वैवाहिक जीवन सुरू करावें किंवा परत दुसरे लग्न करावें ! आणि जर मी पालशी मिळतेजुळते घेतले नाहीं तर पार्टीला त्याच्यासाठी दुसरी एखादी विश्वासार्ह (Reliable) बायको शोधावी लागेल.

यानतर अनेक वेळा मला तपासणीसाठी बोलावण्यात आले. यानतर एकाएकी ही बोलावणी थाबली व त्याबरोबरच पालची आठवडयातली भेटसुद्धा ! पार्टीने त्याच्यासाठी दुसरी स्त्री शोधून काढली होती कीं काय ?

माझ्या या दु:खी मन:स्थितीत मला वाटायचें की कदाचित् पालचे कम्युनिझम संबंधीचे विचार बरोबर असतील. या बाबतीत खोलवर विचार न केल्यामुळें कदाचित् मला ते समजत नसतील. कदाचित् माझी मते जुनाट असतील व झपाटयाने होणारे हे नवीन बदल मला कळत नसतील.

मी यासाठी कम्युनिझमचा अभ्यास करायचें ठरवले. आठवडयातून दोनदा होणाऱ्या सेमिनारलादेखील मी हजर राहू लागले.

मी लक्षपूर्वक ऐकू लागले. डायलेक्टिक मटिरिअॅलिझम म्हणजे काय हे मी शिकले. पण मी अनुभवले होते ते असे. एकच मनुष्य आज देशभक्त आणि उद्यां देशद्रोही बनू शकतो हें मी पाहिले होते.

ही सेनिमार दोन महिने चालली. पण ते मला फार झाले. मी जे काहीं शिकले त्याने घृणाच उत्पन्न झाली. मला एवढेंच समजले की हे क्लिष्ट सिद्धान्त माझ्याकरितां नाहीत त्याचे आणि आपले काही जमायचे नाही !

मला आता जीवनात कसलीच आशा उरली नव्हती. सुट्टीचे दिवस घालविण्यासाठी मी मात्रा या पर्वतावर असलेल्या थंड हवेच्या ठिकाणी गेले. आमचें लग्न झाल्यावर मी व पाल तेथें गेलो होतो. आमचे सर्वच सुटीचे दिवस आम्ही त्या ठिकाणी मजेंत घालविले होते. सुखी भूतकाळाच्या आठवणीत आता माझे हे रजेचे दिवस मी घालविणार होते.

मी मात्राला आल्याबरोबर मला एक अत्यत अस्वस्थ करणारे पत्र मिळाले. पालच्या वकिलाने तें पाठविले होतें. पीपल्स डेमॉ-

ऋसीच्या अपेक्षेप्रमाणें मी माझ्या मुलांना वाढवीत नसल्यामुळें माझ्या विरुद्ध घटस्फोटाची कारवाई सुरू केल्याची सूचना त्यामध्यें होती व मुले माझ्याजवळून लौकरच नेण्यात येतील असा इशाराहि त्यात होता.

खरोखर मनुष्य इतका क्रूर कसा बनू शकतो ? पाईन झाडाच्या प्रेमळ सान्निध्यात मला कदाचित् बरें वाटेल. मनाला शातता मिळेल म्हणून मी इथे आले होते. ह्याच झाडामधून नवविवाहित अवस्थेंत मी व पाल भटकलो होतो. मी भरपूर रडले दुसऱ्या दिवशी सकाळी मला टेलिफोन आला. तो पालचा होता. "माझ्या वकिलाचे पत्र तुला मिळाले काय ?" 'होय' मी उत्तर दिले. "तू त्याकडे लक्ष देऊं नकोस. मारिया, मी तुला भेटायला येतोंय मला तुझ्याशी बोलायचय." पालचा आवाज लगेच बंद झाला.

तो लगेच आला. आल्याबरोबर त्याने ते वकिलाचे पत्र फाडून टाकले. "मारिया, माफ कर! माझ्यावर रागावू नकोस. तुला दुखविण्याची माझी मुळीच इच्छा नाही" पालने मला समजावले. मग आम्ही बराच वेळ बोलत बसलो. अजूनहि माझें पालवर फार प्रेम होते मला व पालला सुखाने जे एकत्र राहू देत नव्हते त्यात त्याचा काय हेतु असावा ?

**घटस्फोट**

आपण एकत्र राहण्याचा परत एकदा प्रयत्न करायचा असें आम्ही या भेटीत ठरविले. आम्ही मोठी जागा घेण्याचे ठरविले म्हणजे माझी आई व मुले यानासुद्धा भरपूर जागा मिळेल व त्यात ते आनदाने राहतील. नतरचे काही आठवडे चागला फ्लॅट शोधण्यात गेले. जागा मिळाली परतु आम्ही राहावयास जाणार इतक्यात एक घटना घडली.

कम्युनिस्टानी माझ्या आईला आमच्याबरोबर राहू देण्यास हरकत घेतली. ती प्रतिगामी असल्यामुळें मला कम्युनिझमला कवटाळण्यापासून परावृत्त करीत आहे असे पार्टीच्या सेक्रेटरीचे मत पडले.

आईला वृद्ध व आजारी अवस्थेंत मी सोडू शकत नव्हते. पाल पार्टीला विरोध करू शकत नव्हता. अर्थातच आम्हाला परत एकत्र राहणे शक्यच नव्हते.

यानतर सहा आठवडे मी पालला भेटलेंच नाही. ख्रिसमसच्या दिवशी तो आमच्याकडे आला व जवळजवळ सपूर्ण दिवस तो आमच्याकडेच होता.

ते वर्ष आम्हाला फारच त्रासदायक गेलें. दुःखाच्या त्या सहारात ख्रिसमसचा दिवस म्हणजेच एक दिलासा देणारा पाण-ओघळ होता.

जाण्यापूर्वी परत एकदा त्याने विनवून सागितलें की आपले तुटलेले साचे जोडण्याचा आपण एक प्राजळ प्रयत्न करू या. पार्टीच्या मताशी होणारे आपले मतभेद आपण सोडविण्याचा काही मार्ग आपण काढलाच पाहिजे.

मी त्याला प्रयत्न करण्याचे आश्वासन दिलें. दोनच दिवसानी पालचा फोन आला व हें सर्व विसरून जाण्यास त्याने मला सागितले. माझी मतें प्रतिगामी असल्यामुळें आपण कधीच एकत्र राहू शकणार नाही असे त्याने सागितले. अत्यत भावनाशून्यतेने तो बोलत होता.

१९५४ च्या वसत ऋतूत अखेर आम्ही घटस्फोट घेतला आमची फिर्याद मुलकी कोर्टापुढें आली या कोर्टांत अजून कम्युनिस्टाचा शिरकाव झाला नव्हता. त्यामुळें ते निःपक्षपाती होते. पालला दोषी ठरविण्यात आले व सर्व खर्च (माझ्या वकिलाची फीसुद्धां) त्यानें भरावा असा हुकूम कोर्टाने केला. दोन्ही मुली माझ्याजवळ राहाव्यात व पालच्या पगाराच्या चाळीस टक्के भाग मला पोटगी म्हणून मिळावा असा निर्णय देण्यात आला. पॉलनें पालजवळच राहावे असे आम्ही अगोदरच ठरविले होते. हगेरीतील कोर्ट नाहीतरी थोरल्या मुलाची जबाबदारी वडिलावरच टाकतात.

पाल पॉलला नेण्याकरिता आला तेव्हा मी कामावर गेले होते. एखाद्याला पळवून न्यावे अशा घाईने पॉलला पाल घेऊन गेला. अंगावरच्या कपड्याखेरीज दुसरे कपडेसुद्धा त्याला त्याने घेऊ दिले नाहीत व आपण पॉलला कोठे घेऊन जाणार आहोत; हेंसुद्धा त्याने सागितले नाही.

मुलाला त्याचे सगळे कपडे तरी मिळावेत अशा विचाराने मी पालला फोन केला पण मला त्याच्याशी बोलू देण्यात आलें नाही. मग मी सर्व अनाथगृहें व इस्पितळें पालथी घातली. आठवड्यानंतर पॉल हरवलेल्या व अनाथ मुलाकरितां तात्पुरते बाधलेल्या गाळचात आहे असें मला समजलें.

मला पाहिल्यावर तर त्याला रडूच कोसळले. आपल्याला दुसऱ्या कोणी रडताना पाहू नये म्हणून त्याने आपला चेहरा लपविला. केवळ आठ वर्षें वयाच्या मुलाला केवढी समज होती! तेथील एका अधिकाऱ्याने आम्हाला सागितले की कोणालाहि पॉलला भेटू द्यायचे नाही अशा आम्हाला सक्त आज्ञा आहेत. अत्यत हृदयशून्य व अविचारी असा हा नियम होता. मी परत गार्डियन्स कोर्टाकडे अर्ज दाखल केला.

कोर्टापुढें पालने आपली बाजू कठोर शब्दात माडली. आईच्या प्रतिगामी मताच्या परिणामापासून दूर नेण्याकरिता त्या गाळचात मी पॉलला ठेवले; असे पालने प्रतिपादन केले. आईला मुलाला भेटायला बदी केली पाहिजे असा त्याने आग्रह धरला. परतु न्यायाधिकाऱ्यानी त्याचें म्हणणे अमान्य केले व मला माझ्या लाडक्या मुलाला अधूनमधून भेटायला परवानगी मिळाली.

दुसऱ्याच दिवशी पालने मला फोन केला. त्याच्या कालच्या एकंदर वागण्याच्या उलट अशी आज त्याची वागणूक होती. तो सौम्य शब्दात बोलत होता. पार्टीला खुश करण्याकरिता काल उग्र स्वरूप त्यानें धारण केले असल्यास नकळे! तो म्हणाला, "तूच पॉलचा सभाळ कर." माझ्या मनावरचे ओझें मला उतरल्यासारखें वाटले. माझा पॉल मला परत मिळाला.

**छळाला सुरुवात**

आम्ही घटस्फोट घेतल्यानंतर पार्टीची माझ्यावर सक्त नजर होती. पहिल्यादा एक तरुण स्त्री व तिचे नुकतेच जन्मलेलें मूल याना आमच्या तीन खोल्याच्या जागेंत राहण्यासाठी पार्टीने ठेवले. लौकरच मला शेजाऱ्यांकडून समजले की ती वेश्या आहे व मी कामावर गेल्यावर तिच्याकडे सैनिक येतात. नतर मला संरक्षणखात्याकडून हुकूम आला, की सहा जणाच्या एका कुटुबाला आमच्या खोलीत जागा द्यावी. या हुकुमाविरुद्ध वागण्यात धोका आहे असे मला माझ्या मित्रमडळीनी सांगितले. तरीसुद्धा मी संरक्षण खात्याला पत्राने कळविले की तीन लहान खोल्यात तेरा माणसांनी राहणें अशक्य आहे. शिवाय त्यांत आठ लहान मुले व एक वृद्ध आजारी स्त्री! 'अशा तऱ्हेची गर्दी पीपल्स डेमॉक्रसी आरोग्यकारक व सामाजिक दृष्टीने

योग्य समजते काय ?' असाहि प्रश्न मीं त्यांत विचारला होता.

हया कडक पत्राचा परिणाम झाला. तो नवीन हुकूम संरक्षण खात्यानें मागें घेतला. नंतर शेजाऱ्यांकडून मीं लेखी पुरावा घेतला व त्या वेश्येला घराबाहेर काढण्यांत यश मिळविलें. तिच्या जागी एक वयस्क कुटुंब आमच्या खोलींत आलें.

घटस्फोटामुळें माझ्या नोकरींतदेखील बदल झाला. बुडापेस्ट मधील सर्वांत मोठ्या फोटोस्टुडिओंत मी काम करीत होतें. हा स्टुडिओ सरकारच्या ताब्यांत होता. उत्तम काम करणारी म्हणून माझा पूर्वी लौकिक होता. मीं काढलेल्या फोटोंना अनेक वेळां प्रदर्शनांत बक्षिसेंदेखील मिळालीं होतीं. घटस्फोटानंतर हें सर्व बदललें. कम्युनिस्ट अधिकाधिक काम टाकूं लागले. मला कधीहि त्याबद्दल उत्तेजनाचा एक शब्दहि मिळाला नाहीं. उलट इतरांना पगारवाढ मिळाली तरी माझ्याकडे मात्र कानाडोळा करण्यांत आला. माझ्या 'उद्धट वागणुकी' बद्दल मला बोलणीं खावीं लागलीं.

पालच्या नोकरींतसुद्धां घटस्फोटानें बदल घडवून आणला; पण तो नेमका दुसऱ्या दिशेनें !

सरकार आर्मीतील अधिकाऱ्यांना अनेकदां दोन पगार देई. एक नेहमींचा पगार व दुसरा राजकीय ध्येयनिष्ठतेबद्दल बोनस म्हणून. या पद्धतीमुळें चांगला कम्युनिस्ट म्हणून समजल्या जाणाऱ्या लेफ्टनंटला मेजरपेक्षांहि जास्त पगार मिळे. पालला आतां असा बोनस मिळाला. माझ्यापासून त्याची सुटका झाल्यामुळें पार्टी त्याच्यावर अगदीं खुश झाली होती.

त्या वर्षीच्या उन्हाळ्यांत माझ्या आईची तब्येत एकदम गंभीर झाली व १९५४ मध्यें ख्रिसमसच्या कांहीं दिवस आधीं माझ्या बहिणीनें तिला सोप्रान येथें नेलें.

आतां मी अगदीं एकटी होतें. दिवसां मुलांकडे पाहायला कोणीच नव्हतें. सर्वांत धाकटी मुलगी जुडिका किंडरगार्टनमध्यें होती. मारिका पहिल्या इयत्तेंत व पॉल तिसरींत होता. आळीपाळीनें येणाऱ्या दर आठवड्याला मला ऑफिसमध्यें उशिरांपर्यंत बसावें लागे. मुलें शाळेंतून घरीं पांच वाजतांच यायचीं व सात वाजेपर्यंत तीं घराबाहेर खेळायचीं.

मी जेवण अगोदरच करून ठेवून द्यायची. तें गरम करून मुलें जेवायचीं व झोपीं जायचीं. मला यायला कधीं साडेनऊदेखील व्हायचे. तोंपर्यंत मुलें पूर्णपणें झोपेच्या आधीन झालेलीं असायचीं. तिन्ही मुलें फारच समजूतदार होतीं.

लहान मुलांना आजार हा असणारच. शाळेंतून सर्दी, पडसं यांसारखी लहानसहान दुखणीं तीं नेहमीं आणायचीं. पॉलला कानाला कांहींतरी झालें होतें. पण तो एकटा डॉक्टरांकडे गेला.

एक दिवस तें वयस्क जोडपें मला म्हणालें, कीं 'त्यांनीं रात्रीं पॉलला रडतांना ऐकलें. कदाचित् त्याला कांहींतरी होत असावें. पाहतें तों पॉलला ताप भरला होता व कान ठणकत असल्यानें तो डोकेंदेखील हलवूं शकत नव्हता. "मला रात्रीं तूं कां उठवलें नाहींस ?" मीं पॉलला विचारलें "ममी" पॉल म्हणाला, "तूं दिवसभर काम करून थकतेस मग तुझ्या झोपेंत मी व्यत्यय कसा आणूं ?" त्याचें हें उत्तर ऐकून मला रडूंच कोसळलें.



घटस्फोट घेतला तरी
पालचा अभिमान बाळगणारें मॅलेटर कुटुंब

## माझें आजारपण

शेवटीं ज्या गोष्टीला मी सर्वांत घाबरत होतें, ती घडली. मी आजारी पडलें. मला हॉस्पिटलमध्यें जावें लागलें. शारीरिक व मानसिक त्रासामुळें हें झालें आहे असें मला सांगण्यांत आलें. बरें वाटावें म्हणून दोन आठवडे मीं औषधपाणी घेतलें. त्या काळांत माझीं मुलें एकटींच राहिलीं. दिवसां कोणीतरी मुलांकडे पाहत; पण रात्रीं तीं ब्लॉकमध्यें शेजाऱ्यांकडे राहत. आमच्याकडे त्या वेळीं पुरेसें इंधनदेखील नव्हतें. थंडी फार असायची. सर्व कपडे घालून झोपावें लागे. पण मुलांनीं कधीं कुरकूर केली नाहीं कीं तीं रडलीं नाहींत. मी परत आलें तेव्हां माझ्या आगमनाची तीं आतुरतेनें वाटच पाहत होतीं.

अशीं गुणी मुलें असल्यामुळें मला त्यांचा कधींच भार असा वाटला नाहीं. उलट माझ्या धैर्याचीं व शक्तीचीं तीं उगमस्थानेंच होतीं.

घटस्फोट घेतल्यानंतर आम्ही अडीच वर्षे बुडापेस्टमध्यें होतों. त्या काळांत माझा घटस्फोटित नवरा एकदांच आम्हांला भेटायला आला. त्यानें लौकरच दुसरें लग्न केल्याचें आम्हांला समजलें आणि एकदां मी कामावर गेलेली असतांना तो व त्याची पार्टीनें पुरस्कार केलेली पत्नी कांहीं मिनिटें आमच्या ब्लॉकवर येऊन गेलीं.

एकदां जुडी हॉस्पिटलमध्यें फार आजारी असतांना मीं पालला तिला भेटून जाण्यासाठीं निरोप पाठविला. कारण जुडी "डॅडी, डॅडी" असा सारखा जप करीत होती. पॉल्सुद्धां फार आजारी असतांना त्यानें डॅडीची आठवण काढल्यामुळें मीं पालला बोलावलें. पण त्यानें साधें आमचा निरोप पोंचल्याचेंदेखील आम्हांला कधीं कळवलें नाहीं. पालची सख्खी बहीणदेखील त्याला भेटूं शकत नव्हती. बहुधा त्यानें आपल्या सर्व जुन्या आप्तांशीं संबंध तोडून टाकले असावेत !

## अखेरचें संभाषण

१९५५ मध्यें ख्रिसमसच्या कांहीं दिवस अगोदर पालनें मला स्टुडिओंत फोन केला. त्याच्याशीं तें माझें शेवटचेंच संभाषण. या वेळीं मला तो पूर्वींचाच पाल वाटला. माझी आई नुकतीच वारली होती. मीं हें जेव्हां त्याला सांगितलें तेव्हां त्याला अगदीं पोरक्यासारखें

वाटलें. " तूं मला हे अगोदर का कळविले नाहीस? " त्यानें विचारले. पण तो काही मदत करूं शकला असता का? मग त्याला एकदम त्याने फोन का केला याचें कारण आठवले. त्याला मला काहीतरी फार महत्त्वाचे सागायचें होते व त्यासाठी मला भेटायचे होते.

मी त्याला भेटायला नकार दिला. जुन्या जखमावरील खपली आतां मला काढायची नव्हती. त्याला मुलाना भेटण्याची मी व्यवस्था केली. आम्ही बोलत असताना पालबद्दलचें माझें प्रेम एकदम उफाळून आले. त्याचा आवाज ऐकल्याबरोबर त्याच्याबद्दलचा तिरस्कार व राग कोठच्या कोठें पळाला. मी ओळखले की काहीहि झालें तरी तो विशिष्ट आवाज माझ्या मनांत सदैव घोळत राहील.

मी पालचा फोनवर निरोप घेतला. तेव्हा स्टूडिओतील सर्वजण माझ्याकडे उत्कठेनें पाहत होते. रिसीव्हर ज्या हातात होता तो हात इतका थरथर कापत होता की मी जेमतेम रिसीव्हर नीट ठेवू शकले.

वडिलाना भेटायला मिळणार म्हणून मुले खुश झाली. ती लवकर उठून तयार झाली. त्या दिवशी मला स्टूडिओंत जायचे होतें. खिडकीशी उमें राहून त्यानी पालची वाट पाहिली! पण व्यर्थ! पाल आलाच नाही.

नंतर ११ महिने आम्हाला त्याच्याबद्दल काहीच समजले नाहीं. सबंध हंगेरीत रशियाविरुद्ध क्रातीचा डोब उसळेपर्यंत काहीच समजले नाही.

### ठिणगी पडली पण !

२३ ऑक्टोबर १९५६ हा दिवस उजाडला ! सध्याकाळी ५ वाजतां काम संपवून मी बस पकडण्याकरिता स्टॉपवर आले पण बस व ट्राम काहीच येईना. शुकशुकाट झाला होता ! जिकडेतिकडे फक्त निदर्शक दिसत होते त्यात तरुणांचाच भरणा अधिक होता. त्याच्या हातात फलक होते व त्यावर 'We want a free Hungery' (आम्हाला स्वतत्र हगेरी हवा) असे दाटीदाटीने लिहिले होते. हगेरीचे झेंडेदेखील त्याच्या हातांत होते. मात्र त्यावरील कम्युनिस्ट चिन्ह काढून टाकलेले होते. ते मधूनमधून देशभक्तीपर गीते गात होते व Out with Russians ! Russians go home !" (रशियनाना हुसका ! रशियनानो घरी जा ! ) अशी घोषणा ते करीत होते. त्यांचा उत्साह दाडगा दिसत होता.

ते दृश्य पाहून मी स्तिमित झाले. घरातील जबाबदाऱ्या व ऑफिसचें काम यात मी इतकी गुगून गेलें होते, की देशातील घुमसणाऱ्या क्रातीकडे माझें लक्षच गेले नव्हते. पोलडमध्यें झालेल्या क्रातीमुळें हगेरीतील विद्यार्थी वर्गांत जी अस्वस्थता निर्माण झाली होती तीवद्दल मला काहीच ठाऊक नव्हते. सोव्हिएट दडपशाहीला याच सुमारास पोलंडमध्यें चागलाच तडाखा मिळाला होता.

त्या गर्दीतून माझ्याजवळून एक लॉरी गेली. तीत आमच्या स्टूडिओंतील एक फोटोग्राफर होता. " हॅलो मिसेस मालेटर," तो ओरडला, " काय होतं आहे पाहतां ना ? "

" काय होतंय ? " मीं मोठ्यानें विचारले.

" देशात क्राति सुरू झाली आहे " उत्साहाने ओरडत असताना तो दृष्टिआड झाला. मला वाटले, हा वेड्यासारखेंच काहीतरी बोलतोय. त्या रात्रीं दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. त्या म्हणजे (Erno Gero) गेरो या कम्युनिस्ट पार्टीच्या क्रमाक एकच्या चिटणिसाने रेडियोवर भाषण करून सर्व देशप्रेमी तरुणाना देशद्रोही ठरविलें व कोणत्याहि सुधारणा करण्याचे नाकारले. दुसरी गोष्ट म्हणजे निदर्शकांनी अशी मागणी केली की त्याच्या मागण्या रेडियोवर जाहीर करण्यात याव्यात. तेव्हा सरकारने त्याची मागणी झिडकारली व जमाव पागवण्यासाठी अश्रुधूर वापरला. खिडकीतून व घराच्या छपरातून गोळीबार केला. काही निदर्शकानी मग पार्टीच्या लोकाच्या हातांतली शस्त्रें ओढून घेतली व प्रतिहल्ला केला. लढ्याला असे तोड लागलें.

रात्रभर आम्हाला अधूनमधून बदुकीचे आवाज ऐकू येत असत. आमच्या खिडकीतून मी पाहिले. तीन लॉऱ्या आल्या व त्यातून अनेक तरुण बदुकी व दारूगोळा घेऊन खाली उतरले. ते आवेशपूर्ण आवाजात देशभक्तिपर गीते गात होते. देशाच्या आत्म्याच्या मुक्तीसाठी लढणाऱ्या या देशभक्ताचा उठाव वेगाने पसरत जाऊ लागला.

नतरच्या काही दिवसात वेगाने घटना घडत गेल्या या उठावाचे स्वरूप स्पष्ट झाल्यावर लोकात एकच समाधान पसरले. लोक आनदी झाले कारण संपूर्ण हंगेरी उठून उभा होत होता.

धोका असूनदेखील लोक रस्त्यात गर्दी करून उभे राहत. पुरुष, स्त्रिया, इतकेच काय पण मुलेसुद्धा गोळीबार होणार असें वाटले की उलथलेल्या ट्रामच्या मागें अथवा आडोशाला भुईसपाट झोंपत. सोव्हिएट टॅक्स् आले की पळापळ होई पुन्हा माणसें रस्त्यावर येत. बुधवारी लढा सुरू झाला आहे हे कळताच औद्योगिक वस्तीतील कामगारानी लगेच लॉऱ्या आपल्या ताब्यात घेतल्या. मिलिटरी स्टोअर्समधून व पोलिसाकडून शस्त्रें हिसकावून ते ह्या लढ्यात सामील झाले. हे सर्व कामगार कट्टर कम्युनिस्ट समजले जात असत. पण तेदेखील त्वेषाने लढ्यात उतरले. क्रातीचा एक मजबूत आधारस्तभच झाले. एक A. V. O. सघटना सोडली तर सैनिकानी व पोलिसानी आपली निष्ठा देशभक्ताच्या बाजूनेच ठेवली. स्वातत्र्यसैनिकावर गोळीबार करण्याचा जेव्हा त्याना हुकूम झाला तेव्हा त्यानी स्पष्ट नकार दिला. आपली शस्त्रास्त्रें त्यानी क्रातिकारकाच्या हातात दिली किंवा ते स्वत:च त्यात सामील झाले.

### मालेटर उभा ठाकला

जेरो सरकारने पाच रणगाडे घेऊन ज्या कर्नलला किलियन बरॅक्समधील क्राति दडपून टाकण्यासाठी पाठवले त्या कर्नलने सैनिकाबरोबर बोलणी केली व नतर सरक्षण खात्याला फोन करून तो स्वत:च रणगाड्यासहित क्रातिकारकाना सामील झाल्याचे कळविले.

दुसऱ्याच दिवशी ही बातमी सर्वांना समजली. लोक त्याच्या शौर्याविषयी बोलत होते. तो कोण आहे ? त्याचे नाव काय ? याविषयी सर्वांनाच उत्सुकता होती. हे सर्व ऐकताना माझ्या हृदयाचे ठोके जलद पडू लागले. अभिमानाने माझें शरीर पुलकित झाले. कारण, माझी पूर्ण खात्री होती की हा कर्नल दुसरातिसरा कोणी नसून पाल मालेटरच असणार ! तो पालच होता.

सबध बूडापेस्टमध्यें पालच्या नावाचा जयजयकार सुरू झाला. त्याची कीर्ति दिवसेंदिवस वाढू लागली. माझी व माझ्या मुलाचीसुद्धा त्याबरोबर प्रसिद्धि होत होती. मित्र व आप्तेष्ट फोनवरून सारखे अभिनदन करीत होते.

मुले फारच बावरून गेली होती. पालचे खरे स्वरूप प्रकट झाले -

म्हणून मला मात्र समाधान होत होतें.

आता हे स्पष्ट झाले की आयुष्यात आम्ही झगडलो पण हा झगडा व्यर्थ नव्हता. मी पालवर ठेवलेल्या विश्वासाचे सार्थक झाले होतें. इतक्या वर्षांच्या स्वत:च्या अंतर्मनाशी चाललेल्या झगड्यानतर पालला स्वत.ची ओळख अखेर पटली होती.

अवघ्या एक आठवड्याच्या लढ्यानतरच क्राति जवळजवळ यशस्वी झाल्यासारखी दिसत होती. किलटन बरॅक्सवर दोन हजार रशियनांनी हल्ला चढविला. आतील सैनिकानी अत्यत शौर्यानें लढा दिला. हल्ला करणाऱ्या रशियनाना स्वातत्र्यसैनिकानी चागलीच झुज दिली. मात्र जीवितहानि यात फार झाली. शेवटी रशियनानी आपले रणगाडे व सैन्य बूडापेस्टमधून काढून घेतले. आपण सर्व सैन्य हंगेरीतून काढून घेण्यासबधी बोलणी करण्यास तयार असल्याचे त्यानी जाहीर केले. विजयाचा सुवास वातावरणात दरवळत होता.

### औट घटकेचें राज्य

इम्रेनाजीच्या नेतृत्वाखाली स्वतत्र सरकार स्थापन करण्यात आले. त्याने बऱ्याच सुधारणा करण्याचें आश्वासन दिलें. राजकीय कैदी AVO च्या जुलुमातून मुक्त करून सोडून देण्यात आले. AVO ही संस्थाच नष्ट करण्यात आली. जनतेला भाषणस्वातंत्र्य मिळाले. परिस्थिति सुधारल्यावर निवडणुकी मोकळ्या वातावरणात घेण्यात येतील असें आश्वासन देण्यात आले. हें नवीन सरकार फारच लोकप्रिय झाले. पाल मालेटर संरक्षणमत्री झाला !

भवितव्य मोठें उज्ज्वल दिसत होतें. आता आपल्याला सुखी जीवन जगता येईल असें हंगेरियन जनतेला वाटले खरेच ! ही भावनाच किती सुखदायक होती ! अकरा वर्षांच्या दडपशाहीनंतर, देशावर लादलेला कम्युनिझम एखाद्या वाईट स्वप्नाप्रमाणें अदृश्य होत होता. १ नोव्हेंबरला जनरल मालेटरने रेडिओवरून देशाला उद्देशून भाषण केले. मुलानी ते ऐकलें व ती आनदाने नाचायलाच लागली. पॉलने पालला पत्र पाठवायचे ठरविले.

दोनच दिवसानी पॉलनें तें पत्र मला दाखवले. मी जवळजवळ घाबरलेंच ते वाचून ! मालेटर कुटुबातील प्रेम व कठोरपणा याचे ते पत्र म्हणजे एक मनोहर मिश्रण होते. दहा वर्षांचा पॉल मालेटर घराण्याचा प्रमुख म्हणून त्यातून बोलत होता.

प्रिय डॅडी,

आम्हाला तुमचा फार अभिमान वाटतो. तुम्ही शूर आहात व आमच्यासाठीं लढत आहात. आम्हाला भेटायला तुम्ही आलां नाहीत म्हणून आम्ही रडलो पण आमचे अजूनहि तुमच्यावर फार प्रेम आहे.

आई आजारी असताना व आम्ही घरात एकटे असताना तुम्ही कोठें होता ?

तुम्हाला रेडियोवरून बोलतांना आम्ही ऐकलें.

तुमचा लाडका,
पॉल

दुर्दैवानें पालला हे पत्र कधीच मिळाले नाही. मी पत्र वाचून संपवितें इतक्यांत दारावरची घटा वाजली. दारांत पालचा एक स्नेही व ऑफिसर बधु पाहून माझा डोळ्यावर विश्वासच बसेना. 'मारिया' तो म्हणाला, 'मी पालकडून तुझ्याकरितां एक निरोप आणलाय.'

" आपण पालकडून आलात ?" मी घाबरून गेले होते

### विश्वासघातानें गळा कापला

त्या दिवशी सकाळी पालनें वरिष्ठ रशियन अधिकाऱ्यांशी हंगेरीतून रशियन सैन्य काढून घेण्याबद्दल बोलणी केली होती. फक्त कांही तात्रिक मुद्दे राहिले होते. त्या रात्रीच पाल सोव्हिएट छावणीमध्यें त्यांच्याशी याबाबत बोलणी करणार होता. जिथें बोलणी होणार होती ते ठिकाण बूडापेस्टच्या दक्षिणेला होते. आपल्याला मॉस्कोमधील आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याशी फोनवरून सबंध ठेवता यावा म्हणूनच रशियनानी ते ठिकाण सुचविले होतें.

पालनें त्याच्या त्या मित्राकरवी निरोप दिला होता. " काळजी करण्याचे कारण नाही. लौकरच मी भेटेन." पालकडून आलेला हा शेवटचाच निरोप !

पाल व त्याचे सहकारी परिषदेहून परत आलेच नाहीत. !

दुसऱ्या दिवशी सकाळी, रविवार ४ नोव्हेंबर रोजी रशियनानी बूडापेस्टवरील आपल्या हल्ल्याना पुन्हा सुरुवात केली. तोफा, रणगाडे व बांबचा वर्षाव यांनी बूडापेस्ट त्यानी वेढून टाकले पतप्रधान इम्रेनाजी यानी रेडिओवरून पालला हंगेरीचे रक्षण करण्यासाठी परत येण्याकरितां विनवले. परंतु पाल विनतीला साद देऊं शकला नाही. कारण तो व त्याचे सहकारी यांना रशियनानी कैद केले होते. विश्वासघाताने रशियन हस्तकानी पाल मालेटरला पकडले ही गोष्ट इम्रेनाजी यानी रेडिओवरून जाहीर केली. रविवारी इम्रेनाजी यानी दुसरे भाषण केले. ते भाषण जग कधीच विसणार नाही. सोव्हिएट रणगाडे बूडापेस्टमध्ये रोरावत घुसत होते सूडबुद्धीने गोळीबार करीत होते. इम्रेनाजीनी पाश्चिमात्य राष्ट्राकडे मदतीची याचना केली. हंगेरीचा हा हबरडा जगाने ऐकला "आज हंगेरीवर हा प्रसग आहे उद्या तुमच्यावर हीच पाळी येईल. वाचवा ! धावा ! ! (This time it is Hungery ! This time the bell is tolling for Hungery ! next time it may toll for you. S. O. S. ! Save our souls ! Save our souls)

स्वतत्र राष्ट्रानी ही आर्त वाणी ऐकली. परतु हंगेरीचे वस्त्रहरण पाहत ब्रिटन, अमेरिका हे स्वस्थ बसले. हंगेरीची मान आवळली जात होती.

कित्येक दिवस क्रातिकारक शौर्याने व अधिनिवेशाने लढत होते. जेव्हा अगदीच निरुपाय होई तेव्हां ते मागे फिरत. अत्यत पद्धतशीरपणे रशियनानी प्रत्येक स्वातत्र्यसैनिक निकालात काढला. घर न् घर त्यानी कसून तपासले. बूडापेस्टवरून गाढवाचा नागर फिरला.

जनतेची प्रतिकारशक्ति आता अखेर सपुष्टात आली. मला एक दिवस माझी एक जुनी मैत्रीण भेटली. ती माझ्याकडे भीतियुक्त आश्चर्याने पाहत म्हणाली, " मारिया ! तूं अजून इथच? तुला अजून पकडल नाही ? अग मुलाचा विचार कर ! इथ राहू नकोस ! !"

हा उपदेश खरोखरच मोलाचा होता. सबध हंगेरीमध्यें आता दहशतीचें वातावरण निर्माण झाले होते हजारो हंगेरियन मालगाडीत भरून सोव्हिएट रशियामध्ये हद्दपार केले जात होते. पाल मालेटरला वाकविण्यासाठी त्याना त्याच्या मुलाचा उपयोग करता आला असता. त्याची मुले त्याना ओलीस म्हणून वापरता येणें शक्य होते.

## हंगेरीचा निरोप

हंगेरीतून निसटून जायला मला मालेटर नावाचाच उपयोग झाला !

पाल मालेटर हे नाव क्रांतिकारकात इतके पूज्य मानले जात होते की धान्याच्या रांगेतसुद्धा त्याचा उपयोग व्हायचा. ओळख-कार्डावरील मालेटर हें नाव वाचल्याबरोबर वांटपअधिकारी उदारहस्तें मला अधिकाधिक धान्य व दूध देत.

हें जास्त मिळालेले अन्न मी वाटून टाकायची. एकदा एका बाईला तिच्या मृत्युशय्येवर असलेल्या नवऱ्यासाठी मी ते धान्य दिले. मी त्या बाईला ओळखत नव्हते व मी तो प्रसंगसुद्धां विसरून गेलें होते. पण ती विसरली नव्हती. २१ नोव्हेंबरच्या रात्री ती माझ्याकडे आली व म्हणाली—" हंगेरीतून तुला बाहेर पडायचं असेल तर एक लॉरी उद्या सकाळी पेस्टहून निघणार आहे मालेटर, कृपाकरून तू हंगेरी सोड ! "

हे काम तितके सोपें नव्हते. त्याकरितां मला अत्यंत लौकर महत्वाचा निर्णय घेणें आवश्यक होते. तीन मुलें घेऊन सीमा ओलांडणे मला शक्य नव्हते. फ्ल्यूच्या आजारातून जूडीका नुकतीच उठली होती. हा प्रवास झेंपण्याइतकी ताकददेखील तिच्या अंगात नव्हती. मी तिला माझ्या मैत्रिणीकडे ठेवण्याची व्यवस्था केली. माझ्या मनात असाहि विचार डोकावला की कदाचित् आमच्यापैकी तीच एकटी जिवन्त राहील.

आम्ही पहाटें चारला उठलो. मुलाना याचा काही अर्थच कळेना. तीन तास आम्ही त्या निर्मनुष्य रस्त्यामधून जात होतों. शेवटी शहराच्या एका कोपऱ्यात ती लॉरी आमची वाट पाहात होती. लॉरीच्या मागच्या बाजूला असलेल्या रिकाम्या पेटयामागें ड्रायव्हरने आम्हाला बसवलें. आमच्या अंगावर त्याने ताडपत्री पसरली. आम्ही कोण आहोत याची त्याला मुळीच कल्पना नव्हती युगोस्लाव्हियाच्या सीमेवर असलेल्या एका शहरात आम्हाला पोचवायचे एवढेंच त्याला ठाऊक होतें.

बोर्डिंग स्कूलमध्यें मी तुम्हाला नेत आहे असे मी मुलाना सांगितले होतें. मारिकाने विचारले, " मग आपण असं लपून का जायच ? " मी दोन्ही मुलाना सत्य सांगायचे ठरवले. मालेटर हे नाव कोणी विचारले तर सांगायचे नाही अशी मी त्यांना ताकीद दिली.

आमच्या लॉरीने कसलाहि अडथळा न येता सध्याकाळपर्यंत प्रवास केला. काळोख पडल्यावर मात्र लॉरी दोनदा थांबवली गेली व रशियन आणि हंगेरियन सैनिकानी ती तपासली. पहिली तपासणी वरवर होती. एका सैनिकाने ड्रायव्हरने दाखविलेल्या कागदाकडे नजर टाकली व जाण्याची खूण केली.

दुसऱ्या वेळी मात्र तपासणी भीतिदायक झाली. लॉरीत भरलेल्या मालाबद्दल प्रश्न विचारण्यात आले. नुसत्या रिकाम्या पेटयाच आपण लॉरीतून नेत असल्याचे ड्रायव्हरने सांगितले.

मग बुटाची करकर ऐकू आली, शस्त्राचा आवाज आला आणि एक शिपाई लॉरीच्या मागच्या बाजूला आला व त्याने ताडपत्री वर केली.

टॉर्चच्या प्रकाशात आम्ही पेटयाच्या ढिगाऱ्यात लपलेले त्याने पाहिलें. बराच वेळ आमच्यावर त्या हंगेरियन सैनिकाने नजर रोखली. त्याने आम्हाला ओळखले होतें का ? असावे ! आम्ही मालेटर आहोंत हें जाणूनच त्याने ताडपत्री घाईने खाली सोडली असावी. आपल्या रशियन दोस्ताला तो म्हणाला, " पुढें जाऊ द्या. " त्या रशियन सैनिकानें त्याप्रमाणे हुकूम दिला.

लॉरी आपल्या इच्छित स्थळी पोचल्यावर आम्हाला ऑस्ट्रियन सरहद्दीकडे जाण्यासाठी आगगाडीचा दीर्घ प्रवास करावा लागला. आमच्या मार्गांत आणखीदेखील काही धोके होते. गुंतागुंतीची व धोकादायक अशी ती सीमा पार पडल्यावर शेवटी एकदाचे आम्ही ऑस्ट्रियामध्यें येऊन ठेपलो.

" सुटलो एकदाचे " असा निःश्वास सोडीत असतानाच दुसऱ्याच एका विचाराने मन दुःखी झाले. मी माझ्या मातृभूमीला, परमप्रिय हंगेरीला कायमचा रामराम ठोकून निघाले होते. मला ठाऊक होते की हंगेरीला मी परत कधीच जाऊ शकणार नव्हतें.

एका रेडक्रॉसच्या मोटरीनें आम्हाला जेन्नरडोर्फ (Jennerdorf) या निर्वासिताच्या वसाहतीत नेले. आम्हाला जेवण देण्यात आले व राहायला एक खोली देण्यात आली. जूडिकाला हंगेरीबाहेर कसे आणावे याचा आता मी मनांत विचार करीत होतें.

एक महिन्यानतर ईश्वरकृपेने व मित्राच्या सहाय्याने जूडिकाला व्हिएन्नाला आणण्यात मी यश मिळवले. मी लगेच पालला तारेने आम्ही पळाल्याचे व खुशाल असल्याचे कळवले. मी तारेत म्हटले होते, " जन्मभर मी मुलाना सभाळीन असे वचन दिले होते मी वचन पाळले आहे. यापुढेंहि पाळीन. आम्ही हंगेरीबाहेर आहोंत "

माझी तार त्याला मिळाली असेल काय ? मला ते कधीच कळले नाही. पण एवढें मला निश्चित ठाऊक आहे की आम्ही सुरक्षित असल्याचें त्याला समजले होतें व त्याला परम समाधान वाटले होते.

## यूनोमार्फत प्रयत्न

सोव्हिएट कैदेमधून पालला सोडविण्याकरिता आम्ही आटोकाट प्रयत्न केले. १९५७ मध्यें न्यूयॉर्क मधून मुलानी बुल्गानिनला पत्र पाठवून आपल्या पित्याला सोडावे अशी याचना केली डाग हॅमरशील्ड याचे मध्यस्थीने आम्ही युनायटेड नेशन्सची मदत घेऊन विश्वासघाताने पळविलेल्या पाल व त्याच्या सहकाऱ्याना सोडविण्याचा प्रयत्न केला.

बातमीदारानी युनायटेड नेशन्सच्या कचेरीजवळ मला घेरलेंच पालशी मी कित्येक वर्षांपूर्वी घटस्फोट घेतला असताना मी त्याला मदत करायला इतकी का आतुर आहे असा प्रश्न त्यानी मला केला. मी त्याना कदाचित् सत्य सांगितले असते की पालशी घटस्फोट घेण्याची माझी कधीच इच्छा नव्हती. कम्युनिस्ट पार्टीची तशी इच्छा होती. प्रीतीच्या पहिल्या भरात तो मला जितका जवळचा वाटला तितकाच तो अजूनहि मला वाटतो. पण त्याना हे सर्व कसें सांगायचे ? मी त्याना इतकेच उत्तर दिले की एका हंगेरियन नागरिकाचा जीव वाचविण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

१९५८ मध्यें पालला फाशी दिल्याचे रशियन सरकारने जाहीर केले. त्याअगोदर १८ महिने तो त्याच्या कैदेंत होता. खोटेनाटे सर्व गुन्हे त्याच्याकडून कबूल करून घेण्याचा प्रयत्न केला गेला. पाल त्याना बधला नाही. चौकशीचें नाटक उरकण्यात आले आणि पालच्या मानेभोवती फास आवळण्यात आले.

पालला याची कल्पना होती की हवा तसा कबुलीजबाब दिला तर त्याची कदाचित् फाशी चुकेल. पण त्याला हेहि ठाऊक होते की क्रांतीचा निर्मळ सदेश त्यामुळें मलीन होईल. ज्या क्रांतीसाठीच तो इतक्या पराक्रमाने लढला होता त्या क्रांतीचा विश्वासघात करण्याइतका तो नामर्द थोडाच होता ?

• • •

# एका अरबाची आणि उंटाची गोष्ट

## व्ही. शां. प्रॉडक्शनचा



# ‘सेहरा’

: परीक्षण :

श्रीकांत रानडे,
रंगा मराठे

एखाद्या पडेल नाटकाच्या पहिल्या प्रयोगाला हजर राहण्यांतहि थोडीशी गंमत असते. प्रवेशाप्रवेशागणिक नाटकाचा बोऱ्या वाजत असतांना, नटांच्या तोंडचें पाणी पळत असतांना तें प्रत्यक्ष पाहणें यांत एक आसुरी समाधान लाभतें. नाटकाचा लेखक आसपास असला तर त्याचा पडलेला चेहरा पाहून ‘बरी ××× जिरली’ अशी मनांतल्या मनांत शिवी तोंडावर देतां येते. परंतु पडेल चित्रपटाला पहिल्याच दिवशीं हजर राहणाऱ्यांना यांतलें कुठलेंच सुख न लाभतां अपमानित अवस्थेंत तो अत्याचार सहन करावा लागतो. अर्थात् सुज्ञांना हें दुःख; परंतु सर्वसामान्य प्रेक्षक हुल्लड-शिट्या-संवादांवरील भाष्य यांची खैरात करून तशांतहि आपली करमणूक करून घेतो. राजकमलच्या वंशांतील ‘सेहरा’ नांवाची प्रोप्रा. वणकुद्रे यांची जी नवी सर्कस पडद्यावर सध्यां सुरू झाली आहे ती पाहत असतांना अशा प्रेक्षकांनीं सतत वाहिलेली शिव्याशापांची लाखोली मख्खपणें ऐकणें भाग पडतें.

अहो, या चित्रपटांत काय नाहीं? उंटावरच्या उड्या आहेत; उंटस्वारांची लढाई आहे; वाळवंटांतील संगमरवराचीं कारंजीं आहेत; कमींत कमी बारा फुटांवरून केलेला आर्त प्रणय आहे; भयानक हिंदी आहे; सतत दहा मिनिटें चाललेली फ्री स्टाईल कुस्ती आहे; एक अज्ञात सांईबाबा आहेत; एक राजस्तानी तारासिंग आहेत; युद्धबंदीचा संदेश आहे; दोन अपघाती मृत्यु आहेत आणि दोन खून आहेत. स्त्रीनें स्त्रीत्व सोडूं नये हा संदेश आहे. हा ‘सेहरा’ म्हणजे हिंदी चित्रपटसृष्टीचें शांतारामरूपी दुर्योधनानें केलेलें वस्त्रहरण आहे.

### धंद्याचा उंट

उंट आणि अरबाची गोष्ट आपण लहानपणीं वाचलेली आहे. शांतारामांच्या कलेच्या तंबूंत आतां हा त्यांच्या धंद्याचा उंट पुरता शिरलेला असून कलावंत शांतारामांचा कलेशीं-कलात्मक चित्रीकरणाशीं सुतराम् संबंध उरलेला नाहीं. पहिल्या बाजीरावाच्या पोटांतच दुसरा बाजीराव दडलेला असतो. “झनक झनक पायल बाजे”च्या यशांतच आजच्या मारवाडी चित्रीकरणाचा त्यांचा अधःपात दडलेला होता. म्हणूनच ‘सेहरा’सारख्या बिनबुडाच्या नि पोकळ चित्रपटाची निर्मिति व्ही. शांताराम यांच्याकडून व्हावी; ही वाटतें तितकी आश्चर्याची गोष्ट नाहीं. ती अपेक्षितच होती!

‘झनक झनक पायल बाजे’मध्यें चित्रपटांतील नवीन तऱ्हेनें सादर केलेल्या नृत्यांची व रंगांच्या उधळपट्टीची, आणि भव्यपणाची प्रेक्षकांनीं आणि टीकाकारांनींहि खूप स्तुति केली आणि तो चित्रपट खूपच यशस्वी ठरला. हीच रंगपंचमी आणि तीच अद्भुतरम्यता ‘नवरंग’ या चित्रपटांत होती. ‘झनक झनक . .’ला कथा नव्हतीच आणि ‘नवरंग’ला धागा कां होईना होता एवढाच काय तो फरक. त्यांचा ‘तूफान और दिया’ म्हणजे अवास्तव कथानकाचा एक भडक चित्रपटच होता. पण तोहि प्रेक्षकांनीं यशस्वी केला. मध्यंतरींचा ‘दो आँखे बारह हाथ’मात्र प्रशंसनीय होता. ‘मौसी’ हा चित्रपट केव्हां आला आणि केव्हां गेला तेंच समजलें नाहीं.

आणि त्यानंतरची 'स्त्री'! शांतारामबापूंचे सर्व गुण अगदीं कसाला लावून तयार झालेल्या या कलाकृतींत त्यांनीं कालिदासाच्या 'शकुंतले'वर आपली इस्त्री चालवून, भाजून काढलेल्या 'स्त्री'चें दर्शन घडवलें. त्यांची 'स्त्री' ही शकुंतला नव्हती. तो एक शकुंतलेचा प्राण नसलेला सांगाडा होता.

तरीहि त्यांच्या नव्या चित्रपटाबद्दल पुन्हां आशा वाटत होती. शांतारामबापूंच्या डोक्यांत घुमणारें तें अद्भुताचें भूत त्यांना सोडून जाईलसें वाटत होतें. ती आशा फोल ठरली ! सेहरामध्यें शांतारामांनीं उंटावरून जो धुमाकूळ घातला आहे तोच एक मोठा मॉन्टाज आहे.

**कथानक**

'सेहरा' चें कथानक आहे राजस्तानच्या पार्श्वभूमीवरचें. अर्थात् कथानकांत राजस्तानच्या पार्श्वभूमीचें महत्त्व कांहींच नाहीं. 'झनक झनक' मध्यें पाळीव प्राण्यांसारखीं वागणारीं माणसें दाखविलीं, नवरंगमध्यें घोडे व हत्ती यांची करामत दाखविली, 'स्त्री' मध्यें तर काय प्राणिसंग्रहालयच होतें, पण यांत अजून उंटच फक्त राहिला होता. आणि या प्राण्याचें तथाकथित 'नाविन्यपूर्ण' दर्शन घडविण्यासाठींच कीं काय शांतारामांनीं राजस्तान निवडलें असावें. कथानक आहे 'लैला मजनू', 'शिरीं फरहाद' असल्याच चावून चावून चोथा झालेल्या थाटाचें ! दोन सरदार असतात. त्यांचें पिढयान्‌पिढयांचें वैर असतें. एकाची अंगारा नांवाची एकुलती एक मुलगी असते. तिच्या आईच्या मर्जीविरुद्ध तिचा बाप तिला पुरुषी शिक्षण देतो. पुरुषवेषांत वावरणारी ही 'पठाण' मुलगी शत्रुपक्षांतल्या विक्रम नांवाच्या तरुणाच्या प्रेमांत पडते. अगदीं चहांत माशी पडावी तशी ! पण तिच्या बापानें मंडल नांवाच्या एका व्यसनी व उधळया माणसाच्या बापाला अंगाराचें लग्न मंडलशीं करीन म्हणून वीस वर्षांपूर्वी वचन दिलेलें असतें. मंडल येतो नि धमकावतो. शत्रुपक्षाचा सरदार त्याची मदत घेऊन पंचसभा बोलावतो. मंडलशीं लग्न करायला अंगारा व तिचा बाप नकार देतात. त्यांतून दोन गटांत युद्ध उद्भवतें. बिचारा विक्रम इकडे 'हाय लैला, हाय लैला' करीत फाटक्यातुटक्या कपडयांत केंस पिंजारून भटकत असतो. युद्ध सुरू झाल्यावर आपल्यासाठीं युद्ध व रक्तपात नको म्हणून अंगारा लग्नाला मान्यता देते. सूड म्हणून मंडल लग्न झाल्यावर घरीं जातांना 'दहेज' म्हणून दिलेलें सामान अंगाराला डोक्यावरून वाळवंटातून न्यायला लावतो. वाटेंत 'प्यासा मजनू' विक्रम भेटतो. अंगारा त्याला पाणी द्यायला जाते. मंडल तिला गोळी घालतो नि धांदलींत स्वतःवरहि गोळी झाडून घेतो. अंगारा फरफटत विक्रमजवळ जाते. सर्कशींतल्या शिकवलेल्या प्राण्यांप्रमाणें विक्रम व अंगारा हाताजवळ हात टाकून या लोकांत नाहीं तरी परलोकांत एकमेकांच्या भेटीला जातात. मग शांतारामांच्या अचाट करामतीनें कीं काय तिथल्या भुसभुशीत वाळवंटाचें झक्कपैकी पॉलिशड सिमेंट कॉंक्रीट होतें, नि त्यांतून दोन कारंजीं उडतात व चित्रपट संपतो.

**शांतारामबापूंची मेहनत**

शांतारामबापूंच्या चित्रपटांतील सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांचें दिग्दर्शन. कारण, सर्कशींतल्या शिकवलेल्या प्राण्यांपेक्षां रिंगमास्टरचें कामच महत्त्वाचें ! आमचा एक मित्र आहे. त्याला हॉकी खेळायची फार हौस. बिचारा रोज संध्याकाळीं घामाघूम होऊन निथळत म्लान चेहऱ्यानें कसाबसा घरीं येतो. आम्ही त्याला विचारतों 'काय ! कसा काय झाला आजचा खेळ ?' धांपा टाकीत तो उत्तरतो 'मैदानाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत अखंड धांवलों, घामानें निथळून गेलों अगदीं... पण हातांतल्या स्टिकची आणि बॉलची कधीं गांठ पडली नाहीं !' शंभर उभे आणि शंभर आडवे अशा रांगांत सरळ रेषेंत दहा हजार ठिपके मांडणें ही कांहीं सोपी गोष्ट नव्हे, पण ते मांडण्यापासून कांहीं रांगोळी तयार होत नाहीं. उलट चारच ठिपक्यांची रांगोळीहि कधीं कधीं मनाला मोहवून जाते. नव्या जमान्यांतले शांताराम असेच दहा हजार ठिपकेच फक्त मांडतात.


# पांढरे डाग

पांढऱ्या कोडाचें अनुभवसिद्ध प्रसिद्ध गुणकारी औषध. अनेक बक्षिसें व हजारों अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किंमत ६ रुपये पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं. नकली वैद्यांपासून सावध राहावें.

**वैद्य बी. आर. बोरकर, आयुर्वेद भवन**

मु. पो. **मंगरूळपीर** जि. **अकोला** (महाराष्ट्र)



*महाविद्यालयीन ग्रंथालयें*

*इतिहासाचे अभ्यासक*

*यांनीं संग्रहीं ठेवावा असा ग्रंथ*

# गुजराथेंतील मराठी राजवट

**वि. गो. खोबरेकर**

**सात रुपये**

**[ महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ पुरस्कृत ग्रंथ ]**

**रा ज हं स प्र का श न**

४१९ नारायण पेठ, पुणें २.

## संध्येचे हाल

या भयानक कथेतील पात्राच्या अभिनयासंबंधीं काय लिहावें? अंगाराच्या भूमिकेंतला पुरुषी थाट संध्येला 'शोभण्यासारखा आहे. बाणेदार व स्वाभिमानी वाटणारी ही अंगारा अचानक, जन्मांत घराबाहेर पाऊल न टाकलेल्या प्राचीन भारतीय स्त्रीसारखी 'अल्लाघरची गाय' बनते. अशा भूमिकेंत ती बिचारी काय प्राण ओतणार! पुरुषी पोशाखांतलें पठाणी काम संध्येनें बरें केलें पण भावपूर्ण भूमिका करायची पूर्ण कुवत कमी पडल्यानें उत्तरार्धांत ती निष्प्रभ वाटते. त्यांत भर म्हणून खास राजकमलध्यें भिनलेली संवाद उच्चारण्याची विचित्र तऱ्हा! त्यामुळें गंभीर संवादहि विनोदी वाटायला लागून नको तेव्हां हंसू येतें! मुक्त नृत्य हा प्रकारच सर्कशींतील 'अक्रोबॅट' या प्रकारचा आहे. 'अक्रोबॅट' म्हणून तो चांगला ठरेल पण नृत्य या सदरांत घातल्यानें तोहि विनोद करून जातो पण हा दोष मात्र संध्येचा नाहीं. वणकुद्रयांच्या सर्कशींत ती हिरॉइन झाली इथेंच सगळें चुकलें आहे!

या चित्रपटाद्वारें शांताराम यांनीं एक नवा नायक सादर केला आहे. प्रशान्त! त्याच्या शरीराचा कुठचा भाग शांतारामांना आकर्षक वाटला? गाल आंत गेलेला, चेहऱ्याचीं हाडें वर आलेला आणि शोफरसारखा दिसणारा हा नायक वेड्यांच्या इस्पितळांतून सुटल्यासारखा चित्रपटभर वावरतो. मात्र उंटाच्या पायीं देण्याचे प्रसंग नीट वठवल्याबद्दल शांतारामांनीं त्याला बोनस द्यायला हरकत नाहीं. बाकीच्या भूमिका उल्हास, एम्. राजन्, मुमताज, केशवराव दाते आणि बाबुराव पेंढारकर यांनीं करून शांतारामांना उपकृत केलें आहे.

## तांत्रिक बाजू ठीक

शम्स लखनवींच्या मूळ कथेवरून लिहिलेली शांताराम यांची पटकथा खूपच आटोपशीर आहे हा एकच तिचा गुण! त्यांतील आटोपशीरपणापेक्षांहि शांताराम यांच्याच संकलनानें त्याला बरीच गति मिळवून दिलेली आहे. त्यांचें संकलन मात्र खरोखरीच चांगलें आहे. कांहीं ठिकाणीं त्यांनीं वापरलेले 'शार्प फेड आऊट्स' नवीन आणि प्रभावी वाटतात.

शांतारामांच्या चित्रपटांचीं निर्मितीमूल्यें नेहमींच समाधानकारक असतात व तीं तशीं येथेंहि आहेतच. आणि याचें कारण स्वतः खुद्द शांताराम यांना चित्रपटांच्या सर्व अंगोपांगांत असलेली गति हेंच आहे हें कुणालाहि मान्य करायला हवें. कृष्णराव वाशिर्डे यांचें छायाचित्रण नयनमनोहारी आहे. विशेषतः वाळवंटांतील छटा कॅमेऱ्यानें पकडणें म्हणजे एक आव्हानच असतें पण त्यांत ते यशस्वी झाले आहेत. एकाद-दुसरा 'ओव्हर एक्सपोज' झालेला शॉट सोडला तर नांवें ठेवण्यासारखें त्यांत कांहीं नाहीं.

ध्वनिमुद्रण हा तर राजकमल स्टूडिओचा मानबिंदु. मंगेश देसायांनीं तें काम चोख बजावलेंच ध्वनिमुद्रण व त्याचें पुनर्मुद्रण या बाबतींत शांताराम नेहमींच खूप काळजी व श्रम घेतात. कनु देसाई व बाबूराव जाधव यांचें कलादिग्दर्शन ठीक आहे इतकेंच. कारण, त्यांत साधेपणाचा म्हणजे सरलतेचा अभाव असून किचकटपणा जास्त वाटतो. पत्येक सेटमध्यें भिंतीवर रंगविलेलीं चित्रें असावीं व त्यांतून प्रसंगाला मॉंटॉज तयार व्हावा असा आग्रह कां? तेंच तेंच सारखें झाल्यानें त्यांतलें स्वारस्यच निघून जातें.




संगीत दिग्दर्शक रामलाल यांनीं प्रथमच या क्षेत्रांत पदार्पण केलें आहे. वसंत देसायांपासून शंकरजयकिशनपर्यंत सर्वांचा आधार घेऊन त्यांनीं वेगवेगळ्या दिग्दर्शकांचा 'पॅटर्न' वापरून वेगवेगळ्या पद्धतीचीं गीतें सादर केलेलीं आहेत. 'मस्त नजरकी कटार' हें शंकर-जयकिशन टाईप गाणें व 'तकदिरका फसाना' हें नौशाद टाईप गीत विशेष लोकप्रिय होण्यास हरकत नाहीं. हसरत जयपुरीचीं पद्यें त्यांच्या सफाईदार लेखणीची करामत दाखवितात. त्यांचे शब्द गेय असतात हेंच त्यांचें वैशिष्टच.

एकंदरींत हें असें आहे. श्रम, वेळ व पैसा खर्च करूनहि, वरच्या दर्जाचीं तांत्रिक मूल्यें लाभूनहि हा चित्रपट म्हणजे चित्रपटसृष्टीचें वस्त्रहरण वाटतें! याचें कारण काय? कारण एकच. शांताराम यांची एककल्ली मेहनत!! नुसते दहा हजार ठिपके काढण्याची.

तंबूतून हांकललेला हा अरब आतां उंटाच्या पाठीवर बसला आहे– चित्रपटरसिका संभाळ!!

• • •

# दीर्घायुष्य व कायाकल्प

एप्रिल अंकांतील डॉ. अभ्यंकर यांच्या टीकेला लेखमालेच्या लेखकाने दिलेलें उत्तर

संपादक,
'माणूस' यास,

एप्रिल अंकातील डॉक्टर शरद् अभ्यकर याची पत्रें वाचलीं. प्रथम काहीं general मुद्दे मांडून मग विवक्षित आक्षेपाकडे वळतों.

(१) 'दीर्घायुष्य व कायाकल्प' ह्या लेखमालेतील विचारप्रणाली ही सर्व लोक सतेज, सुदृढ व दीर्घायु व्हावेत अशा हेतूने लिहिलेली असल्याने त्यात प्रतिपादिलेले नियम पाळून काही मोठा घात होईल, गवेच्या गावें ओस पडतील अशा आविर्भावानें कडाडून, चिडून, त्यावर हल्ला चढवून ही लेखमाला तावडतोब बंद करा अशी हाकाटी अप्रस्तुत आहे.

(२) लेखातील मजकूर हा आपल्यावर व्यक्तिशः किंवा आपल्या व्यवसायावर हल्ला आहे असें कोणीहि समजण्याचें कारण नाही.

(३) शास्त्रीय प्रगतीचा मीहि आक्षेपकाच्या इतकाच कट्टर पुरस्कर्ता आहे. परंतु म्हणून प्राचीन सर्व प्रथा टाकाऊ आहेत असे समजणे चुकीचे आहे.

(४) शास्त्रीय प्रगति वाटेल तेवढी झाली तरी लवकर झोपणें, लवकर उठणे, व्यायाम करणें वगैरे नियमानीच शारीर क्रिया उत्तम चालू शकते, हें कधी विसरून चालणार नाही.

(५) लेखातील प्रत्येक मुद्दा हा त्यामागील विचारसरणी तर्कशुद्धपणें माडून मगच निष्कर्षात्मक रीतीने माडलेला आहे. केवळ dogmatic अथवा अडमुठेपणाने कोठेंच कांही प्रतिपादन केलेले नाही. मात्र नवीन विचारसरणीनें विचकून, बावरून न जाता वाचकानी त्यावर शातपणें विचार करून अनुभवाने पारखून पाहावे हा हेतु. ज्याना आचरणें नसेल त्याना त्यावद्दल कसलेंहि दडपण वाटण्याचें कारण नाही. मात्र इतराच्या वाचनात ती अवाक्षरहि येतां कामा नये एवढा अधर्म किंवा अनर्थ त्यात काहीच प्रतिपादलेला नाही.

(६) विस्तारभयास्तव प्रत्येक मुद्याचें थोडक्यात सूत्ररूपानेच उत्तर देणें शक्य असले तरी त्यामागें मोठी वैचारिक व प्रायोगिक भूमिका आहे हें वाचकानीं लक्षांत घ्यावे, ती भूमिका समग्रपणें 'दीर्घायुष्य व कायाकल्प' लेखमालेत मांडलेली आहे.

(७) अनेक देश हिंडून, तेथील तज्ज्ञाशी चर्चा (त्यांचा उल्लेख वेळोवेळी लेखमालेत येईलच) व अनेक प्रयोग, परीक्षण आणि निरीक्षणाच्या तपश्चर्येवरच लेखमाला आधारलेली आहे.

एवढें सागून आतां विशिष्ट आक्षेपाचा थोडक्यांत विचार करूं.

लेखातील सिद्धात अशास्त्रीय नाहीत. ते प्रत्यक्ष आचरणात सिद्ध झाल्यावरच सागितलेले आहेत. इच्छा असलेल्यानी त्याप्रमाणें वागून अनुभव घेऊन पाहावा.

दैनंदिन आचरणाच्या एखाद्या नियमावलीला Fad म्हटल्यावर दोन पर्याय राहतात. एक असा की त्या आक्षेपित नियमावलीऐवजी दुसरी त्याहून चागली नियमावली सुचवणें. मग पहिलीला Fad म्हटलें तर तेच दूषण दुसरीलाहि लागू होईल. किंवा 'स्वैर. अनियमित आचरण मनुष्यशरीरास फार उपकारक ठरते" असे म्हणणें. यापैकीं खरे Fad किंवा Bad कोणते हें वाचकानीच ठरवावे

आघात-अपघाताने माणूस आजारी पडतो तसा सर्पदंश, मच्छरदंश अशा बाह्य कारणानीहि आजारी पडतो यांत दुमत कोणाचेच नाही. परंतु ९० टक्के रोग शरीरांतील पचनक्रियेच्या बिघाडामुळें होतात हें सर्वमान्य तत्त्व आहे. तसे बिघाड होऊं नयेत किंवा झाले तरी कोणत्या कारणांनी बहुधा ते घडून आलेले असतात व म्हणून कोणती पथ्यें आचरणें अवश्य आहे हेच माझ्या लेखमालेत सागितले आहे.

मुलांना होणारे रोग हे आनुवंशिक, गर्भांत असतानाच्या हयगयीनें किंवा जन्माला आल्यावरच्या अस्वच्छतेने होणें शक्य आहे. ते मलविसर्जनदोषानेच होतात असा हेका लेखकाने यच्चयावत् सर्व लहान किंवा वयस्करहि व्यक्तीच्या बाबतीत मुळीच धरलेला नाही.

मलावरोधाचे immediate दुष्परिणाम थोडा वेळ दृष्टिआड झाले तरी ते आंत घुमसत व जोर वाढवीत घर करून राहतात. रोज अल्पस्वल्प तक्रारींत (भूक कमी होणें, झोप विलवाने लागणें इ.) बिघाड जाणवतहि असतो तरी तिकडे दुर्लक्ष होते किंवा निरुपाय समजून मनुष्य वागतो. पुढें याच तक्रारी रतीरतीनें वाढत वाढत दुर्धर रोग बनतात. Auto intoxication हा शब्दप्रयोग चूक आहे. अर्थात् तो माझ्या मलावरोधाच्या सिद्धांताशी सुसगत नाही. म्हणून त्या दोहोंची गल्लत करणें चूक होय. वर्षभरात एकदाहि शौच न झालेल्या किंवा दिवसातून २४ वेळा शौचाला जाणाऱ्या व्यक्तींचीं परस्परविरोधी उदाहरणें देऊन 'अतज्ज्ञ लोकात गैरसमज पसरवण्याचा दोष' स्वत. आक्षेपक पत्रलेखकावरच लागू होतो. कारण शारीर स्वास्थ्यात योग्य मलविसर्जनाचे कांही महत्त्व नाही अशी त्यातून वाचकाची दिशाभूल व्हायचा संभव आहे व या मताशीं तज्ज्ञ अतज्ज्ञ कोणीच agree होणार नाहीत असें वाटते.

म्हशी पूर्वी भारतांत नव्हत्या व त्या २० व्या शतकांतच जन्माला येऊ लागल्या हा समज चूक आहे. गायीम्हशीच्या दुधांचें बाह्यागीन पृथक्करण करून परिणामी कोणतें चागले ठरावे असा अंदाज लावणें चुकीचे होय. दोघा व्यक्तीच्या गळयाचें बाह्य मोजमाप बरोबर असलें किंवा त्याहूनहि एकाचे मोजमाप अधिक perfect किंवा ideal असलें तरी आवाजाची सुरेलता त्यात असेलच असें नाही, तसेच दोघाच्या डोक्यांची मोजमापें सारखीं असली तरी बुद्धि सारखी नसते. अनु-

भवानेंच त्याचे परिणाम ठरवायचे असतात. हजारों वर्षांची भारतीय परंपरा व आजचे पुढारलेले सर्व पाश्चात्य देशहि गायीचेच दूध उत्तम असें एकमुखानें सांगत आहेत. हजारों वर्षे, शेकडो देशांत पिढ्यान्-पिढ्या सिद्ध झालेली ही गोष्ट Live Laboratory चा हा सिद्धात lightly डावलून चालणार नाही. ह्या बाबतीत एका Goanese christian डेअरी तज्ज्ञाचे मत मी लेखात उद्धृत केलेच आहे. इ. स. १९५९ सालच्या Agricutural Fair साठी भारतांत आलेले अनेक अमेरिकन डेअरी तज्ज्ञ भारतांत म्हशीच्या दुधाचा प्रादुर्भाव पाहून दु खानें माना हालवीत, उसासे टाकीत मला विचारीत ' हे असें का ? राष्ट्रीय कीर्तनकार डॉ पटवर्धन गायीच्या दुधाचा आवर्जून पुरस्कार करीत असताना म्हणत " मी डॉक्टर आहे हे विसरू नका."

तिबेटमध्यें याक प्राण्याचे दूध व अरबस्तानात् उंटाचें दूध पितात म्हणून ती दुधें गायीच्या दुधाहून श्रेष्ठ असल्याचें सिद्ध होत नाही.

दूध किंवा रक्त (blood transfusion) हे शक्यतो एका शरीरांतून ताबडतोब दुसऱ्याच्या शरीरात जाणे हा सर्वश्रेष्ठ मार्ग, म्हणजे त्यातील पोषक जतूंची तडफड न होतां ते जसेच्या तसे दुसऱ्या शरीरांतील प्रवाहांत रुजू होतात. म्हणूनच मातेचे दूध परस्पर स्तनाद्वारे लेकरानें पिण्याची निसर्गाने व्यवस्था केली आहे. तें तापवून, उकळून कोणीहि पीत नाही.

गायीच्या धारोष्ण दुधाने क्षय होण्याची शक्यता असते. अशी बऱ्हंशी खोटी हाकाटी बरीच पिटली गेलेली आहे. क्षयी किंवा अन्य रोगजर्जर गवळ्याच्या बोलण्या-शिंकण्यानें दुधात थुंक उडाल्याने किंवा अस्वच्छ गोठे, घाणेरडी भाडीकुंडी, किंवा दूध काढल्यावर त्यावर माश्या बसू देणें, घाण जागेंत ठेवणे अशाने झालेल्या रोगाचा गोदुग्धावर उगीच आरोप केला गेलेला आहे. उलट गायीचे दूधच काय तर मलमूत्रहि disinfectant, germicidal वगैरे असते हे पंचगव्य घेण्याच्या प्रथेवरून, गोमूत्राने व गोमयाने सिंचन, सारवण करण्याच्या रीतिरिवाज वगैरेवरून दिसतें. गोमयाने सारवून वाळलेल्या भूमीवर कॉलऱ्याचे जतुहि मरतात. प्राचीन सोवळ्या ओवळ्याची कडक प्रथा, मरण-बाळंतपण-मासिक पाळीसबधी विटाळ, हजामत करून आल्यावर बाहेरच स्नान करणे इत्यादि गोष्टीवरून प्राचीन भारतीय जंतुशास्त्र प्रगत होते असें कबूल करावे लागते. केवळ 'प्राचीन' 'हिंदू' अशा bias नें ते अशास्त्रीय ठरत नाही. आजचे surgeon जसें तोंडाला फडके बाधतात तसेच पूर्वीचे जैन साधूहि बाधीत. तेहि थुंकीत भयंकर रोग जंतू असतात म्हणून, त्यानी दुसऱ्यास बाधा होऊं नये, खाद्य-पेयें दूषित होऊ नयेत ह्याच शास्त्रीय आधारावर.

लुई पाश्चरचा शोध हा विक्रेत्याच्या पथ्यावर पडला. शिळे (सत्त्वहीन) दूध असले तरी तें नासले-कुजले तर नाही अशा समाधानानें ग्राहक घेऊ शकतो एवढेंच. पण म्हणून पाश्चरायझेशन क्रियेने त्यांत काही अधिक सत्त्वाश निर्माण होतात असे नव्हे. त्या शोधाने आता दुधाचाहि घाऊक व्यापार करणें शक्य झाल्याने केव्हाचे तरी दूध कोठेंतरी नेऊन लोकाच्या गळी उतरवता येते. अर्थात् आपद्धर्म म्हणून मोठमोठ्या शहरातून दूध नसण्यापेक्षा पाश्चराईज्ड घेणे केव्हाही बरें. परतु सर्वांत उत्तम मार्ग म्हणजे घरोघरी स्वत.च्या गायी ठेवणे व त्या डेअरीतल्यासारख्या शास्त्रीय पद्धतीनें स्वच्छ व बलवान् जोपासणे.

साखर रक्तांत सोडल्यानें अत्यवस्थ रोगीहि सावरतात हें मला पूर्ण मान्य आहे. तितकेच तोंडावाटें गेलेली साखर जाडच करवते हेहि खरे आहे. म्हणून शर्करामिश्रित पदार्थ शक्यतो आहारातून वर्ज्य करा म्हणणे चूक नाही. शिवाय रक्तात सोडलेली शर्करा विशिष्ट शास्त्रीय–वैद्यकीय पद्धतीनें केलेली (Glucose) असते. ती व रोजची साखर सारखीच असती तर महाग Glucose घेण्याऐवजीं एक रुपया शेराची बाजारू साखरच द्रवरूपानें रोग्याच्या रक्तात सोडण्याची सोपी व अल्पखर्ची प्रथा दवाखान्यांतून रूढ व्हायला पाहिजे होती. हे दोन्ही मुद्दे लक्षात घेतल्यास मुलाच्या आहारातील रोजची साखर वर्ज्य करणे जरुरीचें आहे. पाश्चात्य देशात दुधात साखर कधीच घालीत नाहीत. येथील शर्करामिश्रित दुधाची प्रथा पाहून एक अमेरिकन अधिकारी उद्गारले " अरे बापरे, काय भयकर गोष्ट आहे ही. आम्ही कधीच साखर घालीत नाही. अन् घालण्याची जरुरी तरी काय ? दुधात समतोल सत्त्व निसर्गानेच घातलेलें असते तुम्ही (भारतीय) असले प्रकार करतां म्हणूनच डायबिटिस् एवढें भारतात बोकाळले आहे." वगैरे वगैरे.

असो वरील सर्व मुद्याचे निराकरण करून आता मला शेवटी आक्षेपकाना असे स्मरण द्यायचे आहे की सध्याचे युग हे शास्त्रीय चिकित्सेचें व प्रगतीचें आहे असे जें आवर्जून प्रतिपादन करतात त्यानी हेहि विसरता कामा नये की Freedom of thought, freedom of expression हीहि प्रचलित कालाची अभिमानाने पुरस्कारलेली तत्त्वे होत. ती तेवढी दृष्टिआड करून एखादी लेखमाला बंद करा. कारण, ती कांही प्रचलित अशास्त्रीय समजुतीना धक्का देते, हे जुन्या अप्रबुद्ध व अट्टाग्रही काळातल्यासारखेच नाही काय ? पृथ्वी गोल नसून चपटी आहे असें बलात्काराने गॅलीलियोकडून लिहून घेणे किंवा चेटूक केले म्हणून Joan of Arc ला फाशी देणे असे पूर्वी होत असे. तितकीच असहिष्णुता आत्ताहि सद्दी गाजवीत राहिली तर हा आणखी एक पुरावा आहे की, अन्य क्षेत्रातहि आपली विचारशक्ति आपल्याला वाटते तेवढी प्रगल्भ झालेली नाही. अर्थात् साधक-बाधक चर्चा अवश्य व्हावी, शका अवश्य उपस्थित कराव्यात. हाच खरा शास्त्रीय चोखदळपणाचा मार्ग म्हणता येईल. पण दुसऱ्या बाजूच्या मताला पूर्ण बंदी करणें हें शास्त्रीय प्रगतीस विघातक आहे.

सध्यां शास्त्रीय सशोधनाची धडपड खूपच चालली आहे व ती स्तुत्यहि आहे. परतु कित्येक वेळा जीवनापासून फारकत झालेले सिद्धात दिसून येतात. व्हिक्टोरिया राणीपासून आजपर्यंतच्या ब्रिटिश राजवंशाचेंच उदाहरण घ्या (कारण नेमकी ह्याच काळात आपली फार मोठी शास्त्रीय प्रगति होत चालली असा आपला दावा आहे). ब्रिटिश राजे-राण्याना जन्मापासून मरणापर्यंत best medical advice, guidance and treatment हमखास व बिनदिक्कत उपलब्ध असते. शिवाय त्याना कसलीहि ददात नाही. असे असताना जितकी शास्त्रीय 'प्रगति' अधिक तितका राजा अल्पायुषी असे झालेले आहे की नाही पाहा. एवढ्यावरून तथाकथित शास्त्रीय सिद्धात व प्रगति ही वाटतात तेवढी निर्दोष किंवा बिनचूक नाहीत हे लक्षात येईल.

—पु. ना. ओक

# माझा मल्लीनाथ मीच

पृष्ठ १६ वरून

राष्ट्रसंघटनेचे, हिंदुत्वाचे यशोगानच कां करीत आहे असा आक्षेप कोणी घेतील. मागें माझ्याकडे एक साम्यवादी कार्यकर्ता आला व 'राष्ट्रवाद प्रतिगामी आहे, कम्युनिझम आतरराष्ट्रवादी म्हणूनच विशाल आहे' वगैरे वगैरे साग् लागला. मी त्याला शात-पणे विचारले, " महाशय, आपण कम्युनिझम विशाल आहे असें म्हणता ! पण आमच्या 'भूतदया' या शब्दाला कोणत्याहि भाषेत एखादा योग्य प्रतिशब्द साागाल का ? " तो म्हणाला, 'Humanity'. मी सागितले, "*मानवता म्हणजे माणसानें माणसावर प्रेम* करणे. त्याहिपेक्षां मोठी कल्पना भूतदयेंत आहे. जो जो प्राणिमात्र आहे त्याच्यावर दया दाखविणे. यापेक्षा कम्युनिझम विशाल आहे काय ? "

तेव्हा विश्वकुटुबवाद, मानवता याचे महत्त्व भारताला इतरांनी पटवून द्यावें अशी परि-स्थिति नाही. ज्या आर्यांनी सप्तसिंधूच्या त्या प्राचीन नि पवित्र भूमीत या राष्ट्राला जन्म दिला त्यांची वैश्विक जाणीव वेदातील सूक्तासूक्तातून आपल्याला दिसून येईल. एका विश्वसस्कृतीच्या पाळण्यांतच या राष्ट्रानें आपले जीवन फुलवले, विकसित केले म्हणून तर ते आज अनत आघातातूनहि टिकून आहे. नवजीवनाची आकाक्षा बाळगून आहे. पण या स्पर्धामय जगतात, जेथें बळी तो कान पिळी हा न्याय प्रचलित आहे त्या या विषम सृष्टीत केवळ ही विश्वैकबुद्धि पुरी पडत नाही, म्हणून राष्ट्रवादासारख्या सापक्षेत: संकुचित असणाऱ्या ध्येयवादाची कासच मनुष्यसमाजाला वेळोवेळी धरावी लागते. आजहि मनुष्यमात्र, पृथ्वीवरले इतर समाज—अगदीं साम्यवादी रशियादेखील—या सापेक्षतः सकुचित राष्ट्रवादाच्या भावनेपलीकडे गेलेला आपल्याला दिसणार नाही. मग हिंदूनीच तेवढा मानवतेसाठी राष्ट्रवादाचा त्याग करावा हें कुठल्या नीतिशास्त्र ? यापूर्वी हेंच नीति-शास्त्र अवलंबविण्याचा बौद्धानीं या देशात प्रयत्न केला नव्हता काय ? पण इतिहास सांगतो, की तो एक आत्मघात ठरला. बौद्ध-धर्म चूक हे या आत्मघाताचे कारण नसून मानवजात अपरिपक्व असतां या बौद्धतत्त्वाचा प्रयोग झाला हें या आत्मघाताचे कारण होय. 'हिंदुत्व' ग्रंथात याचें विवेचन करून मी बुद्धभगवानाकडे क्षमेची अति आर्ततेने याचना केली आहे. विनम्र भावाने मी लिहिलें आहे. —

### हे तथागत

हिंदुस्थानामध्यें बुद्धधर्माचा जो ऱ्हास झाला त्याची राजकीय आवश्यकतेची मीमांसा *करताना आमच्या लेखणीतून जे थोडेसे कठोर* शब्द निघाले, त्यावरून कोणीहि असें लव-मात्र मानू नये की, आमच्या मनांत बौद्ध धर्माबद्दल काही मोठासा आदर नाही ! छे, छे ! खुद्द बौद्धधर्माची दीक्षा घेणाऱ्या भक्ताच्या मनात, अखिल जगांत जो पवित्र-तम संघ आहे त्या बौद्धसघाबद्दल जो आदर आणि जें प्रेम असेल तेच प्रेम आणि तोच आदर बाळगणारा बौद्धधर्माचा मी एक नम्र चाहता आहें. बौद्धधर्माची दीक्षा मी घेतली नाही याचे कारण, हा संघ माझ्या योग्यतेचा नाही असे नव्हे, तर मी त्या सघाच्या पवित्र मदिरात पदार्पण करण्याला पात्र नाही हे होय आणि हें मदिर आज जें अनंत काल-पर्यंत टिकले आहे तें त्याचा पाया खडकाच्या पायावर उभारलेल्या अचिरस्थायी मोठ-मोठ्या राजवाड्याच्या पायाप्रमाणे घातला नसून तत्त्वाच्या भक्कम पायावर ते रचलें गेले आहे म्हणून होय. मनुष्याला त्याच्या पाशवी प्रवृत्तीपासून परावृत्त करण्याचा प्रथ-मचा आणि अत्यत यशस्वी असा प्रयत्न, प्रथम संकल्पित करून त्यास मूर्त स्वरूप देऊन, शत-केच्या शतके तो अव्याहत ज्यानी चालू ठेवला अशा तेजस्वी धर्मोपदेशकाची मालिका-अर्हत् भिक्षु याची परपरा—याच हिंदुस्थानामध्ये जन्माला आली होती. येथेंच त्यानी जीवन-दुग्ध प्राशन केले आणि याच भूमीला मातृ-भूमि म्हणून वदन केले. या सर्व गोष्टीची जाणीव आमच्या अत:करणात उत्पन्न होऊन शब्दानी वर्णन न करता येण्यासारख्या भावना दाटून येतात, आणि या सघाबद्दल जर आमच्या अशा मनोवृत्ति आहेत, तर तो सघ ज्यानी प्रस्थापित केला त्या सस्थापकाबद्दल त्या बुद्धाबद्दल त्या ज्ञानदीप्ताबद्दल आम्ही कोणत्या भाषेत आमच्या मनोवृत्ति दिग्दर्शित करू ? हे तथागत ! सर्व मनुष्याजातीतला मी हीन दीन केवळ माझी नितात रिक्तता व माझे नितान्त अज्ञान याचाच आहेर घेऊन तुझ्याकडे येतों. जशी आपल्या बोधाचा साराश मला आकलन करता येत नाही असें *मला वाटतें, तरी मला ही पूर्ण खात्री* आहे, की ते तसे होणेच स्वाभाविक आहे. कारण आपला उपदेश हा देवलोकीच्या वाणी-तून विस्तृत झाला आहे; परतु माझी श्रवणें-द्रियें आणि माझी आकलन शक्ति ही ह्या ऐहिक प्रत्यक्ष प्रमाणमय जगाचा शब्दघोष ऐकण्यास शिकली आहे. भगवन्, कदाचित् असेहि असेल की, आपले पदार्पण या जगा-मध्यें फार लवकर झाले आणि ज्या वेळी हें सर्व जग अगदी बाल्यावस्थेत होते व प्रकाश नुक्ताच कुठें फाकू लागला होता, तोंच आपण आपले निशाण फडकविले म्हणून, या जगाला आपल्या भरारीबरोबर चालता येत नाही व आपल्या देदिप्यमान निशाणाकडे दृष्टि लावता लावताच ती अधुक होऊन दिपून जाते ! जों-पर्यंत उत्क्रातितत्त्वाने घालून दिलेला कायदा,

'चलानामचला भक्ष्या दंष्ट्रिणामप्य दंष्ट्रिण: ।
अहस्ताना सहस्ताश्चशूराणा चैव भीरव: ।।
(मनु)

हा अतीत अप्रतिहार्यतेने व भयकर प्रामु-ख्याने जगांत वावरत आहे व याचा इन्कार सत्याच्या कायद्याने की जे सत्याचे कायदे अत्यंत तेजस्वीपणाने व मोहकतेने चकासित झाले आहेत— पण केवळ आकाशांत ज्याप्रमाणे चांदण्या चमकाव्या त्याप्रमाणें अत्यंत अंतरा-वरूनच चमकत आहेत अशा कायद्यानें होऊ शकत नाही— तोंपर्यंत राष्ट्रीयत्वाच्या भावना विश्वबंधुत्वाचें निशाण फडकविण्याचें नाका

रीतच राहतील आणि तरीहि आमचे देव आणि देवता यांच्या पूजनांनीं सन्मानित झालेलें हेंच राष्ट्रीय निशाण, जर तो शाक्य-सिंह त्याखालीं नसता तर, जरा हतप्रभच दिसलें असतें. ज्याप्रमाणें श्रीराम किंवा श्रीकृष्ण अथवा महावीर हे आमचे आहेत, त्याप्रमाणें भगवन्, आपणहि आमचेच आहांत; आणि ज्याप्रमाणें आपले शब्द हे आमच्या राष्ट्रीय आत्म्याचेच बोल होत, त्याचप्रमाणें आपल्याला दिसणारीं दृश्यें हीं आमच्या जातीचीं सुखस्वप्नें आहेत आणि जर कधीं सत्याच्या तत्त्वाचा विजय होऊन सर्व मानवी जात तें शिरोधार्य करूं लागली तर, हे भगवन् आपणांला असें आढळून येईल कीं, ज्या भूमीनें आपल्याला पाळण्यांत खेळविलें, ज्या जातीनें आपलें लालनपालन केलें, तीच भूमि आणि तीच जाति, ह्या तत्त्वाचा जगभर जयजयकार होण्यास प्रामुख्यानें कारण झालेली आहे. प्रत्यक्ष आपल्याला जन्म देणें ह्या गोष्टीनेंच केवळ हें सिद्ध होत नसलेंच तर त्या गोष्टीनें तें सिद्ध होईल.

**वाराणसी मेदिनी**

किंवा याच ग्रंथाच्या अखेरीस हिंदुत्वाची आजचीं आणि उद्यांचीं क्षितिजें रेखाटतांना मीं उद्गारल्याप्रमाणें——

हिंदुस्थानांतील इतर जाति जोंपर्यंत 'हिंदुस्थान आधीं' असें म्हणत नाहींत. किंवा जगामधले इतर लोक 'मनुष्यजाति आधीं' असें तत्त्वज्ञान आचरीत नाहींत, परंतु, जोंपर्यंत हे लोक चढावाची व स्वसंरक्षणाचीच तयारी करण्याकरितां, केवळ जातीच्या अथवा धर्माच्या संकुचित दृष्टीनें संघटना आणि जूट करण्याचा विश्वप्रयत्न करीत आहेत, तोंपर्यंत–हिंदूंनो ! तोंपर्यंत तरी तुम्ही, शक्य तर तुमच्या जातीच्या सामाजिक जीवनाला ज्ञानतंतूंच्या जाळ्याप्रमाणें एकजीव करणारीं सर्व बंधनें दृढ करा. तुमच्यापैकीं जे कोणी, या अत्यंत जिव्हाळ्याच्या बंधनांना तोडून टाकण्याचा आत्मघातकी प्रयत्न करतील, किंवा 'हिंदू' हें नांव नाकारतील, त्यांना पुढें असा विषमय अनुभव येईल कीं, आपल्या जातीच्या जीवनाच्या व सामर्थ्याच्या झऱ्यापासूनच त्यांनीं स्वतःला तोडून घेतलें आहे.

बावीस कोटी लोक, ज्यांची हिंदुस्थान ही कर्मभूमि आहे, पितृभूमि आहे आणि पुण्यभूमि आहे. एक दिव्य इतिहास ज्यांच्यामागें उभा आहे, एक रक्त आणि एक संस्कृति यांच्या सर्वसामान्य बंधनांनीं जे बद्ध आहेत, असले हे बावीस कोटी हिंदु लोक, सर्व जगाला आपलें म्हणणें ऐकावयाला लावतील. असा एक दिवस उगवणार आहे कीं, ज्या वेळी हें सामर्थ्य जगाच्या प्रत्ययास येणार आहे.

**आणि हेंहि तितकेंच निश्चित आहे, कीं जेव्हां केव्हांहि अशी वेळ येईल, तेव्हां हिंदू लोक सर्व जगाला दुसरें तिसरें कांहीं सांगणार नाहींत. तर तेंच जगाला करावयास सांगतील कीं, जें गीतेनें सांगितलें, जें बुद्धानें उपदेशिलें, ज्या वेळीं 'हिंदू' मनुष्य हा हिंदुत्वातीत होतो, त्या वेळेला तो श्रीशंकराचार्यांप्रमाणें 'वाराणसी मेदिनी' म्हणून गावयाला लागतो व श्रीतुकाराम-महाराजांप्रमाणें 'आमुचा स्वदेश । भुवनत्रयामध्यें वास ।' असें गर्जून उठतो. 'काय म्हणतां ? माझा स्वदेश ? ऐका तर, बंधूंनो! माझ्या देशाच्या मर्यादा म्हणजे त्रैलोक्याच्या मर्यादा, तीच माझ्या देशाची सरहद्द !'**

● ● ●



१८५७ च्या युद्धावर सावरकर किती वेळां तरी बोलले असतील ! पण दादरला १९५१ मध्यें त्यांनीं जें ५७ वर भाषण केलें त्या वेळीं त्यांनीं जो समारोप केला त्यानें अनेकांचे डोळे ओलावले असतील ! सावरकरांनीं तात्या टोपेचें शब्दचित्र उभें केलें, आणि शेवटीं ते म्हणाले——

'आम्हां दुर्बल जीवांच्या अश्रूंसाठीं, तात्या ! तूं आपल्या जीवाचा सौदा कां केलास ? सेनापति तात्या टोपे यांचेबद्दल हें शेवटचें वाक्य लिहितांना त्या वेळीं माझ्या डोळ्यांत अश्रू आले होते. आजहि माझे डोळे ओलावतात. पण हे अश्रु आनंदाचे आहेत, विजयाचे आहेत. १८५७ च्या वीर पुरुषांच्या आत्म्यांना आज मी आवाहन करतों—' या, तात्या टोपे, या ! राणी लक्ष्मीबाई, या ! नानासाहेब पेशवे, या ! तुमच्या महान् स्वातंत्र्ययुद्धाला १०० वर्षे व्हावयाच्या आंत–१९५७ उजाडावयाच्या आंत या देशांतून इंग्रज निघून गेलेला आम्हीं पाहिला; तें महनीय दृश्य पाहण्यासाठीं आज येथें या. ' हें बोलत असतांनाच त्यांचा कंठ दाटून आला.



" भारतांतील माझ्या सहस्त्रावधि हितचिंतकांकडून वेळोवेळीं असे उद्गार निघतात की, " हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्या-नंतरहि त्या स्वातंत्र्यासाठीं झुंजतांना मीं जे कांहीं कष्ट भोगले त्याचें श्रेय मला मिळालें नाहीं.

मी माझ्यापुरतें तरी अगदीं मनःपूर्वकपणें सांगतों कीं आम्हीं आमची मातृभूमि स्वतंत्र झालेली पाहिली ह्यांतच आम्ही स्वतःस कल्पनेहून कृतार्थ झालों असें समजतों. कारण तें पाहण्याचीहि आम्हीं कधीं लालसा धरली नाहीं. केवळ तो दिवस केव्हांतरी उगवावा म्हणून झुंजण्याची तेवढी लालसा धरलेली होती म्हणून तो सोनियाचा दिवस पाहिला ह्यांतच हवें होतें त्याहून अधिक मिळालें. निदान मी तरी अत्यंत समाधानांत आहें. वैफल्याची लवलेश भावना माझ्या मनास शिवत नाहीं. कारण एका अर्थी माझे मूळ संकल्प सफल झालेले आहेत.

राष्ट्र स्वतंत्र झाल्यानंतर त्याचें अध्यक्ष होणें ह्यांतहि धन्यता आहेच. परंतु दुसऱ्या अर्थी राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं लढून तें स्वतंत्र झाल्यानंतर ती सारी राज्यसत्ता आपल्या देशबांधवांच्या हातीं अर्पून, त्यांतील दमडीच्याहि लाभाची व अधिकार-पदाची लालसा न धरतां इतर स्वदेशबांधवांच्या मानांतच आपला मान आणि सुखांतच आपलें सुख मानून एका स्वराज्यनिष्ठ सामान्य नागरिकाप्रमाणें शक्य तें राष्ट्रकर्तव्य तेवढें करीत निरिच्छ समाधानांत राहणें ह्यांतहि कृतार्थतेची धन्यतरता आहेच आहे !

यवनांची, शिकंदराच्या ग्रीक सैन्याची आणि राजसत्तेची दाणादाण उडवून दिल्यानंतर आणि चंद्रगुप्ताची त्या स्वतंत्र भारतीय साम्राज्यावर स्थापना झाल्यानंतर शेवटीं आर्य चाणक्य स्वतः निवृत्त होऊन हिमालयांत निघून गेले अशी कथा आहे. मला वाटतें कृतार्थ झालेल्या सशस्त्र क्रांतिकारकांच्या आमच्या पिढीनेंहि तोच आदर्श डोळ्यांपुढें ठेवावा. त्यांच्या आत्यंतिक त्यागाच्या प्रतिज्ञेला आणि परंपरेला तोच शोभून दिसेल. ".

**वि. दा. सावरकर**

Regd. No. : B 9304

# आठ वर्षे आणि नऊ महिन्यांपूर्वी

वास्तविक पाहतां ज्या दिवशीं आपलें हें भारतीय लोकसत्ताक महाराज्य स्थापित झालें, त्याच दिवसापासून आपलें भौमक, सामुद्रिक आणि वैमानिक शस्त्रबळ वाढविण्याचें आणि तें अद्ययावत् आयुधांनीं सज्ज ठेवण्याचें कार्य आम्हीं तत्काळ हातीं घ्यावयास हवें होतें. पण गेलीं सोन्यासारखीं सहा वर्षे आम्हीं फुकट घालवलीं. नीराकेंद्रांपासून तों वनमहोत्सवांपर्यंत इतर वाटेल त्या सापेक्षत: अगदीं दुय्यम महत्त्वाच्या असणाऱ्या रिकाम्या नि निकाम्या उलाढालींतच काळ दवडला ! तसा या गोष्टींचाहि कांहीं उपयोग असतोच, जसा घरांत लहान मुलांच्या पुरता भातुकलीचाहि उपयोग असतो.

पण एक महाराज्य हातीं येतांच आणि त्याच्या भोंवतीं शत्रूंचा गराडा पडला आहे हें दिसतांच प्रथमत: सर्व लक्ष त्या महाराज्याचें सामरिक संरक्षण करण्यासाठीं अत्यावश्यक अशा शस्त्रबळाची सिद्धता करण्यावरच केंद्रित करावयास हवें होतें.

पण नेमकें तेंच कर्तव्य आम्हीं जवळजवळ प्रतिज्ञापूर्वक टाळलें. शाळा, प्रशाला व महाशाला यांतून तरुण पिढीस सक्तीचें सैनिक शिक्षण देण्याची अगदीं प्राथमिक गोष्टसुद्धां अजून हातीं घेतलेली नाहीं. भोंगळ तत्त्वांच्या शब्दांचे बुडबुडे उडवीत आणि कागदी घोडे नाचवीत आम्ही शांततेचा दिग्विजय करण्यास निघालों.

तेंच चीनकडे पाहा ! ह्याच सहा वर्षांत चीननें त्याचें सारें राष्ट्र अद्ययावत् आयुधांनीं शस्त्रसज्ज नि संरक्षणक्षम करून दाखविलें. इतकेंच नव्हे तर भारताला भीक न घालतां तिबेटचें कीलक राष्ट्र (Buffer state) नष्ट करून चीननें त्याच्या महाराज्याच्या विस्तीर्ण सीमांची बळकट तटबंदी केली आणि मनांत येतांच भारतावर सरळ आक्रमण करतां यावें अशा प्रकारें त्याच्या सीमा आमच्या हिंदुस्थानच्या सीमांशीं रेटारेटीनें भिडवून टाकल्या.

......त्यामुळेंच आज चीन आणि रशिया यांचीं बलाढ्य सैन्यें आमच्या सीमेच्या अगदीं कांठावर सज्ज अवस्थेंत उभीं आहेत आणि त्या बळावरच आज चीन उघडपणें नेपाळ आणि भूतान ह्या उरलेल्या दोन्ही कीलक राष्ट्रांनाहि गिळून टाकण्याचे डाव खेळत आहे. इतकेंच नव्हे तर गंगोत्रीपासून बद्रिकेदारपर्यंतच्या आमच्या जिव्हाळ्याच्या अंतर्गत प्रदेशावरहि आपले अधिकार मांगू लागला आहे.

तिकडे दुसऱ्या टोंकाला पाकिस्तान-अमेरिकेचीं आतां खरोखरीच आपल्याहून बलाढ्य झालेल्या परकीयांचीं आक्रमक सैन्यें ! पाकिस्तानलाहि जन्मून आपल्यासारखीं पांच-सहा वर्षेंच झालीं. परंतु पाकिस्ताननें आपल्यासारखें भ्रांतिनिष्ठ राजकारणाच्या मागें न लागतां वस्तुनिष्ठ राजकारण हातीं घेतलें आणि आपलें मुख्य लक्ष सामरिक शक्ति वाढविण्याच्या प्राथमिक कर्तव्यावरच केंद्रित करून व परराष्ट्रीय कारस्थानांचे अनेक डावपेच खेळत खेळत पाक-अमेरिकन संधीमुळें तें आज आमच्या मानगुटीस बसण्याइतकें प्रबळ झालें आहे हें खचित.

जर गेल्या पांच-सहा वर्षांत वर दिलेल्या चीनप्रभृति राष्ट्रांनीं दाखविलेल्या तडफेनें आमच्या राष्ट्रानेंहि भ्रांतिनिष्ठ राजकारणाच्या मागें न लागतां वस्तुनिष्ठ राजकारणच अवलंबिलें असतें, प्रथमपासून आपलें सामरिक सामर्थ्य वाढविण्याचे आटोकाट प्रयत्न केले असते आणि त्या दिशेनें परराष्ट्रीय संधिविग्रहांचीं कारस्थानें खेळवलीं असतीं तर भारतहि तसाच बलाढ्य झाला असता. आम्हीहि ब्रिटन-रशियांसारखे स्वतंत्रपणें स्वत:च्या प्रयोगशाळेंत अणुबाँबसुद्धां करूं शकलों असतों; अद्ययावत् शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज अशा प्रचंड भूदलाच्या, सिंधुदलाच्या नि वैमानिक दलाच्या संरक्षणानें अकुतोभय झालेला आपला आजचा सुदर्शन चक्रांकित राष्ट्रीय ध्वज आपल्या दुर्धर्ष तेजानें आज हिमालयावर फडकत राहिला असता.

—वि. दा. सावरकर

[ 'केसरी' दि. २६ जानेवारी १९५४ ]

संपादक : मुद्रक : प्रकाशक : श्री. ग. माजगांवकर ◻ प्रकाशनस्थळ : राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण पेठ, पुणें २.

मुद्रणस्थळ : संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणें २.